
# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सहावी



विनामूल्य वितरणासाठी

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**


**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६द्वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

## मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक १९.०५.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सहावी



**समग्र शिक्षा**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती :
जून २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

## इतिहास समिती

डॉ. शुभांगना अत्रे, अध्यक्ष
श्री. किशोर पाटील, सदस्य
श्रीमती. मुग्धा लेले, सदस्य
डॉ. शिवानी लिमये, सदस्य
श्री. पंकज शिंदे, सदस्य
डॉ. अनुजा शिंदे , सदस्य
श्री. अरुण इंगळे, सदस्य
श्रीमती. सुमन गायकवाड, सदस्य
श्री. ताराचंद्र आवळे, सदस्य
श्री. कुशलकुमार समरीत, सदस्य
श्री. प्रशांत शेवतकर, सदस्य
श्री. सुहास धस, सदस्य
डॉ. सचिन डेंगळे, सदस्य
श्री. निलेश बनकर, सदस्य
श्री. श्रीकांत बापट, सदस्य
श्री. सोमेश शर्मा, सदस्य
श्री. निनाद तेंडुलकर, सदस्य
डॉ. सिद्धार्थ जाधव, सदस्य
डॉ. विजय माने, सदस्य
श्री. शंकर खरात, सदस्य
डॉ. प्रशम कोल्हे, सदस्य
डॉ. राजानंद पट्टेबहादूर, सदस्य
डॉ. नलिनी वाघमारे, सदस्य
श्री. रामेश्वर लोटके
(अभ्यासक्रम समन्वयक)
श्री. अरूण जाधव
(अभ्यासक्रम समन्वयक)
श्रीमती वर्षा सरोदे , सदस्य सचिव

## नागरिकशास्त्र समिती

डॉ. हर्षद भोसले, अध्यक्ष
डॉ. प्रिया इंझळकर, सदस्य
श्री. अविनाश बगाडे, सदस्य
श्री. चंद्रहास हिप्परकर, सदस्य
श्री. प्रशांत जोशी, सदस्य
प्रा. सुनिता दळवी, सदस्य
श्री. शाम राऊत, सदस्य
डॉ. शिवाजी रेणापुरे, सदस्य
श्री. कृष्णा रोकडे, सदस्य
श्रीमती. अंजली ढमाळ, सदस्य
श्री. शिवाजी कराळे, सदस्य
डॉ. राजेश पावडे, सदस्य
श्री. बाळू भोसले, सदस्य
डॉ. सुचित्रा घोगरे-काटकर, सदस्य
डॉ. व्यंकटेश खरात, सदस्य
डॉ. ज्योती बुवा, सदस्य
डॉ. प्रभाकर लोंढे, सदस्य
डॉ. नंदकिशोर बोकाडे, सदस्य
श्री. नारायण मुदगलवाड, सदस्य
श्री. दत्तात्रय राठोड, सदस्य
डॉ. बाळासाहेब किलचे, सदस्य
श्री. रविंद्र जिंदे, सदस्य
डॉ. संहिता जोशी, सदस्य
डॉ. नेहा आगाशे, सदस्य
श्रीमती. वर्षाराणी भोपळे
(अभ्यासक्रम समन्वयक)
श्रीमती वर्षा सरोदे , सदस्य सचिव

## गाभा समिती सदस्य

डॉ. महेश्वर कळलावे
श्री. मोहन शेटे
श्री. प्रशांत दिवेकर
श्रीमती प्रतिमा गुप्ते

## समीक्षक

डॉ. मंजिरी भालेराव
इतिहास
(गुणवत्ता परीक्षक)
डॉ. संज्योत आपटे
नागरिकशास्त्र
(गुणवत्ता परीक्षक)
ॲड जयश्री आव्हाड
(विधीतज्ज्ञ)
डॉ. शर्मिष्ठा ओक
(CWSN तज्ज्ञ)

## लेखक

डॉ. प्रिया गोहाड
डॉ. परिमल सुधाकर
प्रा. शिवाजी मोटेगावकर

## संयोजन

**श्रीमती वर्षा सरोदे**
(प्र. विशेषाधिकारी)
इतिहास व नागरिकशास्त्र, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुखपृष्ठ व चित्रकार :** श्री. देवदत्त बलकवडे
**अक्षरजुळणी :** मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद :** ७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह
**मुद्रणादेश :** N/PB/2026-27/Qty. - 50,000
**मुद्रक :**

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. शशांक कणिकदळे**
निर्मिती अधिकारी

## प्रकाशक

**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई - २५

## भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## भारताचे संविधान

### भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' अनुसार 'महाराष्ट्र राज्यात शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२६' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमाची कार्यवाही २०२६-२७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचा समावेश 'आपल्या सभोवतालचे जग भाग-२' मध्ये करण्यात आला आहे. इयत्ता सहावीपासून पुढील अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्राचे स्वतंत्र पाठ्यपुस्तक असणार आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

भारतीय ज्ञानपरंपरा, पंचकोश, २१व्या शतकाची कौशल्ये, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, कृतियुक्त विद्यार्थीकेंद्रीत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या या टप्प्यावर विद्यार्थ्यांमध्ये कोणत्या अध्ययन निष्पत्ती विकसित व्हाव्यात यानुरूप पाठातील विविध कृती, अध्ययन अनुभव, उपक्रम अशी आशयाची नावीन्यपूर्ण रचना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन निष्पत्ती रुजवणे हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे या पाठ्यपुस्तकात यावर विशेषत्वाने भर दिला आहे.

इतिहासाच्या भागात 'प्राचीन भारताचा इतिहास' देण्यात आला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना आपली संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी तसेच याद्वारे त्यांची सामाजिक एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी हा उद्देश आहे.

प्राचीन भारताचा इतिहास हा मानवाच्या उत्क्रांतीचा, संस्कृतीच्या विकासाचा आणि समृद्ध परंपरेचा साक्षीदार आहे. या पाठ्यपुस्तकातील इतिहासाच्या भागात पुरातत्वीय साधने, शिलालेख, नाणी, साहित्यिक ग्रंथ, परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने यांसारख्या ऐतिहासिक साधनांच्या आधारे प्राचीन भारताच्या इतिहासाची उकल कशी होते, याचा सविस्तर आढावा घेतला आहे. अश्मयुगातील भटक्या अवस्थेपासून ते शेती, स्थिर वसाहती आणि नागरीकरण इथपर्यंतचा प्रवास या पाठ्यपुस्तकात मांडण्यात आला आहे. हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, महाजनपदांचा उदय, मौर्य, शुंग, सातवाहन, गुप्त इत्यादी विविध कालखंडाचा राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास सोप्या व अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडलेला आहे. प्राचीन काळातील प्रशासन, अर्थव्यवस्था आणि समाजरचना यांचा परस्परसंबंध स्पष्ट करण्यात आला आहे. तसेच कला, स्थापत्य, साहित्य, विज्ञान, गणित, आयुर्वेद, तत्त्वज्ञान आणि धर्म याद्वारे प्राचीन भारतीय संस्कृतीची वैशिष्ट्ये उलगडून दाखवण्यात आली आहेत. प्राचीन भारताचा प्रभाव केवळ भारतीय उपखंडापुरता मर्यादित न राहता भारताबाहेरही कसा पडला, याचाही विचार करण्यात आला आहे. व्यापार, धर्म, कला इत्यादी माध्यमांतून भारताचे चीन, आग्नेय आशिया, मध्य आशिया व भूमध्य प्रदेशाशी असलेले संबंध स्पष्ट केले आहेत. पाठ्यपुस्तक संवादात्मक बनवण्याचा प्रयत्न करताना, वेगवेगळ्या चौकटींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक कृतिप्रवण करण्याचा प्रयत्नदेखील केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल जिज्ञासा निर्माण करणे, भूतकाळाचे आकलन वाढवणे आणि भारताच्या समृद्ध वारशाची जाणीव होणे  हे या पाठ्यपुस्तकाचे मूळ उद्दिष्ट आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात 'स्थानिक शासनसंस्था' याविषयी माहिती घेत असताना विकासाच्या योजनांमध्ये स्थानिक जनतेचा सहभाग आणि महिलांच्या सहभागांतून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांनुसार चालतो हे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत सांगितले आहे. पाठांत चौकटींत दिलेली माहिती विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक करू शकेल. शिक्षकांसाठी वेगळ्या सूचना दिल्या आहेत. अध्यापन जास्तीतजास्त कृतिप्रधान व्हावे, यासाठी उपक्रम देण्यात आले आहेत. लोकशाही  प्रक्रियेमध्ये सक्रिय सहभागी होणारा सुजाण नागरिक तयार होण्यासाठी या पुस्तकातील आशय महत्त्वाचा ठरेल.

पाठ्यपुस्तक जास्तीतजास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यादृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पाठ्यपुस्तकाचे समीक्षण करण्यात आले आहे. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पाठ्यपुस्तकास अंतिम स्वरूप देण्यात आले. मंडळाची इतिहास विषय समिती व नागरिकशास्त्र विषय समिती, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पाठ्यपुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

इतिहास व नागरिकशास्त्राच्या आनंददायी अध्ययनासाठी शुभेच्छा!

**(अनुराधा ओक)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** १ मे २०२६
**भारतीय सौर दिनांक :** वैशाख ११, शके १९४८, महाराष्ट्र दिन

# पाठनिहाय अध्ययन निष्पत्ती

| अ. क्र. | अभ्यासक्रम क्षमता | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय : CG – १. मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी संबंधित स्रोतांचे आकलन करणे आणि अर्थपूर्ण अन्वयार्थ लावणे. | | | |
| १ | **इतिहासाचे स्रोत (साधने)**<br>C – १.१ मानवी जीवनातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक आणि सामाजिक-राजकीय पैलू समजून घेण्यासाठी, माहितीचे अनेक स्रोत (प्राथमिक आणि दुय्यम) संकलित करतो आणि त्याचा अन्वयार्थ लावतो. | • प्राचीन काळातील मानवी जीवनातील विविध पैलू समजून घेण्यासाठी इतिहासाचे स्रोत स्पष्ट करून त्याद्वारे विविध माहिती संकलित करतो व त्याचा अन्वयार्थ लावतो. | १,२,३,४,५,६,७ |
| | | अ) प्राचीन इतिहासाचे प्राथमिक स्रोत सांगतो. | २,३,४,५,६,७ |
| | | ब) इतिहासाचे दुय्यम स्रोत सांगतो. | २,३,४,५,६,७ |
| | | क) इतिहासाच्या भौतिक स्रोतांची नावे सांगून माहिती समजून घेतो. | २,३,४,५,६,७ |
| | | ड) इतिहासाचे लिखित स्रोत ओळखून मानवी जीवनाचे विविध पैलू समजून घेतो. | २,३,४,५,६,७ |
| | | इ) इतिहासाचे मौखिक स्रोत ओळखून माहिती समजून घेतो. | २,४,५,६,७ |
| | | फ) इतिहास अभ्यासाच्या विविध (भौतिक/लिखित/मौखिक) स्रोतांचे वर्गीकरण करतो. | २,३,४,५,६,७ |
| | | • महाराष्ट्रातील विविध उत्खननस्थळे, वारसास्थळे, वस्तुसंग्रहालय यांची नावे सांगून महाराष्ट्राच्या नकाशात दाखवून त्यांची माहिती सांगतो, त्यांच्या जतन व संवर्धनाचे महत्त्व समजून घेतो आणि मानवी जीवनातील विविध पैलूंशी त्यांचा सहसंबंध जोडतो. | ५,६,७,१३,१४,१५ |
| | | अ) महाराष्ट्रातील विविध उत्खननस्थळे, वारसास्थळे सांगून महाराष्ट्राच्या नकाशात दाखवितो. | १३,१४,१५<br>१३,१४ |
| | | ब) महाराष्ट्रातील विविध वस्तुसंग्रहालयांना भेट देऊन माहिती लिहितो. | ८,९,१०,११,१२, |
| | C – १.२ आशय, तक्ते, आकृत्या, नकाशे या स्वरूपात दिलेल्या मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी संबंधित माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण करतो. | • आशय, तक्ते, आकृत्या, नकाशे यांचे निरीक्षण करून प्राचीन काळातील मानवी जीवनाच्या पैलूंशी संबंधित माहितीचे संकलन व वर्गीकरण करतो. | १३,१४,१५<br>८,९,१०, १२, |
| | | अ) मानवी जीवनाच्या पैलूंशी संबंधित आशयाची माहिती संकलित करून वर्गीकरणाद्वारे समजून घेतो. | १३,१४,१५ |
| | | ब) मानवी जीवनाच्या पैलूंशी संबंधित माहिती आकृतींच्या साहाय्याने संकलित करून वर्गीकरणाद्वारे समजून घेतो. | ८,१०,१४ |
| | | क) प्राकृतिक आणि ऐतिहासिक नकाशाचे निरीक्षण करून मानवी जीवनाशी संबंधित ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे नकाशावर दर्शवतो व त्याआधारे माहितीचे संकलन करून वर्गीकरणाद्वारे समजून घेतो. | ९,१४,१५ |
| | | ड) मानवी जीवनाच्या पैलूंशी संबंधित माहिती तक्त्यांच्या साहाय्याने संकलित करून वर्गीकरणाद्वारे समजून घेतो. | ८,१०,१३,१४,१५ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG – १ मानवी जीवनाच्या विविध पैलूंशी संबंधित स्रोतांचे आकलन करणे आणि अर्थपूर्ण अन्वयार्थ लावणे.<br>CG – २ मानवी संस्कृतीतील सातत्य व बदल या प्रक्रियांचा मागोवा काही विशिष्ट उदाहरणे व त्यांचा संदर्भ तसेच काही ऐतिहासिक घटनांच्या मदतीने शोधणे. | | | |
| २ | **प्रागैतिहासिक काळ**<br>C– १.१ मानवी जीवनातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौगोलिक आणि सामाजिक-राजकीय पैलू समजून घेण्यासाठी, माहितीचे अनेक स्रोत (प्राथमिक आणि दुय्यम) संकलित करतो आणि त्याचा अन्वयार्थ लावतो. | • महाराष्ट्रातील विविध उत्खननस्थळे, वारसास्थळे वस्तुसंग्रहालय यांची नावे सांगून महाराष्ट्राच्या नकाशात दाखवून त्यांची माहिती सांगतो त्यांच्या जतन व संवर्धनाचे महत्त्व समजून घेतो आणि मानवी जीवनातील विविध पैलूंशी त्यांचा सहसंबंध जोडतो. | १३,१४,१५ |
| | | क) महाराष्ट्रातील विविध वारसास्थळे नकाशात दाखवून माहिती सांगतो व त्याच्या जतन व संवर्धनाचे महत्त्व समजून घेतो. | ६,१५ |
| | C– २.१ भूतकाळातील प्रमुख बदल, त्यांचा समाजावर झालेला स्पष्ट परिणाम याचे विश्लेषण करतो. | • प्राचीन कालखंडातील मानवी संस्कृतीच्या माहितीच्या आधारे विविध बदलांचा मागोवा घेऊन प्राचीन भारताच्या सांस्कृतिक वाटचालीवर झालेला परिणाम स्पष्ट करून मानवी संस्कृतीतील सातत्य व बदल या प्रक्रिया समजून घेतो. | १०,११,१२,१३,<br>१४,१५ |
| | | अ) विविध भौगोलिक वैशिष्ट्यांचा प्राचीन भारताच्या सांस्कृतिक वाटचालीवर झालेला परिणाम स्पष्ट करतो. | ९,१०,१६,१७,१८ |
| | | ब) प्रागैतिहसिक काळ ही संकल्पना समजून घेऊन प्रागैतिहासिक काळ आणि ऐतिहासिक काळ या दोन्ही काळातील मानवी संस्कृतीची वाटचाल, स्थित्यंतरे याची माहिती सांगतो. | १०,११,१२,१३,१४ |
| | | • अश्मयुग व ताम्रपाषाण युगाचा अर्थ व माहिती सांगून तत्कालीन मानवी जीवनातील बदलांचा समाजावर झालेला परिणाम स्पष्ट करतो. | १०,११,१३,१४,१५ |
| | | अ) अश्मयुगाचा अर्थ सांगून महाराष्ट्रातील अश्मयुगीन स्थळे नकाशात दर्शवितो. | |
| | | ब) पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्ययुग यांची माहिती सांगून तुलना करतो. | १०,११,१५ |
| | | क) पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्ययुगातील मानवी जीवनातील बदल सांगतो. | ११,१२,१३,१४,१५ |
| | | ड) ताम्रपाषाण युगाचा अर्थ स्पष्ट करतो. | ११,१२,१३,१४,१५ |
| | | इ) ताम्रपाषाण युगीन महाराष्ट्रातील सावळदा, जोर्वे, इनामगाव, दायमाबाद इत्यादी ठिकाणे नकाशात दाखवून त्यांचे महत्त्व सांगतो. | १३,१४,१५<br>१३,१४,१५ |
| | | फ) ताम्रपाषाण युगाची वैशिष्ट्ये सांगतो. | |
| | | • मानवी समाजातील विकासाचे असे विविध टप्पे समजून घेऊन मानवी वस्ती, सभ्यता, संस्कृती इत्यादींच्या अनुषंगाने होणाऱ्या कालानुरूप विविध बदलांचा मानवी समाजावर झालेला परिणाम यांचे विश्लेषण करतो. | १३,१४,१५<br>८,९,१०,११,१२,<br>१३, १४,१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय : CG – २ मानवी संस्कृतीतील सातत्य व बदल या प्रक्रियांचा मागोवा काही विशिष्ट उदाहरणे व त्यांचा संदर्भ तसेच काही ऐतिहासिक घटनांच्या मदतीने शोधणे. | | | |
| ३ | **हडप्पा संस्कृती**<br>C– २.१ भूतकाळातील प्रमुख बदल, त्यांचा समाजावर झालेला स्पष्ट परिणाम याचे विश्लेषण करतो. | • प्राचीन कालखंडातील हडप्पा संस्कृतीची उत्खननस्थळे नकाशात दाखवून लोकजीवनाची वैशिष्ट्ये, बदल स्पष्ट करतो व हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे सांगतो.<br>अ) हडप्पा संस्कृतीचा कालखंड सांगतो.<br>ब) हडप्पा संस्कृतीतील ठिकाणे आणि समकालीन जागतिक संस्कृतीची ठिकाणे नकाशात दाखवितो.<br>क) हडप्पा संस्कृतीतील नगररचनेची वैशिष्ट्ये सांगून लोकजीवनात झालेला बदल स्पष्ट करतो.<br>ड) हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासामागील कारणे स्पष्ट करतो. | १६,१७,१८,१९,२०<br>२१,२२,२३,२४,२५<br>१७,२४<br>१७,१८,२५<br>१८,१९,२०,२१,<br>२२,२३,२४ |
| ४ | **वैदिक संस्कृती**<br>C– २.१ भूतकाळातील प्रमुख बदल, त्यांचा समाजावर झालेला स्पष्ट परिणाम याचे विश्लेषण करतो. | • वैदिक संस्कृतीतील वाङ्मयीन, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवन यांमध्ये झालेला बदल स्पष्ट करतो.<br>अ) वैदिक वाङ्मयाची नावे सांगून त्यांचे भारतीय संस्कृतीतील महत्त्व सांगतो.<br>ब) वैदिक काळातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवन व आश्रमव्यवस्था इत्यादींची माहिती सांगतो. | २६,२७,२८,२९,<br>३०,३१,३२<br>२७,२८,२९,३०,<br>३१,३२<br>२८,२९,३०,३१,३२ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG –७ अ) भारताचा समृद्ध भूतकाळ आणि वर्तमानकाळ व त्यातील गौरवशाली सांस्कृतिक विविधतेतील एकता, बहुलवाद, वारसा, परंपरा, साहित्य, कला, स्थापत्यशास्त्र, तत्वज्ञान, वैद्यकशास्त्र, विज्ञान, आणि मानवजातीला इतर योगदानांसह जाणणे. ब) भौगोलिक विविधता असली तरी एकात्मतेसाठी इतर आवश्यक घटक यादवारे भारतीय असण्याचा अर्थ आणि महत्त्व याची जाण असणे. | | | |
| ५ | **विविध धर्मांची शिकवण**<br>C– ७.३ भारतीय परंपरेनुसार समुदायांचे व सामाजिक गटांचे समावेशन आणि त्याचा सांस्कृतिक घटकांद्वारे पडणारा जागतिक प्रभाव जाणतो. | • प्राचीन कालखंडातील विविध समुदाय, त्यांचे पोशाख, राहणीमान, जीवनशैली, वर्तणूक, संस्कृती, परंपरा, शिक्षण, व्यवसाय यांची ओळख करून घेतो.<br>अ) प्राचीन भारतीय परंपरेचा जगातील विविध समुदायांवर पडणारा प्रभाव सांगतो.<br>ब) प्राचीन भारतातील विविध धार्मिक प्रवाह व त्यांचे विचार स्पष्ट करतो. | ३३,३४,३५,३६,३७<br>३८,३९,४०,४१,४२<br>३३,३४,३५,३६,३७<br>३८,३९,४०,४१,४२<br>३३,३४,३५,३६,३७<br>३८,३९,४०,४१,४२ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG – ४ सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संस्थांच्या कार्याचा समाजावर होणारा परिणाम, व्यक्ती आणि सामूहिक संस्था समाजाला कसे आकार देतात हे समजणे. | | | |
| ६ | **जनपदे व महाजनपदे**<br>C– ४.१ विद्यार्थी परिसरातील किंवा प्रदेशातील विविध सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांच्या कार्याबद्दल माहिती संकलित करतो, त्या माहितीचे व्यवस्थापन करतो आणि त्याचा अर्थ लावतो. मानवी समाजासाठी त्याचे महत्त्व ओळखतो. | • वैदिकोत्तर कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांचे कार्य आणि जनपदे यांची माहिती संकलित करून मानवी समाजासाठी त्याचे महत्त्व सांगतो.<br>अ) वैदिकोत्तर कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांच्या माहितीचे संकलन करून तत्कालीन मानवी जीवनातील त्यांचे महत्त्व सांगतो.<br>ब) प्राचीन भारतातील जनपदे सांगून त्यांचे वैशिष्ट्ये व महत्त्व सोदाहरण सांगतो.<br>क) प्राचीन भारतातील विविध महाजनपदांनी दिलेले योगदान सांगून त्यांची तुलना करतो. | ४३,४४,४५,४६,४७<br>४८<br>४३,४४,४५,४६,४७<br>४८<br>४३,४४,४५,४६,४७<br>४८<br>४३,४४,४५,४६,४७<br>४८<br>४५,४८ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG – ४ सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संस्थांच्या कार्याचा समाजावर होणारा परिणाम, व्यक्ती आणि सामूहिक संस्था समाजाला कसे आकार देतात हे समजणे. | | | |
| ७ | **मौर्यकालीन भारत**<br>C– ४.२ सर्वसाधारणपणे व्यक्ती / समूह / समुदाय समाजावर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संस्थांच्या प्रभावाचे मूल्यांकन करतो. | १) प्राचीन काळातील विविध साम्राज्य, व्यक्ती, समाज यांचा तत्कालीन समाजावर पडलेल्या प्रभावाचे मूल्यांकन करतो.<br>अ) मौर्य साम्राज्याची स्थापना व विस्तारात चंद्रगुप्त मौर्य व सम्राट बिंदुसार यांचे योगदान स्पष्ट करतो.<br>ब) सम्राट अशोक यांच्या कलिंग स्वारीची माहिती व परिणाम सांगून विश्लेषण करतो.<br>क) सम्राट अशोक यांचे कलिंगचे युद्ध, धर्मप्रसाराचे व लोककल्याणाचे कार्य याबाबतचे योगदान सांगतो.<br>ड) सम्राट अशोक यांच्या धर्मप्रसाराचे कार्य विश्लेषण करतो.<br>इ) सम्राट अशोकाच्या लोककल्याणकारी कार्याचे महत्त्व सांगतो.<br>फ) मौर्यकालीन राज्यव्यवस्था व लोकजीवन यांची माहिती सांगतो.<br>ग) मौर्यकालीन कला, स्थापत्य व साहित्य यांची माहिती सांगून भारताची राष्ट्रीय प्रतीके आणि मौर्यकालीन स्थापत्य कला यांचा सहसंबंध सांगतो. | ४९,५०,५१,५२,५३<br>५४,५५,५६<br>४९,५०,५१,५२,<br>५५,५६<br>५२,५३,५५,५६<br>५२,५३,५५,५६<br>५२,५३,५५,५६<br>५३,५५,५६<br>५३,५४,५५,५६<br>५४,५५,५६ |

| | | | |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय : CG –३ विविध सामाजिक, ऐतिहासिक घटना किंवा प्रसंगाची कारणे आणि परिणाम यांच्यातील संबंध शोधणे आणि त्यांना मानवी जीवनाच्या एकूण परिणामांशी जोडणे.<br>CG –७ अ) भारताचा समृद्ध भूतकाळ आणि वर्तमानकाळ त्यातील गौरवशाली सांस्कृतिक विविधतेतील एकता, बहुलवाद, वारसा, परंपरा, साहित्य, कला, स्थापत्यशास्त्र, तत्वज्ञान, वैद्यकशास्त्र, विज्ञान, आणि मानवजातीला इतर योगदानांसह जाणणे. ब) भौगोलिक विविधता असली तरी एकात्मतेसाठी इतर आवश्यक घटक याद्वारे भारतीय असण्याचा अर्थ आणि महत्व याची जाण असणे. | | | |
| ८ | **प्राचीन भारतातील व महाराष्ट्रातील राज्ये व राजघराणी**<br>C–७.४ प्राचीन भारतातील व महाराष्ट्रातील महत्वाची राज्ये, राजघराणी, यांची ओळख करून घेतो. | • प्राचीन भारतातील व महाराष्ट्रातील महत्वाची राज्ये व राजघराणी (शुंग, कण्व, सातवाहन, शक, कुशाण, गुप्त, वर्धन इत्यादी.) यांचे योगदान स्पष्ट करतो.<br>अ) शुंग साम्राज्याचा विस्तार स्पष्ट करून त्याच्या ग्रीक राज्यांविरोधी धोरणाचे विश्लेषण करतो.<br>ब) कण्व साम्राज्याचा विस्तार स्पष्ट करतो.<br>क) प्राचीन महाराष्ट्रातील व भारतातील सातवाहन घराण्याचे लक्षणीय योगदान स्पष्ट करतो.<br>ड) इंडो–ग्रीकांचे भारतीय नाणे निर्मितीतील नावीन्यपूर्ण योगदान स्पष्ट करतो.<br>इ) शकांच्या साम्राज्याचा विस्तार स्पष्ट करतो.<br>फ) कुशाणांचा साम्राज्य विस्तार, प्रशासन व्यवस्था, त्यांच्यावरील भारतीय संस्कृतीचा प्रभाव स्पष्ट करतो.<br>ग) गुप्तकालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक जीवनाची ओळख स्पष्ट करतो.<br>ह) सम्राट हर्षवर्धन याचे साम्राज्य विस्तारातील योगदान स्पष्ट करतो. | ५७,५८,५९,६०, ६१, ६२,६३,६४<br>५७,६३,६४<br>५८,६३,६४<br>५९,६३,६४<br>५८,६३,६४<br>५९,६३,६४<br>६०,६३,६४<br>६१,६३,६४<br>६२,६३,६४ |
| | C–३.२ सामाजिक गट समुदायांमध्ये त्यांच्या प्रदेशात आणि जगाच्या इतर भागात सामंजस्य आणि संघर्ष यामागील कारणे आणि मानवी समाजावरील त्यांचा प्रभाव ओळखतो. | ड) कुशाणांचे राजसत्तेतील व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करतो.<br>इ) परकीय आक्रमणामुळे भारतीयांची युद्धनीती, आहार, चालीरीती व परंपरा यांत झालेले बदल सांगून परिणाम स्पष्ट करतो. | ६०,६१,६४<br>५७,५८,६० |
| अभ्यासक्रम ध्येय : CG –७ अ) भारताचा समृद्ध भूतकाळ आणि वर्तमानकाळ त्यातील गौरवशाली सांस्कृतिक विविधतेतील एकता, बहुलवाद, वारसा, परंपरा, साहित्य, कला, स्थापत्यशास्त्र, तत्वज्ञान, वैद्यकशास्त्र, विज्ञान, आणि मानवजातीला इतर योगदानांसह जाणणे. ब) भौगोलिक विविधता असली तरी एकात्मतेसाठी इतर आवश्यक घटक याद्वारे भारतीय असण्याचा अर्थ आणि महत्व याची जाण असणे. | | | |
| ९ | **प्राचीन भारताचा सांस्कृतिक वारसा**<br>C–७.१ भारतीय समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक घटक, भाषा, कला, तात्विक कल्पना, मूल्ये, पोशाख, आहार, परंपरा, सण, व्यापार, वाणिज्य आयुर्वेद व योग आरोग्यविषयक सवयी यांमधील साम्य ओळखून, विविधतेतील एकता स्पष्ट करतो. | १) प्राचीन भारतीय संस्कृतीतील समृद्ध आणि वैविध्यपूर्ण सांस्कृतिक घटक समजून घेऊन त्यातील साम्य ओळखून विविधतेतील एकता स्पष्ट करतो.<br>अ) प्राचीन भारताच्या सांस्कृतिक जीवनातील भाषा, कला, परंपरा, पोशाख, आहार इत्यादी घटकांची माहिती सोदाहरण स्पष्ट करतो.<br>ब) प्राचीन भारताच्या आर्थिक जीवनातील व्यापार व वाणिज्य या घटकांची माहिती सोदाहरण स्पष्ट करतो.<br>क) प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र या ज्ञान शाखेतील आयुर्वेद, योग आणि आरोग्य विषयक सवयी या घटकांची माहिती वर्गीकरणासह स्पष्ट करतो.<br>ड) प्राचीन भारतातील विविध प्रदेश व महाराष्ट्र यांच्या सांस्कृतिक घटकांतील साम्य व भेद स्पष्ट करून विविधतेतील एकता सोदाहरण सांगतो. | ६९,७०<br>६५,६६,६७,७२,७३<br>६९<br>६९,७०,७२<br>७०,७१ |
| | C–७.३ भारतीय परंपरेनुसार समुदायांचे व सामाजिक गटांचे समावेशन आणि त्याचा सांस्कृतिक घटकांद्वारे पडणारा जागतिक प्रभाव जाणतो. | १) प्राचीन कालखंडातील विविध समुदाय त्यांचे पोशाख, राहणीमान, जीवनशैली, वर्तणूक, संस्कृती, परंपरा, शिक्षण, व्यवसाय यांची ओळख करून घेतो.<br>क) भारतातील प्राचीन विद्यापीठांच्या माहितीचे संकलन करून समजून घेतो.<br>ड) प्राचीन भारतीय व्यवसाय अत्यंत समृद्ध आणि प्रगत होते. याचे सकारण विवेचन करतो. | ७०,७१,७२,७३<br>७१,७२,७३<br>६९ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG – २ मानवी संस्कृतीतील सातत्य व बदल या प्रक्रियांचा मागोवा काही विशिष्ट उदाहरणे व त्यांचा संदर्भ तसेच काही ऐतिहासिक घटनांच्या मदतीने शोधणे.<br>CG ३ . विविध सामाजिक, ऐतिहासिक घटना किंवा प्रसंगाची कारणे आणि परिणाम यांच्यातील संबंध शोधणे आणि त्यांना मानवी जीवनाच्या एकूण परिणामांशी जोडणे. | | | |
| १० | **प्राचीन भारत व जग**<br>C– २.२ मानवी समाजातील विशिष्ट नातेसंबंध, रीतीरिवाज आणि कृती, समाजातील मोठे बदल टिकून राहतात. अशा विशिष्ट गोष्टींच्या प्रसाराचे घटक ओळखतो.<br>C–३.२ सामाजिक गट आणि समुदायांमध्ये, त्यांच्या प्रदेशात आणि जगाच्या इतर भागात सामंजस्य आणि संघर्ष यामागील कारणे आणि मानवी समाजावरील त्यांचा प्रभाव ओळखतो. | १) मानवी जीवनातील विशिष्ट नातेसंबंध, रीतीरिवाज आणि कृती, समाजातील मोठे बदल टिकून राहतात हे सांगून पर्शियन व ग्रीक संस्कृतीच्या मिलापाचे घटक सांगतो.<br>अ) पर्शियन संस्कृतींचा भारतावरील अनुकूल व प्रतिकूल परिणाम सांगतो.<br>ब) ग्रीक संबंधांचा भारतावरील अनुकूल व प्रतिकूल परिणाम सांगतो.<br>२) आपल्या सभोवताली असलेली मानवी जीवनातील विविधता स्पष्ट करून अनेक प्राचीन संस्कृतींचा एकमेकांशी आलेला संपर्क व विविध प्रदेशांचे परस्परांशी असलेले सामंजस्य, संघर्ष समजून घेऊन त्यांचा मानवी जीवनावर झालेला दूरगामी परिणाम स्पष्ट करतो.<br>अ) भारत आणि शेजारील देशांचा परस्परांशी असलेला सहसंबंध स्पष्ट करतो.<br>ब) भारतीय उपखंड आणि इराण, ग्रीस यांच्यातील संबंध स्पष्ट करून पश्चिम आशियाई देशांच्या साम्राज्य विस्तारामुळे भारतीय उपखंडावर झालेले राजकीय, सामाजिक, आर्थिक, व्यापार, दळणवळण, प्रशासकीय, शैक्षणिक परिणाम विशद करतो.<br>क) अलेक्झांडरच्या भारतावरील आक्रमणामुळे सामाजिक व राजकीय परिस्थितीत झालेला बदल सांगतो. | ७४,७५<br>७४,७५,७६<br>७६,७७<br>७८,८०,८१<br>७८,७९,८१<br>८०,८१<br>७६,७७,८१ |

# शिक्षकांनी पाठ्यपुस्तक हाताळताना

- राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मुख्य उद्देश हा राज्यातील सर्व विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती सुधारणे हा असल्याने पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीच्या प्राथमिक पृष्ठांत समाविष्ट असलेल्या अध्ययन निष्पत्ती सर्वांनी आवर्जून अध्यापनाच्या वेळी समोर ठेवणे आवश्यक आहे.
- प्रत्येक पाठाच्या अध्यापन प्रक्रियेचे नियोजन करताना अध्ययन निष्पत्तीनुसार पाठातील अध्ययन अनुभवांची आणि विविध कृतींची योजना करावी.
- पाठांमध्ये बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून विविध अध्ययन अनुभूती सुचवल्या आहेत, याचा साकल्याने विचार करावा. विविध विषयांच्या साहाय्याने एकात्मिक पद्धतीने सहजपणे अध्ययन होईल याची जाणीव करून घ्यावी.
- प्राचीन भारताचा इतिहास विद्यार्थ्यांना शिकवण्याचे प्रयोजन विद्यार्थ्यांना आपली संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी आणि त्याद्वारे त्यांची सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी, हे आहे. शिक्षकांनी प्राचीन भारताचा इतिहास हा विषय शिकवताना हे प्रयोजन लक्षात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे नियोजन करावे.
- विविध कृतींच्या आधारे विषयाची समज वृद्धिंगत करता येईल.
- आशयाचे ओझे वाढू नये यासाठी पाठ्यपुस्तकात प्रत्येक मुद्दयांची सविस्तर माहिती पाठात उदाहरणांसह व स्पष्टीकरणांसह देणे शक्य नसते. शिक्षकांनी अध्ययनापूर्वी विविध संदर्भांच्या आधारे विद्यार्थ्यांना आशय अधिक सोपा होण्याच्या दृष्टीने आवश्यक माहिती त्या-त्या ठिकाणी देणे गरजेचे आहे.
- आपल्या सांस्कृतिक वारशाबद्दलचा अभिमान प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासातून निर्माण होण्यासाठी विविध प्रकारच्या प्राचीन वस्तू, नाणी, प्राचीन स्थापत्याची उदाहरणे यांबद्दलची अधिकाधिक माहिती मिळवण्याची साधने कोणती, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करावे. पाठ्यपुस्तकातील माहितीव्यतिरिक्त अधिक माहिती संकलित करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.
- हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे दूरवरच्या देशांशी प्रस्थापित झालेले व्यापारी सबंध प्राचीन भारताच्या समृद्धीच्या मुळाशी होते, हे लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप विद्यार्थ्यांना थोडक्यात समजावून सांगावे. अशा प्रकारचा व्यापार विश्वबंधुत्व आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य या गोष्टींशिवाय शक्य होत नाही, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.
- रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आग्नेय आशियातील इंडोनेशिया, कंबोडिया या देशांमध्ये नृत्यनाट्याच्या स्वरूपात सादर करण्याची परंपरा आजतागायत टिकून आहे. तेथील प्राचीन शिल्पांमध्येही त्यातील कथांचा समावेश केलेला आढळतो. त्यासंबंधीची अधिक माहिती मिळवून ती वर्गात सादर करता येईल, यासाठी विद्यार्थ्यांना प्रकल्प द्यावेत.
- नागरिकशास्त्र विषयाची सुरुवात करण्यापूर्वी आपल्या देशातील शासनरचना स्पष्ट करावी. संघशासन, घटक राज्यशासन आणि स्थानिक शासन यांचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करावे.
- भारतातील खाद्य विविधता दर्शवण्यासाठी आपले समाजजीवन या पाठात भारताच्या स्थूल नकाशाचा उपयोग केला आहे.
- स्थानिक कारभाराविषयी राज्यशासनाचे स्वतंत्र कायदे आहेत. विद्यार्थ्यांना त्या कायद्यांची विस्तृत माहिती देणे अपेक्षित नाही, परंतु आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांना अनुसरून चालतो हे त्यांना आवर्जून सांगावे. कायद्याचे अधिराज्य असल्याचे फायदे त्यांना वेगवेगळ्या उदाहरणांतून दाखवून द्यावेत.
- ७३व्या आणि ७४व्या संविधान दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासनसंस्थांचे सबलीकरण झाले आहे, ही बाब लक्षात घेऊन स्थानिक शासन संस्थांमध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना सांगावेत.
- स्थानिक शासनसंस्थांमधील महिलांच्या सहभागाचा आणि त्यांच्या सहभागातून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख करावा.
- ब्रिटिश राजवटीत ‘स्थानिक स्वराज्यसंस्था’ असे स्थानिक शासनाला म्हटले जात असे. स्वातंत्र्यानंतर सर्वच पातळ्यांवर स्वराज्य असल्याने आता ‘स्थानिक शासनसंस्था’ असे म्हटले जाते.
- शिक्षकांनी विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांची भाषा (Sign Language ) तसेच अन्य पूरक अध्यापनशास्त्रीय पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | इतिहासाची साधने | १ |
| २ | प्रागैतिहासिक काळ | ८ |
| ३ | हडप्पा संस्कृती | १६ |
| ४ | वैदिक संस्कृती | २६ |
| ५ | विविध धर्मांची शिकवण | ३३ |
| ६ | जनपदे आणि महाजनपदे | ४३ |
| ७ | मौर्यकालीन भारत | ४९ |
| ८ | प्राचीन भारतातील व महाराष्ट्रातील राज्ये व राजघराणी | ५४ |
| ९ | प्राचीन भारताचा सांस्कृतिक वारसा | ६५ |
| १० | प्राचीन भारत व जग | ७४ |

# १ इतिहासाची साधने




१.१ इतिहासाची जुळणी
१.२ भौतिक साधने
१.३ लिखित साधने
१.४ मौखिक साधने
१.५ प्राचीन भारताच्या इतिहासाचे स्रोत
१.६ महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालये आणि वारसास्थळे


**आपल्या देशाचा इतिहास खूप प्राचीन आहे, पण तो आपल्याला कसा कळला? आपले पूर्वज कसे राहायचे? त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना, त्यांची संस्कृती, समाज आणि राज्यव्यवस्था यांचा अभ्यास कसा केला जातो?**

असे प्रश्न तुम्हांला सुद्धा पडले आहेत का? तुम्हांला पडलेले प्रश्न लिहा.



**कल्पना करा.**

तुम्ही एका किल्ल्यात फिरत आहात. अचानक तुम्हांला जमिनीवर एक नाणे सापडले किंवा एखाद्या भिंतीवर लेख कोरलेला दिसला, एखाद्या झाडाच्या मुळाशी दडलेला खापराचा तुकडा दिसला, तर तुम्हांला नक्कीच प्रश्न पडेल की हे कोणत्या काळातील असेल? याचा अर्थ काय? या वस्तू आपल्याला भूतकाळाची कोणती गोष्ट सांगत असतील?

याच प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपण इतिहासाच्या विविध साधनांचा अभ्यास करतो.

हीच ती जादुई किल्ली जिच्यामुळे आपल्याला हजारो वर्षांपूर्वीच्या लोकांच्या जीवनात डोकावून पाहणे शक्य होते.

इयत्ता पाचवीमध्ये तुम्हांला याविषयी माहिती मिळाली आहे. आपण इतिहासात जे काही शिकतो तो इतिहास पुराव्यांच्या आधारे लिहितात. ज्या गोष्टींच्या आधारे इतिहासाचे पुरावे मिळतात, त्या गोष्टी इतिहासाची माहिती मिळवण्याचे स्रोत असतात.

## १.१ इतिहासाची जुळणी

इतिहासाची जुळणी म्हणजे तुकड्यातुकड्यांचे एखादे कोडे जुळवण्यासारखे आहे. भूतकाळातील नाणी, शिलालेख, चित्रे, मातीची भांडी अशा अनेक वस्तू या जणू त्या कोड्याचे छोटे छोटे तुकडे असतात. जेव्हा इतिहासकार हे तुकडे नीट जुळवतात, तेव्हा आपल्या भूतकाळाचे एक सुंदर चित्र तयार होते.

संशोधनाच्या स्रोतांच्या आधारे आपण भूतकाळातील घटना, विचार, संस्कृती आणि जीवनशैली जाणून घेऊ शकतो. या स्रोतांची विभागणी प्राथमिक साधने, दुय्यम साधने आणि मौखिक साधने अशी केली जाते.

**आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या वस्तू, कोरून ठेवलेले लेख, बांधलेल्या वास्तू तसेच त्या काळातील चालीरिती, परंपरा, लोककला, लोकसाहित्य, ऐतिहासिक कागदपत्रे या विविध साधनांमधून आपल्याला आपला इतिहास शोधून काढता येतो. या सर्वांना 'इतिहासाची साधने' असे म्हणतात.**

| प्राथमिक साधने | दुय्यम साधने | मौखिक साधने |
| --- | --- | --- |
| ही साधने थेट संबंधित काळातील असतात. | या साधनांमध्ये प्राथमिक साधनांचा अभ्यास करून माहिती दिलेली असते. | या साधनांमध्ये भूतकाळातील घटना, परंपरा, संस्कृती किंवा अनुभव तोंडी स्वरूपात पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेले असतात. |
| उदाहरणार्थ, शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूळ दस्तावेज (भूर्जपत्रे, करारपत्रे, पत्रे इत्यादी.) जुन्या वस्तू, शस्त्रे, जुन्या वास्तू, मंदिरे इत्यादी. | उदाहरणार्थ, इतिहासविषयक पुस्तके, लेख, माहितीपट, संशोधनपर निबंध, तज्ज्ञांची व्याख्याने, विश्वकोश इत्यादी. | उदाहरणार्थ, लोककथा, दंतकथा, लोकगीत, ओवी, भारूड, लावणी, पोवाडा, लोकनाट्य, कीर्तन, तमाशा इत्यादी. शौर्यकथा व वीरगाथा, ग्रामस्थांच्या, वृद्‌धांच्या आठवणी व अनुभव, प्रवासवर्णने, व्यापारी किंवा सैनिकांनी सांगितलेल्या कथा |
| महत्त्व : ही साधने इतिहास लिहिताना त्या काळाची यथातथ्य माहिती देतात. | महत्त्व : या साधनांमधून इतिहासाची सुसंगत माहिती मिळते. ही साधने संशोधकांनी विश्लेषण करून तयार केलेली असतात. | महत्त्व : लिखित पुरावे नसलेल्या काळातील लोकजीवन, परंपरा आणि संस्कृती समजण्यासाठी मौखिक साधनांचा उपयोग होतो. |

## १.२ भौतिक साधने



**करून पहा.**

तुमच्या घरातील जुन्या वस्तू तुमच्या घराचा किंवा कुटुंबाचा इतिहास सांगतात. उदाहरणार्थ, फोटो संग्रह, एखादे जुने भांडे, एखादे चित्र किंवा आजीची ठेवणीतील साडी हे सर्व एका पेटीमध्ये जतन करून ठेवा. त्याला आपण 'वारसा पेटी' असे म्हणू या. या वस्तू कशाचा इतिहास सांगतात, ते वर्गात सांगा.

या वस्तू म्हणजे इतिहासाची भौतिक साधने आहेत. **भौतिक साधने म्हणजे जी आपण डोळ्यांनी पाहू शकतो आणि हाताने स्पर्श करू शकतो अशी साधने.** या साधनांचा वापर इतिहासाच्या अभ्यासात फार महत्वाचा असतो. **भौतिक साधने त्या काळातील माणसांचे जीवन, संस्कृती, परंपरा, खेळ, कला आणि विज्ञान यांची माहिती देतात. ही साधने इतिहास संशोधनात प्राथमिक साधने म्हणून मानली जातात.** प्राचीन काळी माणसाने वापरलेल्या अनेक वस्तू आजही सापडतात. यात शिलालेख, ताम्रपट, जुनी नाणी, शस्त्रे, भांडी, दगडी किंवा धातूच्या मूर्ती, जुन्या इमारती, किल्ले, मंदिरे, पाणवठे इत्यादींचा समावेश असतो. ही सर्व 'भौतिक साधने' आहेत. ही साधने आजही पुरातत्वीय संग्रहालयात आणि ऐतिहासिक स्थळांवर पाहायला मिळतात. उत्खननात सापडलेले







भौतिक साधने

खापराचे तुकडे, त्यासाठी वापरलेली माती, त्यावरील लेप आणि रंगीत नक्षी किंवा कलाकृती यावरून ही भांडी कोणत्या काळातील असावीत, ती कशासाठी वापरली जात असावीत, हे शास्त्रीय पद्धतीच्या आधारे कळते. धान्य, फळांच्या बिया आणि प्राण्यांची हाडे यांच्या अवशेषांच्या आधारे त्या त्या काळातील आहारपद्धती जाणून घेता येते. कोरलेले शिलालेख हे तत्कालीन प्रशासन, धार्मिक व सामाजिक जीवन यांविषयी माहिती देतात. त्या काळातील शस्त्रे व संरक्षक तटबंदी, राजवाडे, पुरातन वास्तू यांचा अभ्यास केल्याने त्या काळातील संरक्षण व्यवस्था, लढाईच्या पद्धती आणि वास्तुकला यांची माहिती मिळते. तसेच जुनी नाणी किंवा मुद्रा यांच्या आधारे त्या काळातील अर्थव्यवस्था, राज्यकर्त्यांची नावे, धार्मिक परंपरा आणि कला यांवर प्रकाश टाकला जातो. याचाच अर्थ भौतिक साधने त्या काळातील मानवी जीवनाचा इतिहास समजून घेण्यासाठी महत्वाची आहेत.

## १.३ लिखित साधने

**लिहिलेल्या स्वरूपात जी साधने उपलब्ध आहेत, त्यांना आपण 'लिखित साधने' म्हणतो.** या लिखित साधनांमधून त्या काळातील भाषा, लिपी, संस्कृती, राजकीय धोरणे, समाजरचना, धार्मिक आणि सामाजिक विचारसरणी यांची माहिती मिळते.

अश्मयुगातील म्हणजे प्रागैतिहासिक काळात, माणसाला लिहिण्याची कला अवगत झालेली नव्हती. त्या काळातील माहिती आपण भौतिक साधनांच्या आधारे जाणून घेतो, परंतु जसजशी माणसाची आकलनक्षमता आणि भाषा विकसित होत गेली, तसतसे त्याने आपले अनुभव आणि माहिती चित्रांद्वारे व चिन्हांद्वारे व्यक्त करायला सुरुवात केली. हीच लेखनकलेची सुरुवात होती. पुढे लेखनपद्धती विकसित होण्यासाठी दीर्घ कालावधी लागला.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

इतिहास लिहिण्यासाठी ज्या काळातील लिखित पुरावे उपलब्ध असतात, तो काळ आपण 'ऐतिहासिक काळ' म्हणून ओळखतो. ज्या काळात लिपींचा उगम आणि विकास झालेला नव्हता, त्या काळाला 'प्रागैतिहासिक काळ' असे म्हणतात.

प्राचीन काळात व्यापारी, प्रवासी, राजे आणि विद्वान यांनी आपल्या अनुभवांच्या, घटनांच्या किंवा आदेशांच्या नोंदी करून ठेवल्या होत्या. लिखित साधनांमधून आपल्याला त्या काळातील लिपी, भाषा, लेखनशैली आणि लोकांचे आचार-विचार, परंपरा व जीवनपद्धती यांची माहिती मिळते. त्यातील काळाच्या नोंदींच्या आधारे कालखंडाची माहिती मिळते. या साधनांच्या आधारे इतिहासकार विश्लेषण करून त्या त्या कालखंडाचा इतिहास लिहितात. विविध संग्रहालये, ग्रंथालये आणि मंदिरे या ठिकाणी प्राचीन काळातील लिखित साधने पाहावयास मिळतात.



**करून पहा.**

तुमच्या आजी-आजोबांशी किंवा कुटुंबातील इतर वडीलधाऱ्यांशी बोला. त्यांच्या बालपणीच्या आठवणी, त्यांच्या गावातील/शहरातील कथा, सण-उत्सव, त्यांनी अनुभवलेली एखादी ऐतिहासिक घटना याविषयी जाणून घ्या आणि तुमच्या नोंदवहीत त्याची नोंद करून ठेवा म्हणजे तुम्हांला कळेल की इतिहास किती जिवंत आणि रंजक आहे.

## १.४ मौखिक साधने

**मौखिक साधने म्हणजे लिहून न ठेवता तोंडी सांगितली जाणारी माहिती.** ती समाजाच्या स्मृतीतून जपली जाते. यात लोककथा, दंतकथा, ओव्या, पोवाडे, म्हणी, लोकगीते यांचा समावेश होतो. काही वेळा मौखिक स्वरूपात एखाद्या समाजाचा इतिहास, जीवनशैली, सामाजिक घटना, सण-उत्सव यांचे वर्णन पिढ्यान्‌पिढ्या जतन झालेले असते. काही दंतकथा काल्पनिक असल्या, तरी त्या मागे काही ना काही सामाजिक, ऐतिहासिक संदर्भ दडलेले असतात. व्यक्तीची विचारसरणी आणि समूहाची विचारसरणी घडवण्यात मौखिक परंपरेचा सहभाग असतो. त्यामुळे इतिहासाच्या अभ्यासात मौखिक साधनांचा उपयोग करताना इतिहासकार त्या गोष्टी तपासून, तुलनात्मक पद्‌धतीने विचार करतात आणि इतर साधनांच्या मदतीने इतिहास लेखनासाठी त्याचा उपयोग करून घेतात.

## १.५ प्राचीन भारताच्या इतिहासाची साधने

प्राचीन कालखंड म्हणजे अश्मयुगीन काळापासून साधारणपणे इसवी सनाच्या आठव्या शतकापर्यंतचा कालखंड. अश्मयुगाचा इतिहास हा पूर्णपणे पुरातत्त्वीय उत्खननांमधून प्राप्त झालेल्या भौतिक साधनांवर अवलंबून आहे. त्यानंतरच्या काळातील इतिहास समजण्यासाठी लिखित साधनांचा खूप मोठा उपयोग होतो.

भारतीय इतिहासाची सर्वांत प्राचीन साधने म्हणजे वेद. सुरुवातीला वेद हे लिखित स्वरूपात नव्हते, ते मुखोद्‌गत करण्याचे तंत्र प्राचीन भारतीयांनी विकसित केले होते. कालांतराने वेदांचे लेखन झाले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांमध्ये देवतांची स्तुती, यज्ञविधी आणि सामाजिक जीवनाची माहिती मिळते. वेदांनंतर ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे यांची निर्मिती झाली. प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख या ग्रंथांद्‌वारे होते. तसेच रामायण आणि महाभारत ही महाकाव्येदेखील प्राचीन भारतीय इतिहासाची साधने आहेत.



**शोधा पाहू.**


संघम साहित्य हे तमिळ भाषेतील सर्वांत प्राचीन साहित्य आहे. त्याविषयी माहिती शोधून ती लिहा.

प्राचीन भारतात जैन आणि बौद्‌ध तत्त्वज्ञानाच्या आधारे मोठ्या प्रमाणात लिखित साहित्य तयार झाले. 'तिपिटके' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बौद्‌ध ग्रंथांमध्ये गौतम बुद्‌धांची शिकवण, भिक्खूंसाठीचे नियम आणि तात्त्विक चर्चा दिल्या आहेत. हे ग्रंथ पाली या प्राकृत भाषेत लिहिलेले आहेत. जैन धर्माचे ग्रंथ यात आगम साहित्य, ज्यात वर्धमान महावीर यांची शिकवण आणि अहिंसेचे महत्त्व यांचे वर्णन आहे. हे ग्रंथ अर्धमागधी या प्राकृत भाषेमध्ये लिहिलेले आहेत. या धार्मिक ग्रंथांबरोबरच काही ग्रंथ प्रशासन, नीतिनियम आणि कायदे तसेच समाजव्यवस्था यासंबंधी होते. लिहिलेली माहिती केवळ ग्रंथांमध्येच नसते, तर ती शिलालेखांवर आणि ताम्रपटांवरही कोरलेली असते. सम्राट अशोकाने अनेक शिलालेख तयार करून धर्मनीती आणि समाजनीती यांविषयीचे विचार प्रजेपर्यंत पोचवले. हे लेख प्रामुख्याने ब्राह्मी लिपीमध्ये कोरलेले आहेत. त्यातील काही लेख खरोष्ठी आणि अरेमाइक लिपींमध्ये कोरलेले आहेत. तसेच, जमिनीचे दान आणि करमाफी याविषयींचे आदेश ताम्रपटांवर कोरून ठेवले जात. या नोंदींमधून प्रशासनाची माहिती समजते.



**करून पहा.**

तुमचे, तुमच्या मित्र – मैत्रिणींची किंवा कुटुंबातील सदस्यांची नावे शेजारी दिलेल्या तक्त्याच्या आधारे ब्राह्मी लिपीत लिहा.



प्राचीन भारताविषयी माहिती मिळवण्यासाठी परदेशी प्रवाशांनी लिहिलेली प्रवासवर्णनेदेखील महत्त्वाची आहेत. त्यांनी इथे पाहिलेली शिक्षणव्यवस्था, धार्मिक जीवन, लोकजीवन इत्यादींचे सविस्तर वर्णन केले आहे. यामुळे आपल्याला त्या काळात भारतीयांचे जीवन कसे होते, हे समजते.

## १.६ महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालये आणि वारसास्थळे

### ■ महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालये

वस्तुसंग्रहालयात इतिहासाची साधने संग्रहित आणि प्रदर्शित केली जातात. महाराष्ट्रात अनेक प्रसिद्ध वस्तुसंग्रहालये आहेत. तिथे आपल्याला प्राचीन काळातील वस्तू, नाणी, शस्त्रे, चित्रकला, मूर्ती, हस्तलिखिते, वेशभूषा, हस्तकला आणि इतर ऐतिहासिक वस्तू पाहायला मिळतात. महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, मुंबई हे प्रसिद्ध आहे. येथे भारताच्या इतिहासाशी संबंधित अनेक वस्तू संग्रहित केलेल्या आहेत. पुण्यातील डेक्कन कॉलेज पदव्युत्तर आणि संशोधन संस्था येथील वस्तुसंग्रहालयात विविध काळांतील पुरातत्त्वीय वस्तू पाहावयास मिळतात. राजा दिनकर केळकर संग्रहालय येथे विविध घरगुती वस्तू, दागिने, शस्त्रे, वाद्ये, वस्त्रे आणि कलाकृती यांची दालने आहेत. त्या पूर्वीच्या काळातील लोकांच्या जीवनशैलीचे दर्शन घडवतात. नागपूरमधील मध्यवर्ती संग्रहालय, छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, कोल्हापूरचे श्री छत्रपती शाहू संग्रहालय, आणि साताऱ्यातील श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर जवळचे


छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय

अंजनेरी येथील शांती-कृष्ण म्युझियम ऑफ मनी अँड हिस्टरी इत्यादी ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण वस्तुसंग्रहालयांची काही उदाहरणे आहेत.

### ■ महाराष्ट्रातील वारसास्थळे

महाराष्ट्र हे एक समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असलेले राज्य आहे. युनेस्को या जागतिक स्तरावरील संस्थेने मान्यता दिलेली तसेच राज्य शासनाद्वारे संरक्षित अशी अनेक महत्त्वाची वारसास्थळे महाराष्ट्रात आहेत. ती आपल्या इतिहासाची गौरवशाली प्रतीके आहेत. सर्वांत प्रसिद्ध


अजिंठा लेणी

वारसास्थळ म्हणजे अजिंठा आणि वेरूळ येथील लेणी होत. ती युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत १९८३ साली समाविष्ट केली गेली. मुंबईजवळील घारापुरी लेणी, कान्हेरी लेणीदेखील प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी घारापुरी लेण्यांचा जागतिक वारसा म्हणून १९८७ साली समावेश केला गेला. मुंबईतील विशेष सुशोभन असलेल्या (आर्ट-डेको) ७६ इमारतींचा युनेस्कोच्या जागतिक स्थळांच्या यादीत २०१८ मध्ये समावेश करण्यात आला आहे.

मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे भव्य रेल्वेस्थानक ब्रिटिश काळातील ‘गोथिक’ स्थापत्यशैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. १९९७ साली हे जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित करण्यात आले.

‘पश्चिम घाट’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतरांगा जैवविविधतेने परिपूर्ण असून त्यांना २०१२ साली युनेस्कोने नैसर्गिक वारसास्थळ म्हणून मान्यता दिली आहे. येथे अनेक दुर्मीळ प्राणी, पक्षी आणि वनस्पती आढळतात.

युनेस्कोने नुकतेच ‘मराठा मिलिटरी लँडस्केप्स’ या नावाने १२ किल्ल्यांना जागतिक वारसास्थळ म्हणून मान्यता दिली आहे. त्यांपैकी ११ किल्ले महाराष्ट्रात आहेत. जिंजी हा किल्ला तमिळनाडू राज्यात आहे. हे किल्ले मराठा साम्राज्याच्या लष्करी कौशल्याची, स्थापत्यकलेची आणि सांस्कृतिक वारशाची महत्वाची प्रतीके मानले जातात.

महाराष्ट्रातील ही वारसास्थळे आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि परंपरेची प्रतीके आहेत. ही स्थळे ऐतिहासिक पर्यटनाचे आकर्षण आहेत आणि यांचा अभ्यास करून आपल्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा अभिमान वृद्धिंगत होतो.

### *तुमचे मत काय आहे?*

वारसास्थळांचे संवर्धन हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. त्यासाठी तुम्ही काय योगदान द्याल?



## स्वाध्याय

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. वर्धमान महावीर यांची शिकवण ........... या ग्रंथातून मिळते.

अ) उपनिषदे ब) तिपिटके

क) आगम साहित्य ड) संघम साहित्य

२. भारतीय इतिहासांची सर्वांत प्राचीन साधने म्हणजे .............. होय.

अ) आरण्यके ब) वेद


क) ब्राह्मणग्रंथ ड) उपनिषदे

**ब) योग्य जोड्या लावा.**

| **गट ‘अ’** | **गट ‘ब’** |
|---|---|
| १) लिखित साधने | अ) लोकगीते |
| २) भौतिक साधने | ब) परकीय प्रवाशांनी लिहिलेले प्रवासवर्णने |
| ३) मौखिक साधने | क) नाणी, शस्त्रास्त्रे |

**प्र.२ अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

**इतिहासाची साधने**



**ब) चित्र कोणत्या साधन प्रकारात मोडते ते लिहा.**



..................................................



...............................



...............................

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. इतिहासाच्या लिखित व मौखिक साधनांमधील फरक स्पष्ट करा.

२. भौतिक साधनांची नावे लिहून त्यांचे इतिहासाच्या अभ्यासातील महत्व लिहा.

३. आधुनिक काळातील कोणती साधने भविष्यातील पिढ्यांना इतिहास सांगू शकेल? ते लिहा.

प्र.४

अ. एखादी जुनी वस्तू जसे मूर्ती, राजमुद्रा, नाणी, भांडी, दागिने, कागदपत्रे, खेळणी इत्यादींवरून मानवी जीवनातील बदलाची कोणती माहिती मिळते ते लिहा.

ब) पुढील तक्ता पूर्ण करा.

| शहराचे / ठिकाणाचे नाव | वस्तू संग्रहालयाचे नाव | वैशिष्ट्ये |
|---|---|---|
| मुंबई | ............. | ..............<br>.............. |
| ............. | राजा दिनकर केळकर संग्रहालय | ..............<br>.............. |
| ............. | ..............<br>.............. | विविध पुरातत्त्वीय वस्तूंचे संग्रहालय |

कृती

- सण-उत्सवांशी संबंधित लोकगीते, कथा, पोवाडे, भारुडे, ओव्या यांचा संग्रह करून परिपाठात सादर करा.
- महाराष्ट्रातील 'वारसास्थळांचा' चित्रतक्ता करा आणि त्याचा उपयोग करून 'वारसा भिंत' तयार करा.

प्र.५ 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स' या नावाने जाहीर केलेल्या बारा किल्ल्यांची आंतरजालाच्या मदतीने नावे शोधा.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सा | ल्हे | र | ज | य | ग | ड | खां | तुं | ग | ळा | अ |
| कु | के | अ | व | ची | त | ग | ड | दे | न्हा | र | र्ना |
| ला | ळ | क | सु | व | र्ण | दु | र्ग | प | री | स | ळ |
| बा | ना | ह | वं | वा | रू | ग | ड | वा | स्ते | टा | सिं |
| वि | वि | रि | द | शी | भी | सि | मा | ल | व | ण | धु |
| ज | शा | श्चं | न | व | व | ह | पा | स | ड | प | दु |
| य | ळ | द्र | ग | ने | ग | ग | ली | ग | भो | र | र्ग |
| दु | ग | ग | ड | री | ड | ड | ह | ना | द | गि | री |
| र्ग | ड | ड | उं | दे | री | लो | वा | रू | ग | ड | रा |
| प्र | ता | प | ग | ड | तो | र | णा | कां | गो | री | य |
| व | स | ई | चा | की | ल्ला | क | म | ल | ग्ग | ड | ग |
| रा | जिं | जी | सिं | ख | ग | ड | रा | ज | ग | ड | ड |

१. रायगड

२. ______

३. ______

४. ______

५. ______

६. ______

७. ______

८. ______

९. ______

१०. ______

११. ______

१२. ______

उपक्रम

- तुमच्या गावाजवळील/ जिल्ह्याजवळील संग्रहालयाला भेट द्या. त्याचे अहवाललेखन करा.

***

# २ प्रागैतिहासिक काळ




२.१ प्राचीन भारत – भौगोलिक पार्श्वभूमी

२.२ प्रागैतिहासिक काळ

२.३ मध्याश्मयुग ते नवाश्मयुग

२.४ ताम्रपाषाणयुग

२.५ महाराष्ट्रातील उत्खनन स्थळे


विद्यार्थ्यांनो, क्षणभर डोळे मिटा आणि कल्पना करा, की तुम्ही एका अशा काळात राहता जिथे कोठेही मोबाईल नाही, गाडी नाही, खेळणी नाही, अगदी घर, गाव, शाळा, रस्ते काहीच नाही!



**सांगा पाहू!**

- अशा काळात तुम्ही राहिला असता, तर तुमचे दैनंदिन आयुष्य कसे असते?
- तुम्ही कोठे राहिला असता?
- अशा ठिकाणी कडाक्याच्या थंडीत ऊब मिळावी म्हणून तुम्ही काय केले असते?
- स्वयंपाक कसा केला असता?
- एखादा जंगली प्राणी तुमच्या दिशेने येताना दिसला असता, तर तुम्ही काय केले असते?

लाखो हजारो वर्षांपूर्वी आदिमानवाच्या काळात त्याला अशाच परिस्थितीला तोंड द्यावे लागत असे. आज आपण जे काही पाहतो, ज्या सुखसोयींचा उपभोग घेतो, त्या मिळवण्यासाठी लाखो वर्षे जावी लागली. या काळाच्या टप्प्यात भटक्या अवस्थेतून स्थिर जीवनाकडे, जंगलातून गावांकडे आणि पुढे प्रगत संस्कृतींपर्यंतचा अद्‌भुत इतिहास सामावलेला आहे. चला, मानवाच्या या अगदी सुरुवातीच्या अवस्थेविषयी टप्प्याटप्प्याने ओळख करून घेऊ या.



**तुम्हांला आठवते का?**

यापूर्वी तुम्ही मानवाच्या उत्क्रांतीतील टप्पे आणि आदिमानवाचे जीवन, आहारपद्धती, हत्यारे, कला इत्यादींविषयी अभ्यास केला होता. त्यातील तुम्हांला कायकाय आठवते आहे याची वर्गात उजळणी करा.


## २.१ प्राचीन भारत – भौगोलिक पार्श्वभूमी




मानवी इतिहासाच्या विकासात त्या त्या प्रदेशांतील भौगोलिक परिस्थितींचा अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. ज्या प्रदेशात मानव राहतो, तेथील पर्वत,

नद्या, हवामान, जमीन आणि नैसर्गिक साधनसंपत्ती तेथील मानवी समूहाच्या जीवनपद्धती घडवतात. कोणती पिके घ्यावीत, कोणते प्राणी पाळावेत, कोठे वस्ती करावी, दळणवळण कसे असावे हे सर्व त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांवर अवलंबून असते. प्राचीन भारतामध्ये मानवी संस्कृतीचा विकास विविध स्वरूपांत झाला. त्याचे प्रमुख कारण भारताचे भौगोलिक वैविध्य हे होय.

भारत हा एक विशाल देश असून विविधतेने नटलेला आहे. उत्तरेकडील वादळी वारे, वावटळी, गोठवणारी थंडी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींपासून हिमालयाच्या उंच उंच पर्वतरांगा रक्षण करतात. उत्तर भारतात हवामान थंड व कोरडे असते, तर दक्षिण भारतात हवामान उष्ण व आर्द्र असते. त्यामुळे शेतीच्या पद्धती, पिके आणि मानवी समूहांची जीवनशैली यांत वेगळेपण दिसून येते.



भारतातील नद्यांमुळे तयार झालेल्या गाळाच्या सुपीक जमिनीत प्राचीन काळी शेतीचा विकास झाला. मध्य भारतातील विस्तृत पठार आणि गंगा-यमुनेच्या दुआबाचा मैदानी प्रदेश हे भारतातील शेतीला सर्वाधिक अनुकूल ठरले.

दख्खनच्या पठारावरील जमीन सुपीक आहे. तिला काळ्या मातीची जमीन म्हणून ओळखली जाते. या प्रदेशात ताम्रपाषाण संस्कृतींचा विकास झाला. प्राचीन महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन वसाहती, शेती आणि जीवनशैली यांना गोदावरी, कृष्णा यांसारख्या नद्या आणि त्यांच्या उपनद्या आधारभूत ठरल्या.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अरबी समुद्र आणि पूर्वेला बंगालचा उपसागर असल्याने सागरी व्यापाराला प्राचीन काळापासूनच चालना मिळाली. त्यामुळे दूरवरच्या प्रदेशांशी आणि संस्कृतींशी भारतीयांचा संपर्क आला.

या विविध भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे भारतात अनेक संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती निर्माण झाल्या.

## २.२ प्रागैतिहासिक काळ

गेल्या वर्षी तुम्ही शिकला आहात की 'एप' वानराच्या काही प्रजाती उत्क्रांत होत होत मानवाची निर्मिती झाली. सुरुवातीच्या या मानवाला 'आदिमानव' असे म्हणतात.

आदिमानवाचे जीवन अत्यंत कठीण होते. तो भटक्या अवस्थेत असल्याने सतत अन्न आणि पाणी, यांच्या शोधात फिरत असे. अन्नासाठी तो शिकार करत असे. फळे, कंदमुळे गोळा करत असे. त्याची हत्यारे लाकूड, दगड किंवा हाडे यांपासून बनवलेली असत. आदिमानव हातवारे, विविध प्रकारांचे आवाज किंवा हावभाव यांच्या साहाय्याने संवाद साधत असावा.

या काळास **प्रागैतिहासिक काळ** म्हणून ओळखले जाते. मागील पाठात तुम्ही माहिती घेतली आहे, की ज्या काळात लिपींचा उगम किंवा विकास झालेला नव्हता, त्या काळाला 'प्रागैतिहासिक काळ' असे म्हणतात.

या काळात मानवाने लक्षणीय प्रगती केली. त्याच्या जीवनाचा अभ्यास मुख्यत्वे दगडी हत्यारे, हाडे, मातीची भांडी, गुहाचित्रे या पुराव्यांच्या आधारे केला जातो. मानवाच्या साधनांमध्ये, जीवनशैलीत, अन्नपद्धतीत आणि वस्तीच्या स्वरूपांत बदल होत गेले.

**मानवाच्या उत्क्रांतीमधील महत्त्वाचे टप्पे –**

कुशल मानव (होमो हॅबिलिस) → ताठ कण्याचा मानव (होमो इरेक्टस्) → शक्तिमान मानव (निॲंडरथल मॅन) → बुद्धिमान मानव (होमो सेपियन) → प्रगत बुद्धीचा मानव (होमो सेपियन सेपियन)



**माहीत आहे का तुम्हांला?**

तुम्हांला एक गंमत माहिती आहे का? 'यती' हा हिमालयात राहणारा एक गूढ आणि मोठा केसाळ प्राणी आहे अशी दंतकथा आहे. त्याला 'हिममानव' असे म्हणतात. अनेक वेळा या परिसरात मोठ्या आकाराच्या पाऊलखुणा दिसल्याचे म्हटले जाते. पण या आढळलेल्या पाऊलखुणा हिमालयातील अस्वलांच्या किंवा इतर प्राण्यांच्या असल्याचे संशोधनातून दिसते. तरीही मानवशास्त्रज्ञ या कथांचा अभ्यास करतात कारण अशा दंतकथा संस्कृती, परंपरा आणि लोकांच्या कल्पनाशक्ती यांबद्दल बरंच काही सांगतात.

### ■ अश्मयुग

ज्या काळातील हत्यारांमध्ये प्रामुख्याने दगडाची हत्यारे मिळतात, त्या काळाला आपण 'अश्मयुग' असे म्हणतो. 'अश्म' म्हणजे दगड.

**विचार करा.**

अश्मयुगीन मानवाने दगडी हत्यारांचा उपयोग कोणकोणत्या कारणांसाठी केला असेल?

मानवाने दगडी गोटे तासून तोडहत्यारे तयार केली असावीत. कठीण कवचाची फळे किंवा आतल्या मगजासाठी हाडे फोडणे यासाठी तो या तोडहत्यारांचा वापर करत असावा. दगडाला आकार देणे हे त्याच्या बुद्धीच्या विकासाचे लक्षण आहे. हत्यारांचे आकार आणि प्रकार यांवरून अश्मयुगाच्या काळाचे तीन कालखंड पाडले जातात – पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुग.

### ■ पुराश्मयुग

पुराश्मयुगातील मानव पूर्णपणे निसर्गावर अवलंबून होता. या काळात तो गुहांमध्ये किंवा मोठ्या झाडांच्या फांद्यांवर राहत असे. पुराश्मयुगातील सुरुवातीची हत्यारे ओबडधोबड होती. ज्यांचा वापर शिकार करणे, खरवडणे, खणणे इत्यादी कामांसाठी तो करत असे. मानवाच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे अग्नीचा शोध, तो याच काळात लागला.

**विचार करा.**

अग्नीचा वापर करायला शिकल्यामुळे मानवाच्या जीवनात कोणते बदल झाले असतील? विचार करा आणि लिहा.

- अन्न शिजवता येऊ लागले, त्यामुळे ते पचायला सोपे झाले.
- -------------------------
- -------------------------
- -------------------------

पुराश्मयुगीन हत्यारे नदीच्या किंवा ओढ्याच्या काठांवर मिळतात. महाराष्ट्रातील पुराश्मयुगीन स्थळांपैकी नाशिकजवळचे गंगापूर आणि नेवाशाजवळचे चिरकी–नेवासा ही स्थळे प्रसिद्ध आहेत.

## २.३ मध्याश्मयुग ते नवाश्मयुग

### ■ मध्याश्मयुग

या काळात बुद्धिमान मानवाने डोंगरांच्या कडेकपाऱ्यांतून निर्माण झालेल्या नैसर्गिक गुहांमध्ये आणि शैलाश्रयांमध्ये आश्रय घेतला. शैलाश्रय म्हणजे डोंगराच्या पुढे आलेल्या कपारी. तेथे तो समूह करून राहू लागला. या काळात दगडी हत्यारे बनवण्याच्या तंत्रात चांगलीच प्रगती झाली. हत्यारांचा आकार लहान बनला. वेगवेगळ्या प्रकारचे दगड तो आता वापरू लागला. शिकार, मासेमारी, कापणी, तोडणी अशा अनेक प्रकारच्या कामांसाठी ही हत्यारे उपयोगी होती. तो शिंगे आणि हाडे घासून धारदार हत्यारे बनवू लागला. मानवाने कुत्रा, शेळी, मेंढ्या या प्राण्यांना माणसाळवण्याची सुरुवात केली. कुत्रा हा पहिला माणसाळवलेला प्राणी! मासेमारीची सुरुवातही याच काळात झाली. पुढे तो गुहेत किंवा हंगामी तळ करून राहू लागला. हा काळ म्हणजे भटक्या जीवनातून स्थिर जीवनाकडे जाणाऱ्या प्रवासाचा संक्रमण काळ होय. महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातील पाटणे हे महत्त्वाचे मध्याश्मयुगीन स्थळ आहे.

**सांगा पाहू !**

दिलेल्या चित्राचे निरीक्षण करा. त्यावर वर्गात चर्चा करा.



नैसर्गिक गुहा

## नवाश्मयुग

नवाश्मयुगात हत्यारे बनवण्याच्या तंत्रात आणखी प्रगती झाली. त्यात घासून गुळगुळीत केलेल्या 'कुऱ्हाड' या एका नव्या दगडी हत्याराची भर पडली. पुराश्मयुगात कुऱ्हाडीच्या पात्यांच्या आकारांची हत्यारे होती, परंतु आता मानवाने त्यात दांडा बसवण्याची युक्ती शोधून काढली. आधुनिक कुऱ्हाडीचे हे प्रारूप म्हणावे लागेल.


नवाश्मयुगीन कुऱ्हाड


टोकदार काठीने पेरणी करणाऱ्या स्त्रिया

या काळातील सर्वांत मोठा बदल म्हणजे शेतीच्या तंत्रात झालेली प्रगती. मध्याश्मयुगामध्ये नैसर्गिकरीत्या उगवलेल्या धान्याची कापणी करायला मानव शिकला होता. नवाश्मयुगात योग्य ऋतूमध्ये धान्य पेरणे त्याने सुरू केले. या काळात पेरणी करण्यापासून ते कापणी करण्यापर्यंत त्याला एका ठिकाणी राहणे भाग होते. त्यामुळे काही काळ तो एके ठिकाणी राहू लागला. त्यातूनच हळूहळू गाव-वसाहतींचा उदय झाला.

**करून पहा.**

पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुगात मानवाच्या जीवनशैलीत झालेला बदल दर्शवणारा तुलनात्मक तक्ता तयार करा.

शेतीचा शोध ही नवाश्मयुगातील महत्त्वाची घडामोड आहे. या काळात अन्नधान्य, दूध यांचे उत्पादन करण्याची कला मानवाने आत्मसात केली होती. शेतीची सुरुवात करण्याचे श्रेय स्त्रियांना दिले जाते. टोकदार काठीच्या आधाराने स्त्रियाच बी पेरण्याचे काम करत असाव्यात. पेरणी करण्यासाठी वापरण्याच्या टोकदार काठीला पुरेसे वजन मिळून जमिनीत खोलवर खणता यावे, म्हणून त्या काठ्यांना मधोमध छिद्र असलेले दगड बसवले जातात. काही आदिवासी जमातींमध्ये स्त्रिया अजूनही अशा पद्धतीने पेरणी करतात. गरजेपुरते अन्नधान्य मिळू लागल्याने मानवाची नित्याची भटकंती थांबली. शेतीमुळे मिळालेल्या स्थिरतेमुळे पिकलेले अन्नधान्य दीर्घ मुदतीसाठी साठवता येणे शक्य झाले. समूहातील सर्वांची गरज भागूनही शिल्लक उरेल इतके धान्य मिळू लागले. त्यामुळे, समूहातील काही स्त्री-पुरुषांना नवीन गोष्टींचा शोध घेऊन, कल्पकतेच्या आधारे नवीन कौशल्ये विकसित करण्यासाठी पुरेसा वेळ मिळू लागला. जीवनाला स्थैर्य लाभल्यामुळेच मानवाला अनेक क्षेत्रांत प्रगती करता आली.

शेतीच्या बरोबरीने मानव प्राण्यांना माणसाळवण्यास शिकला. काही प्राण्यांचा कष्टांच्या कामांसाठी आणि ओझी वाहून नेण्यासाठी उपयोग केला गेला.

शेतीच्या विकासाबरोबरच मातीची भांडी घडवण्याची कला अस्तित्वात आली. वेगवेगळ्या आकारांची व रंगांची भांडी तयार करून त्यावर सुंदर कलाकुसरीचे काम मानव करू लागला. कापड विणण्याची कला याच वेळी मानवाने अवगत केली. लाकडाच्या होड्या करून पाण्यावर संचार करण्याचे तंत्र तो नवाश्मयुगात शिकला.

नवाश्मयुगात शेतीच्या विकासाबरोबर नद्यांच्या काठांनी असलेल्या सुपीक प्रदेशांत मानव स्थायिक होऊ लागला. त्याची भ्रमंती थांबली. कुटुंब ही संस्था या काळात आकार घेऊ लागली.

## २.४ ताम्रपाषाणयुग

मानवाला तांबे या धातूचा शोध लागला. तांब्याचा वापर सुरू झाला. मात्र या काळात दगडांच्या हत्यारांचाही उपयोग केला जात होता. म्हणून या कालखंडास 'ताम्रपाषाणयुग' असे म्हटले जाते. ताम्रपाषाणयुगात चाकाचा शोध लागला. चाकांमुळे दळणवळण जलद व सुलभ झाले. या काळात मोठ्या प्रमाणात जमीन लागवडीखाली आणली गेली.

सामानाची ने-आणसुद्धा सुरू झाली. व्यापारात वाढ झाली. ताम्रपाषाणयुगात व्यापारउदीम वाढला, त्याचप्रमाणे कौशल्यावर आधारित लाकूडकाम, धातुकाम असे व्यवसाय सुरू झाले. त्यातून व्यापारी केंद्रे निर्माण झाली आणि त्यांचा विस्तार होऊन नगरे निर्माण झाली.

ताम्रपाषाणयुगीन मानव गहू, ज्वारी, तांदूळ, कडधान्ये, कापूस यांचे उत्पादन घेत होता. तो शिकार आणि मासेमारीही काही प्रमाणात करत होता, पण या गोष्टी त्याच्या निर्वाहाचे प्रमुख साधन नव्हत्या. शेतीला पूरक असणारे पशुपालन हादेखील त्यांच्या आयुष्याचा मुख्य भाग झाला.

या काळात मृत व्यक्तीचे दफन घरामध्ये किंवा घरातील अंगणातच केले जात असे. दफनप्रसंगी कधीकधी मृताच्या शेजारी त्याच्या नेहमीच्या वापराच्या वस्तू व भांडी ठेवलेली आढळतात.

## २.५ महाराष्ट्रातील उत्खनन स्थळे

महाराष्ट्रामध्ये ताम्रपाषाण संस्कृतीची स्थळे तापी, गोदावरी, कृष्णा, भीमा, प्रवरा इत्यादी नद्यांच्या काठांवर सापडली आहेत. येथे दगडांची हत्यारे, मातीची भांडी, तांब्याच्या वस्तू, धान्यांची साठवण करण्यासाठी हाताने घडवलेले रांजण हे पुरावे उत्खननात सापडले आहेत.

| महत्वाची उत्खनन स्थळे | उत्खननातील मुख्य पुरावे |
|---|---|
| दायमाबाद (जिल्हा - अहिल्यानगर)<br>दायमाबाद हे महाराष्ट्रातील सर्वांत प्रसिद्ध आणि संशोधनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे स्थळ आहे. या स्थळाचा शोध भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्यातील बी. पी. बोपर्डीकर यांनी लावला. | कांस्य धातूच्या चार वस्तू मिळाल्या. गाड्याला जुंपलेला बैल, रेडा, गेंडा व हत्ती अशा त्या चार वस्तू आहेत. आता या वस्तू 'दायमाबाद ब्राँझेस' म्हणून ओळखल्या जातात. |
| इनामगाव (जिल्हा - पुणे)<br>इनामगाव हे विकसित ताम्रपाषाण गाव-वसाहतीचे उत्तम उदाहरण आहे. या स्थळाचे उत्खनन पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. ह. धी. सांकलिया, डॉ. झेड. डी. अन्सारी आणि डॉ. म. के. ढवळीकर यांनी केले. | गहू, बार्ली, तांदूळ, कडधान्ये, बाजरी आणि तीळ यांच्या लागवडीचे पुरावे सापडले आहेत.<br>गुरेढोरे, मेंढ्या आणि शेळ्या यांसारख्या पाळीव प्राण्यांची हाडे सापडली, तसेच वन्य प्राण्यांच्या शिकारीचे (उदाहरणार्थ, हरीण, नीलगाय, डुक्कर) आणि मासेमारीचे पुरावे सापडले.<br>चाकावर बनवलेली लाल व काळ्या रंगांची भौमितिक आकृतींची नक्षीकाम असलेली मातीची भांडी.<br>वैशिष्ट्यपूर्ण बाब - दोन मडक्यांची तोंडे एकमेकांना जोडून त्यात लहान मुलांचे दफन करण्याची पद्धत आढळली. |

| | |
|---|---|
| जोर्वे (जिल्हा – अहिल्यानगर)<br>जोर्वे संस्कृती ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध ताम्रपाषाणयुगीन संस्कृती आहे. या संस्कृतीचे पहिले पुरावे जोर्वे येथे सापडले. या स्थळाचे उत्खनन पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. ह. धी. सांकलिया आणि डॉ. शां. भा. देव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. | लाल रंगावर काळ्या रंगाची नक्षीकाम असलेली मातीची भांडी, तांब्याचे कडे, मणी.<br>घरांची गोल किंवा आयताकृती रचना, तसेच धान्य साठवण्यासाठी मातीच्या कोठ्या. ज्वारीच्या लागवडीचे पुरावे आढळले. |
| सावळदा (जिल्हा – नंदुरबार)<br>सावळदा संस्कृती महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्यांची एक सर्वांत जुनी संस्कृती. सावळदा स्थळाचे उत्खनन पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ.ह.धी. सांकलिया यांनी केले. | लाल रंगाची मातीची भांडी, त्यावर काळ्या रंगात नक्षीकाम केलेले दिसते. |
| नेवासा (जिल्हा – अहिल्यानगर)<br>नेवासा हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे ताम्रपाषाणयुगीन उत्खनन स्थळ आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे माजी महानिदेशक डॉ. एम. एन. देशपांडे यांनी या स्थळाचा शोध लावला. | मातीची रंगीत भांडी, दगडी कुऱ्हाडी, तांब्याच्या दागिन्यांचे अवशेष, गाय, शेळी, मेंढी, बैल या प्राण्यांचे अवशेष आढळलेले आहेत. |



**शोधा पाहू.**

महाराष्ट्रात वरील तक्त्यातील उत्खननस्थळे कोणत्या नद्यांच्या काठी आहेत ते आंतरजालाच्या साहाय्याने शोधा.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) नावे लिहा.**

१. भारतातील काळ्या मातीची जमीन असलेले पठार -----------

२. भारतातील शेतीला सर्वाधिक अनुकूल ठरलेला प्रदेश -----------

३. लिपींचा उगम किंवा विकास झालेला नव्हता तो काळ -----------

४. दायमाबाद या उत्खननस्थळाचा शोध लावणारे भारतीय पुरातत्व सर्वेक्षक -----------

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १. पुराश्मयुग | अ) मोठे धारदार हत्यार |
| २. मध्याश्मयुग | ब) चाकाचा शोध |
| ३. नवाश्मयुग | क) शेती तंत्रात प्रगती |
| ४. ताम्रपाषाणयुग | ड) अग्नीचा शोध |

**प्र.२ अ) खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | वैशिष्ट्ये | मध्याश्मयुग | नवाश्मयुग |
|---|---|---|---|
| १. | निवास | गुहा | ----------- |
| २. | व्यवसाय | ----------- | शेती, पशुपालन |
| ३. | साधने | लहान आकाराची हत्यारे | ----------- |
| ४. | कला | ----------- | मातीची रंगीत भांडी |
| ५. | जीवनशैली | भटकंती | ----------- |

**ब) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा.**

१. जोर्वे येथे कांस्य धातूच्या चार वस्तू मिळाल्या.

------------------------------------

२. नेवासा येथे जोर्वे संस्कृतीचे पहिले पुरावे सापडले.

------------------------------------

३. महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्यांची एक जुनी ताम्रपाषाणयुगीन संस्कृती इनामगाव येथे आहे.

------------------------------------

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नवाश्मयुगात मानवाची जीवनशैली कशी बदलली?

२. ताम्रपाषाणयुगाची प्रमुख वैशिष्ट्ये कोणती?

**ब) खालील युगांची प्रत्येकी दोन वैशिष्ट्ये लिहा.**

१. पुराश्मयुग

२. मध्याश्मयुग

**प्र.४ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. जर नवाश्मयुगीन मानवाने शेती तंत्रज्ञान शोधले नसते, तर आजचे मानवी जीवन कसे असते? कारणासह उत्तर द्या.

२. नवाश्मयुगात कोणते तंत्रज्ञान विकसित झाले, ज्यामुळे मानवाचे दैनंदिन जीवन बदलले?

**प्र.५ तुम्हांला नवीन घर घ्यायचे आहे. त्यासाठी कोणकोणत्या जीवनावश्यक बाबींचा विचार करून तुम्ही नवीन घर घ्याल?**

उदाहरणार्थ, पाणी

**कृती–**

- कुशल कारागीर चाकाच्या मदतीने मातीची भांडी बनवताना कोणकोणत्या कृती करतात, हे जाणून घेण्यासाठी त्यांना शाळेत आमंत्रित करून त्यांची मुलाखत घ्या. काही वस्तू तुम्ही स्वत: बनवून पाहा.
- आपल्या देशाच्या विकासात भौगोलिक परिस्थितीचा महत्वाचा वाटा आहे. याविषयी पुढील मुद्द्यांच्या आधारे माहिती वहीत लिहा.
  १. भारतातील पर्वतरांगा
  २. भारतातील नद्या
  ३. भारताला लाभलेला समुद्रकिनारा

**उपक्रम**

१. महाराष्ट्रातील उत्खननस्थळे महाराष्ट्राच्या नकाशात दाखवा.

२. जर मी आदिमानव असतो तर.... कुठे राहिलो असतो? काय खाल्ले असते? यावर आधारित नाट्य किंवा भूमिकापालन (रोल–प्ले) सादर करा.

***

# ३ हडप्पा संस्कृती



३.१ कालखंड
३.२ स्थान आणि विस्तार
३.३ लोकजीवन
३.४ हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे

भारतीय उपखंडात सुमारे ४५०० वर्षांपूर्वी एक नागरी संस्कृती विकसित झाली. तिला आपण 'हडप्पा संस्कृती' म्हणतो. आश्चर्य म्हणजे, ही संस्कृती इतकी प्रगत होती की त्या संस्कृतीच्या नगरांमध्ये स्वच्छ व रुंद रस्ते, सुनियोजित नगररचना, समृद्ध व्यापार, आणि लेखन यांचा उपयोग केला होता. हजारो वर्षांपूर्वीही आपल्या पूर्वजांची जीवनशैली अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रगल्भ होती हे आपल्याला हडप्पा संस्कृतीमुळे समजते.



**सांगा पाहू!**

तुम्हांला नागरी संस्कृतीविषयी माहिती आहे, त्याबद्दल वर्गात चर्चा करा.

- हडप्पा काळात नगरांची आखणी कशी होती?
- लोकांचे जीवनमान कसे होते?
- व्यापार व्यवस्था आणि शेतीचे तंत्र कशा पद्धतीचे होते?
- या शहरांचा ऱ्हास का व कसा झाला?

चला, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे समजून घ्यायला इतिहासाच्या खिडकीतून थेट हडप्पा संस्कृतीच्या काळात डोकावून पाहू या.

'संस्कृती म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारे विकसित झालेली जीवनपद्धती.' या वाक्यावरून तुम्हांला काय बोध होतो यावर वर्गात चर्चा करा.

संस्कृती एक सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था असते. आपण मागील पाठात नदीकाठच्या संस्कृती कशा प्रकारे उदयास आल्या ते जाणून घेतले. त्या हळूहळू विकसित होत होत नागरी संस्कृतीत त्यांचे रूपांतर झाले. त्यातीलच एक प्राचीन आणि प्रगत संस्कृती आहे हडप्पा संस्कृती. या संस्कृतीची अनेक स्थळे सिंधू नदीच्या खोऱ्यात सापडली म्हणून तिला 'सिंधू संस्कृती' असेही म्हटले जाते. पुरातत्त्वशास्त्रातील पद्धतीनुसार एखाद्या संस्कृतीचे पुरावे दर्शवणारे पहिले उत्खनन ज्या शहरात होते, त्या शहराचे नाव त्या संस्कृतीला दिले जाते. पंजाब येथील रावी नदीच्या काठी हडप्पा येथे सन १९२१मध्ये उत्खनन प्रथम सुरू झाले, म्हणून या संस्कृतीला 'हडप्पा संस्कृती' हे नाव मिळाले.

### नद्यांकाठच्या संस्कृती

नवाश्मयुगात मानवाचे जीवन शेतीवर अधिक प्रमाणात अवलंबून होते. त्यामुळे स्थिर जीवनाला सुरुवात झाली. मानवाने गाव वसाहती निर्माण केल्या.


**मानवाने गाव – वसाहत कोठे वसवली असेल?**
जिथे मुबलक पाणी, सुपीक जमीन, दळणवळण व्यवस्था असेल अशा ठिकाणी, म्हणजेच नद्यांच्या काठांवर गाव-वसाहती स्थापन केल्या. जगातील प्राचीन संस्कृती टायग्रिस-युफ्रेटिस (मेसोपोटेमिया) नाईल (इजिप्त), होयांग हो (चीन), सिंधू (हडप्पा) या नद्यांजवळच विकसित झाल्या.

## ३.१ कालखंड

कल्पना करा, आपण हजारो वर्षांपूर्वीच्या काळात प्रवेश करत आहोत. हडप्पा संस्कृतीचा इतिहास केवळ एका कालखंडाचा नसून ती मानवी संस्कृतीच्या इतिहासाची एक यात्रा आहे. या कालखंडात विविध घडामोडी घडल्या, सामाजिक आणि सांस्कृतिक बदल होत गेले आणि ही संस्कृती टप्प्याटप्प्याने समृद्‌ध होत गेली, परंतु नंतर विविध आपत्तींना सामोरे जावे लागल्यामुळे या संस्कृतीचा ऱ्हास होत गेला. म्हणजेच काय तर या संस्कृतीच्या कालखंडामध्ये विविध घडामोडी घडल्या, त्यामुळे हडप्पा संस्कृतीचा विकास, उत्कर्ष आणि अखेरीस ऱ्हास झाला.

आपण हडप्पा संस्कृतीच्या तीन महत्त्वपूर्ण टप्प्यांचा शोध घेऊ या.

हडप्पा संस्कृतीचा काळ साधारणपणे खालीलप्रमाणे विभागला जातो :




**हडप्पा संस्कृतीच्या गाव वसाहती –** प्रारंभीचा काळ हा पूर्व हडप्पा संस्कृतीचा काळ (इसवी सनपूर्व सुमारे ३३०० ते २६००) म्हणून ओळखला जातो. या काळात हळूहळू गावाकडून शहराकडे विकास होत गेला आणि 'नागरीकरणाच्या' प्रक्रियेला सुरुवात झाली.

**प्रगल्भ हडप्पा संस्कृतीचा समृद्‌ध काळ –** प्रगल्भ हडप्पा संस्कृतीचा समृद्‌ध काळ (इसवी सनपूर्व सुमारे २६०० ते १९००), हा काळ हडप्पा संस्कृतीचा सुवर्णकाळ मानला जातो. शहरांची रचना, व्यवस्थापन, व्यापार, हस्तकला, शिल्पकला यांचा विकास झाला. मोहेंजोदडो, हडप्पा, धोलावीरा, लोथल यांसारखी संस्कृतीची प्रमुख केंद्रे यावेळी विकसित झाली.

**हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाचा काळ –** उत्तर हडप्पा संस्कृतीचा काळ (इसवी सनपूर्व सुमारे १९०० ते १३००), या काळात हळूहळू हडप्पा संस्कृतीचा ऱ्हास व्हायला सुरुवात झाली. तेथील प्रमुख केंद्रे उद्‌ध्वस्त झाली. काही ठिकाणी मात्र जे अवशेष आढळले त्यावरून बदलत्या संस्कृतीचे स्वरूप लक्षात येते.




**शोधा पाहू.**

'हडप्पा संस्कृती' या नकाशात प्राचीन भारतात हडप्पा संस्कृतीचा प्रसार कोठे झाला होता ते दाखवा. हडप्पा, मोहेंजोदडो, लोथल, कालीबंगन, धोलावीरा, राखीगढी ही शहरे कोणत्या भागात आहेत? ही स्थळे सध्याच्या कोणत्या भागात आहेत याची नोंद करा.

## ३.२ स्थान आणि विस्तार

हडप्पा संस्कृतीच्या वसाहती सिंधू नदीच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणावर सापडतात. नद्यांकाठच्या सुपीक जमिनीमुळे शेतीला चालना मिळाली. नदीकिनारी गाव वसाहती स्थापन झाल्या. हडप्पा संस्कृतीत हडप्पा, मोहेंजोदडो, कालीबंगन, लोथल, धोलावीरा,




राखीगढी, बनावली आणि चन्हुदडो इत्यादी महत्त्वाची स्थळे आहेत. या संस्कृतीचा भौगोलिक विस्तार सुमारे १५ लाख चौरस किलोमीटर एवढा होता. हडप्पा संस्कृतीचा विस्तार उत्तरेकडे जम्मू काश्मीरमधील मंडापासून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील गुजरातमधील धोलावीरा आणि लोथल, तसेच महाराष्ट्राच्या अहिल्यानगरजवळ दायमाबादपर्यंत पसरलेला होता. पश्चिमेला बलुचिस्तानपर्यंत (आजचा पाकिस्तान) हडप्पा संस्कृती पोचली होती, तर पूर्वेला हडप्पा संस्कृतीचा विस्तार उत्तर प्रदेशातील आलमगीरपूरपर्यंत होता. दूरवरच्या प्रदेशांशी असलेला व्यापार हे हडप्पा संस्कृतीच्या विस्ताराचे प्रमुख कारण होते.

### ३.३ लोकजीवन

हडप्पा संस्कृतीच्या स्थळांच्या उत्खननात मिळालेल्या पुराव्यांमुळे तेथील लोकजीवनाची माहिती मिळते. जे भौतिक पुरावे पुढे आलेले आहेत, त्यावरून त्यांची जीवनपद्धती शिस्तबद्ध होती असे दिसते. नगररचना, सुव्यवस्थित रस्ते, घरबांधणी, सांडपाण्याची उत्तम व्यवस्था, लेख असलेल्या मुद्रा, मातीची उत्तम दर्जाची भांडी, विविध प्रकारची खेळणी ही हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत.

## राहणीमान व घरांची रचना

हडप्पा संस्कृतीच्या लोकांची घरे पक्क्या विटांची बांधलेली असत.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

हडप्पा संस्कृतीतील लोकांनी त्यांच्या घरांच्या बांधकामासाठी जी पद्धत वापरली होती त्या पद्धतीला 'इंग्लिश बाँड' पद्धती असेही म्हटले जाते. या पद्धतीत आडव्या आणि उभ्या विटा अशा वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने रचल्या जात, ज्यामुळे भिंती अधिक मजबूत आणि टिकाऊ बनत. विटा प्रमाणबद्ध आकाराच्या होत्या. एक वीट साधारपणे १:२:४ या प्रमाणात असायची. हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी ही पद्धत वापरण्याचे कारण म्हणजे त्यांना त्यांच्या घरांना पूर, भूकंप आणि कालांतराने होणारी झीज यांपासून संरक्षण मिळावे असे वाटत होते.

घरांमध्ये मध्यवर्ती अंगण, त्याच्याभोवती खोल्या, प्रवेशद्वारापाशी विहीर आणि शौचालय असायचे. पाणीपुरवठ्याची व सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था अगदी उत्तम होती. प्रत्येक घरातून सांडपाणी बाहेर जाण्यासाठी मातीच्या भाजक्या पन्हाळींचा उपयोग केला जाई. एक विशेष बाब म्हणजे रस्त्यावरील गटारे विटांनी बांधलेली होती आणि ती व्यवस्थित झाकलेली असायची. यावरून सार्वजनिक आरोग्याबद्दल ते किती जागरूक होते, ते दिसते.

**तुमचे मत काय आहे ?**

हडप्पा संस्कृती ते 'स्वच्छ भारत अभियान'पर्यंत विचार केल्यास स्वच्छता ही मूलभूत गरज आहे, हे स्पष्ट होते.



**सांगा पाहू !**

तुमच्या गावात किंवा शहरात स्वच्छता कशा प्रकारे राखली जाते याची माहिती सांगा.

हडप्पाकालीन शहरांच्या रस्त्यांचे जाळे समांतर आणि एकमेकांना काटकोनात छेदतील असे रचलेले होते. त्यामुळे तयार होणाऱ्या चौकोनी मोकळ्या जागेत घरे बांधली जात.

नगरांचे सहसा दोन किंवा अधिक विभाग केलेले असत. प्रत्येक विभागाला स्वतंत्र तटबंदी असे. उंचावर बांधलेल्या विभागाला 'बालेकिल्ला' असे म्हटले जाते. बालेकिल्ल्यात अधिकारी लोकांची वस्ती असावी. बालेकिल्ल्याबाहेरच्या विभागात सर्वसाधारण लोकांची वस्ती असावी.



**करून पहा.**

बालेकिल्ला म्हणजे एखाद्या किल्ल्याचा सर्वांत आतला आणि सुरक्षित भाग, ज्याला किल्ल्याचे हृदय मानले जाते. तो साधारणपणे किल्ल्याच्या सर्वांत उंच ठिकाणी बांधलेला असतो, त्यामुळे आसपासच्या परिसरावर लक्ष ठेवणे सोपे जाते आणि शत्रूच्या हल्ल्याच्या वेळी हा शेवटचा संरक्षणबिंदू ठरतो. बालेकिल्ल्यामध्ये राजवाडा, दरबार, शस्त्रागार, धान्यकोठार आणि देवळे अशा महत्त्वाच्या इमारती असत. रायगड, राजगड या किल्ल्यांमध्ये बालेकिल्ला हे अतिशय महत्त्वाचे स्थान होते. त्यातील एखाद्या बालेकिल्ल्याचे चित्र फळ्यावर किंवा तुमच्या वहीत काढा.

मोहेंजोदडो येथील महास्नानगृह हे या काळातील स्थापत्याचा एक विशेष नमुना आहे. महास्नानगृह आणि आसपासचा परिसर या भागामध्ये काही



मोहेंजोदडो येथील महास्नानगृह

धार्मिक विधी केले जात होते असे काही विद्‌वानांचे मत आहे. महास्नानगृहाचे एक मोठे जलकुंड आहे, ज्याची सुमारे १२ मीटर लांबी, ७ मीटर रुंदी आणि खोली २.५ मीटर इतकी आहे. ते पक्क्या विटांनी बांधलेले होते. त्यात पाणी भरण्यासाठी आणि पाणी बाहेर काढण्यासाठी खास तंत्रज्ञान वापरले गेले होते. याच्या आजूबाजूला छोट्या खोल्या होत्या.

### आहारपद्‌धती

गहू, सातू (बार्ली), वाटाणा, तीळ, नाचणी, मसूर आणि विविध प्रकारच्या डाळी हे लोकांच्या आहारातील मुख्य घटक होते. दूध, मांस, मासे हेदेखील काही ठिकाणी खाल्ले जात असावेत, असे पुरावे मिळतात. अन्न शिजवण्यासाठी ते मातीची भांडी वापरत. काही भांड्यांवर सुंदर रंगकाम आणि नक्षीही असायची. ही नक्षी लाल रंगाच्या भांड्यांवर काळ्या रंगाने काढलेली असायची. नक्षीच्या नमुन्यांमध्ये माशांचे खवले, एकमेकांत गुंतलेली वर्तुळे, पिंपळपाने इत्यादी प्रतीकांचा समावेश आहे.



भांडी



**चर्चा करा.**

गहू, हरभरा, तांदूळ, सातू, मसूर, उडीद, बाजरी यांतील कोणते धान्य हडप्पा काळात होते आणि कोणते नव्हते यावर वर्गात चर्चा करा.

### वस्त्रे आणि दागिने

हडप्पा संस्कृतीतील लोकांची वस्त्रे आणि दागिने त्या काळातील तंत्रज्ञान, सौंदर्यदृष्टी आणि जीवनशैली यांची माहिती देतात. हडप्पा काळातील लोक सुती आणि रेशमी कपडे वापरत असत.



हडप्पा संस्कृतीतील दागिने

पुरातत्वीय उत्खननात मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे त्यांच्या पोशाखाविषयीचा अंदाज बांधता येतो. पुरुष आणि महिला दोघांच्याही पेहरावात गुडघ्यापर्यंतचे वस्त्र आणि उपरणे यांचा समावेश होता. हडप्पा संस्कृतीतील लोक दागिने घडवण्यात फार कुशल होते. ते मातीचे आणि गारगोटीच्या रंगीबेरंगी दगडांचे, शंख, तांबे, चांदी आणि सोने यांचे मणी बनवत असत. त्यांना इतर देशांत विशेषतः मेसोपोटेमियामध्ये मोठी मागणी होती. हडप्पा संस्कृतीचे लोक हार, कर्णभूषणे, बाजूबंद, बांगड्या, अंगठ्या, कंबरपट्टा या अलंकारांचा वापर करत असत.

### व्यवसाय आणि व्यापार

हडप्पा संस्कृतीचे लोक शेती करून विविध पिकांची लागवड करायचे. त्यामध्ये गहू, सातू ही मुख्य पिके होती. हडप्पा संस्कृतीच्या लोकांना कापूस माहीत होता. हडप्पा संस्कृतीतील कारागीर हे लोखंड, कांस्य, माती, सोने यांपासून वस्तू बनवणे, कापड विणणे इत्यादी व्यवसाय करत असत. मातीची उत्तमोत्तम भांडी बनवत असत. नौकानयन त्यांना माहिती होते, त्यामुळे त्यांना दूरवरचा व्यापार शक्य होता.

### माहीत आहे का तुम्हांला ?

कालीबंगन येथे जगातील सर्वांत जुनी नांगरलेली शेतजमीन सापडली आहे. ते आजच्या राजस्थान राज्यातील हनुमानगढ जिल्ह्यात, घग्गर नदीच्या किनारी वसलेले आहे.

यावरून असे लक्षात येते, की कालीबंगनमधील लोक शेतीमध्ये प्रगत होते. त्यांनी गहू, सातू, हरभरा अशा अनेक धान्यांची लागवड केली होती. आजही राजस्थान येथे उंटांचा वापर नांगरणीसाठी केला जातो आणि विशेष म्हणजे त्याच्या नांगरणीच्या खुणा आणि हडप्पाकालीन खुणा यांत साधर्म्य आढळते.

कालीबंगनचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे अग्निकुंडे सापडली आहेत, त्यांचा उपयोग धार्मिक



विधींसाठी केला जात असावा. हडप्पा संस्कृतीच्या इतर शहरांप्रमाणे येथेही नियोजित सांडपाणी व्यवस्था, विटांची घरे आणि मुद्रांचे नमुने सापडले आहेत.

हडप्पा संस्कृतीच्या लोकांनी केवळ गावातील किंवा शेजारील शहरांशीच नाही, तर दूरवरच्या देशांशीही व्यापार प्रस्थापित केला होता. त्यांनी मेसोपोटेमिया (आजच्या इराक), इजिप्त या प्रदेशांशी वस्तूंची देवाणघेवाण केली. ते मणी, दागिने, मातीची भांडी आणि कापूस विकायचे आणि त्या बदल्यात धातू, मौल्यवान दगड, आणि इतर वस्तू आणायचे. हडप्पातून निर्यात होणाऱ्या वस्तूंमध्ये फायन्स आणि कार्नेलियन लांब मण्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. फायन्स हे काचेसारखे असून मुख्यतः निळ्या, हिरव्या आणि चिंतामणी रंगात बनवले जात होते. हडप्पामध्ये तयार होणाऱ्या फायन्सच्या बांगड्या, मणी आणि दागिने दक्षिण मेसोपोटेमियातील सुमेरमध्ये व्यापारी मार्गांद्वारे मोठ्या प्रमाणात पोचत होते. याशिवाय, कार्नेलियन (अकिक) हे लालसर रंगाचे रत्न होते, त्यापासून लांब आणि गोल मणी तयार केले जात होते. हे मणी मेसोपोटेमिया येथे विकले जात होते. तेथे ते दागिन्यांमध्ये आणि धार्मिक वस्तूंमध्ये वापरले जात होते. या व्यापारातून हडप्पा संस्कृतीला आर्थिक समृद्धी मिळाली.

### माहीत आहे का तुम्हांला ?

इनन्ना देवी सुमेर संस्कृतीतील एक प्रमुख देवता होती. मेसोपोटेमियातील महाकाव्यात दिलेल्या पौराणिक कथांवरून आपल्याला हडप्पाकालीन व्यापाराविषयी महत्त्वाची माहिती मिळते. इनन्ना देवी आपल्या वैभवाचे प्रतीक म्हणून लाजवर्दीचा (लॅपिस



लाझुली) वापर करत होती. लाजवर्दी हा एक निळा रंग असलेला मौल्यवान दगड आहे. प्राचीन काळात,


लाजवर्दी अत्यंत दुर्मीळ आणि मौल्यवान मानले जात होते. त्याच्या खाणी अफगाणिस्तानात होत्या. हडप्पाकालीन व्यापारी त्याचा व्यापार करत असत. मेसोपोटेमियामध्ये त्याची मागणी अधिक होती. इनन्नाच्या कथेवरून पौराणिक कथा या इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत मानल्या जातात, हे समजते कारण त्यांत त्या काळातील समाज, संस्कृती, धर्म आणि राजकीय परिस्थिती यांचे प्रतिबिंब आढळते.

त्या काळातील लोथल शहर हे एक महत्त्वाचे बंदर होते, येथे प्रचंड आकाराची गोदी सापडली आहे. हडप्पा संस्कृतीचा व्यापार अरबी समुद्राच्या किनाऱ्याने इराणच्या आखातापर्यंत चालत असे. हडप्पा लोकांच्या मुद्रा प्रामुख्याने व्यापारासाठी वापरल्या जात असाव्यात. मुद्रांवर बैल, हत्ती, म्हैस, गेंडा, वाघ यांसारख्या प्राण्यांच्या तसेच काही वेळा मनुष्याकृतीही पाहायला मिळतात.



**सांगा पाहू!**

चित्रातील हडप्पाकालीन मुद्रा पहा, त्यावर एकशृंग या कल्पित प्राण्याचे चित्र दिसते आहे. तुम्ही कुठल्या वस्तूंवर अथवा वास्तूंवर असे काल्पनिक प्राणी बघितले आहेत का?



### कला आणि मनोरंजन

हडप्पा संस्कृतीतील लोक कुशल कारागीर होते. त्यांनी माती, धातू आणि मौल्यवान दगड यांचा वापर करून अनेक सुंदर वस्तू तयार केल्या.

हडप्पा संस्कृतीतील एक कांस्य मूर्ती सापडली आहे, ती 'नर्तकी' म्हणून ओळखली जाते. याशिवाय, हडप्पा लोकांनी प्राण्यांच्या आकृती, खेळणी आणि मुद्रा तयार केल्या होत्या. हडप्पा संस्कृतीतील एक अतिशय प्रसिद्ध आणि महत्त्वाची वस्तू म्हणजे तेथे सापडलेला एक वैशिष्ट्यपूर्ण पुतळा. हा पुतळा मोहेंजोदडो या ठिकाणी उत्खननात सापडला आहे. तो सध्या नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संग्रहालयात ठेवलेला आहे. त्याला 'राजा-धर्मगुरू' म्हणून ओळखले जाते.



हडप्पाकालीन कलेचा नमुना



हडप्पाकालीन मातीची खेळणी

पुरातत्त्वीय उत्खननात सापडलेल्या वस्तूंमध्ये खेळणीही सापडलेली आहेत. ही खेळणी मातीची बनवत असत. त्यांमध्ये बैल, कुत्रा, हत्ती या प्राण्यांच्या प्रतिकृती तसेच चाकावर फिरणारी गाडी, भिंगरी, शिट्टी यांचा समावेश होता.

### ३.४ हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे

हडप्पा संस्कृती ही भारतातील प्रगत आणि संपन्न संस्कृती होती, पण काही काळानंतर या संस्कृतीचा हळूहळू ऱ्हास होऊ लागला. या ऱ्हासामागे कोणती कारणे होती यासंबंधी संशोधन झाले आहे. सर्वांत प्रमुख कारण म्हणजे नदीच्या प्रवाहामध्ये बदल झाले असावेत. नदीचा प्रवाह बदलल्यामुळे पाण्याचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे शेती व जीवन यांवर परिणाम झाला. दुसरे कारण म्हणजे महापूर, दुष्काळ किंवा भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे नगरे उद्ध्वस्त झाली असावीत. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे इसवी सनपूर्व २३००च्या सुमारास सुमेर बरोबर असलेला हडप्पाचा व्यापार मंदावू लागला आणि हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाला सुरुवात झाली.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

सार्गन हा अक्कड साम्राज्याचा एक सामर्थ्यवान राजा होता. त्याच्या काळात मेसोपोटेमिया आणि हडप्पा संस्कृती यांच्यात सागरी व्यापार होत असल्याचे पुरावे सापडतात. या व्यापारात लाजवर्दी, सोने, चांदी, तांबे आणि मणी इत्यादी मौल्यवान वस्तूंची देवाणघेवाण होत असे, परंतु सार्गनच्या काळानंतर मेसोपोटेमियामध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्याचा परिणाम हडप्पा संस्कृतीच्या व्यापारावर झाला. त्यामुळे सार्गनच्या काळातील व्यापार हळूहळू थांबला. परिणामी हडप्पा संस्कृतीच्या नगरांची अर्थव्यवस्था उतरणीला लागली, उद्योगधंदे कमी झाले आणि लोकांनी नगरे सोडून लहान गावांकडे स्थलांतर केले.

त्यानंतरही हडप्पा संस्कृतीचा प्रभाव दीर्घकाळ टिकून राहिला. हडप्पा संस्कृतीची नगरे आज जरी लोप पावली असली, तरी त्यांच्या अवशेषांवरून आपल्याला इतिहास, परंपरा आणि तत्कालीन जीवनशैली यांची माहिती मिळते. म्हणूनच हडप्पा संस्कृती ही एक समृद्ध संस्कृती होती, जिच्यामुळे आपल्या सांस्कृतिक परंपरेचा पाया रचला गेला.



**करून पहा.**

खालील ओळींमध्ये, हडप्पा संस्कृतीतील शहरांची नावे व ती शहरे कशी होती? कोणत्या कलाकृती तेथे सापडल्या? कोणत्या वस्तूंचा व्यापार होत असे? इत्यादींची माहिती लिहा.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. हडप्पा संस्कृतीचा शोध ................ या नदीकाठी लागला.

अ) गंगा ब) यमुना

क) सिंधू ड) गोदावरी

२. हडप्पा संस्कृतीतील महास्नानगृह .......... या ठिकाणी सापडले.

अ) धोलावीरा ब) लोथल

क) कालीबंगन ड) मोहेंजोदडो

३. हडप्पा संस्कृतीतील ........... या शहराच्या ठिकाणी गोदी सापडली आहे.

अ) लोथल ब) राखीगढी

क) बनावली ड) धोलावीरा


**ब) चूक की बरोबर ते लिहा.**

१. दूरवरच्या प्रदेशांशी असलेला व्यापार हे हडप्पा संस्कृतीच्या विस्ताराचे प्रमुख कारण होते. ☐


२. हडप्पा संस्कृतीतील लोक सार्वजनिक आरोग्याबाबत जागरूक नव्हते. ☐

३. हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाचे व्यापार मंदावणे हे एक कारण होते. ☐

**प्र.२ अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**ब) शब्दकोड्यातून उत्खननातील नगरांची नावे पूर्ण करा.**




**प्र.३ टीपा लिहा.**

१. मोहेंजोदडो येथील महास्नानगृह

२. हडप्पाकालीन वस्त्र व दागिने

३. हडप्पाकालीन कला आणि मनोरंजन

**प्र.४ पाठातील नकाशाचे निरीक्षण करा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारतातील राजस्थान या राज्यातील हडप्पा संस्कृतीच्या कोणत्याही एका स्थळाचे नाव लिहा.

२. भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमारेषेबाहेरील हडप्पा संस्कृतीच्या कोणत्याही एका स्थळाचे नाव लिहा.

३. मंडा हे हडप्पा संस्कृतीचे स्थळ कोणत्या नदीच्या तीरावर आहे?

४. दायमाबाद हे हडप्पा संस्कृतीचे स्थळ वर्तमानकाळातील भारतातील कोणत्या राज्यात आहे?

**प्र.५ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. हडप्पा संस्कृतीतील सुसूत्र नगररचना ही आजच्या शहरांच्या नियोजनासाठी आदर्श कशी ठरू शकते हे स्पष्ट करा.

२. हडप्पा संस्कृतीची अर्थव्यवस्था उतरणीला का लागली ?

**कृती–**

- हडप्पा संस्कृतीतील एखाद्या उत्खनन स्थळाची प्रतिकृती तयार करा.
- तुमच्या स्थानिक परिसरातील रस्त्यांची रचना आणि हडप्पाकालीन रस्त्यांची रचना याविषयी वर्गात चर्चा करा.

**उपक्रम**

१. हडप्पाकालीन सुनियोजित नगर, घरे, रस्ते, जलव्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्था यांची प्रतिकृती तयार करा.

२. महाराष्ट्र शासनाच्या *https://water.maharashtra.gov.in/en/scheme/sant-gadgebaba-gram-swachhta-abhiyan/* या संकेतस्थळावरून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान याची माहिती मिळवून वर्गात सादर करा.

***

# ४ वैदिक संस्कृती



**४.१ वैदिक वाङ्मय** **४.२ वैदिक काळातील लोकजीवन**

**तुम्ही कधी सुडोकू खेळ खेळला आहे का?**

सुडोकू हा खेळ म्हणजे तर्कशक्ती आणि संख्याज्ञान यांचा संगम असतो. हा खेळ अगदी आधुनिक काळात निर्माण केला गेला आहे. खालील चौकटीत १ ते ९ अंक असे भरा की, प्रत्येक उभ्या व आडव्या ओळीत प्रत्येक अंक एकदाच येईल.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | ३ | | ७ | | २ | ४ | |
| १ | | | | २ | ५ | | ७ | ८ |
| | | ५ | ६ | | | ९ | | |
| २ | | | ९ | | | | ६ | |
| | ९ | ८ | | | | ५ | ३ | |
| | ३ | | | | ८ | | | ७ |
| | | १ | | | २ | ४ | | |
| ९ | ५ | | ७ | ४ | | | | १ |
| | ८ | ६ | | ३ | | ७ | | ९ |

आता विचार करा, जेव्हा संगणक नव्हते, कॅलक्युलेटर नव्हते, तेव्हा भारतामध्ये गणिताची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली होती. शंकराचार्य श्री. भारती कृष्ण तीर्थ यांनी लिहिलेल्या 'वैदिक गणित' या पुस्तकात काही सूत्रे मांडलेली आहेत. ज्यामध्ये मोठमोठ्या संख्यांची उदाहरणे क्षणात सोडवली जात असत.

आपल्याला ९८ × ९९ हे उदाहरण सोडवायचे आहे.

वैदिक गणित या पुस्तकातील एक सूत्र आहे 'निखिलं नवतश्चरमं दशतः' त्यानुसार –


पायरी १

९८ – १०० (पाया) = –०२

९९ – १०० (पाया) = –०१

पायरी २

९८ –०२



९९ –०१

-------------------

म्हणून गुणाकार ९७०२

(तिरकस-वजाबाकी करा, तुम्हांला सारखेच उत्तर मिळेल. उत्तर आहे ९७, ते डाव्या बाजूला लिहा आणि (–०२) × (–०१) = ०२. हे उत्तर ९७च्या पुढे लिहा.)

**उत्तर : ९८ × ९९ = ९७०२**

ज्या काळात वीज, संगणक आणि मोबाईल नव्हते, अशा काळात ज्ञान आणि विज्ञानात प्रगत असलेली संस्कृती आपल्या देशात होती. वैदिक संस्कृती ही आपल्या भारताची जुनी आणि समृद्ध संस्कृती आहे. 'वेद' या ग्रंथांमध्ये त्या काळातील लोक काय शिकायचे, त्यांची जीवनशैली कशी होती, याचे सुंदर वर्णन आहे.

**वैदिक संस्कृतीच्या लोकांना ज्ञान कसे प्राप्त झाले असेल?**

**वेद म्हणजे काय?**

**त्या काळातील समाजरचना कशी होती?**

**वैदिक परंपरा अजूनही अस्तित्वात आहे का?**

**गणित, विज्ञान, योग, आयुर्वेद अशा अनेक विषयांचे ज्ञान त्यांना प्राप्त होते का?**

**चला, आपण जाणून घेऊ या – हे ज्ञान कोठून आले आणि आपल्याला काय सांगून गेले?**

## ४.१ वैदिक वाङ्मय

'विद' म्हणजे जाणणे. त्यापासून 'वेद' ही संज्ञा तयार झाली. त्याचा अर्थ 'ज्ञान' असा होतो. वैदिक साहित्य हे भारताच्या प्राचीन काळातील सर्वांत महत्वाचे ग्रंथ मानले जातात. हे साहित्य मुख्यतः वेदांमध्ये संग्रहित केले गेले आहे. वेद हे प्राचीन काळातील ज्ञानाचे, धर्माचे, तत्त्वज्ञानाचे आणि जीवनशैलीचे प्रमुख स्रोत आहेत. वेदांमधील ऋचा (देवातांचे स्तुतीगान) ऋषींना स्फुरल्या. वेदातील काही सूक्ते स्त्रियांनीही रचलेली आहेत.

**ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद हे चार वेद आहेत.** वेद हे संस्कृत भाषेत रचलेले आहेत. ते प्रामुख्याने मंत्र, स्तुती, यज्ञविधी, तत्त्वज्ञान, आणि समाजजीवन यांच्याशी संबंधित आहेत. ऋग्वेद हा सर्वांत प्राचीन वेद आहे.

या चार वेदांच्या ग्रंथस्वरूप 'संहिता' आहेत. संहितांच्या रचनेनंतर प्रत्येक वेदांच्या स्पष्टीकरणासाठी ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदे यांची रचना केली गेली. वेदवाङ्मयात त्यांचाही समावेश होतो.

**ब्राह्मणग्रंथ –** ब्राह्मणग्रंथ हे वेदांचा एक महत्वाचा भाग आहेत. हे ग्रंथ मुख्यतः यज्ञ, पूजन आणि धार्मिक विधी यांच्याशी संबंधित आहेत. यज्ञ कसे करावेत, कोणते मंत्र वापरावेत आणि त्यामागील अर्थ काय आहे, याचे सविस्तर वर्णन यांमध्ये केलेले आहे.

**आरण्यके –** 'आरण्यक' हा शब्द 'अरण्य' म्हणजेच जंगल या शब्दावरून तयार झाला आहे, कारण

**खाली दिलेला तक्ता वर्गात एकत्र वाचा. या चार वेदांचे मुख्य विषय, त्यांची वैशिष्ट्ये आणि महत्त्व तुम्हांला त्यातून सहज समजेल.**

| ऋग्वेद | यजुर्वेद | सामवेद | अथर्ववेद |
|---|---|---|---|
| मुख्य विषय – मंत्र, देवतांची स्तवने (स्तुतीगान) | मुख्य विषय – यज्ञ, हवन, धार्मिक विधी | मुख्य विषय – मंत्रपठण | मुख्य विषय – जीवनशैली, कृषी, औषधोपचार |
| वैशिष्ट्य– अग्नि, इंद्र, वरुण यांसारख्या देवतांची स्तोत्रे | वैशिष्ट्य – यज्ञकर्म, हवनपद्धती | वैशिष्ट्य – मंत्रांचे छंदबद्ध गायन | वैशिष्ट्य – औषधोपचार, घरगुती हवन पद्धती |
| महत्व – प्राचीन वेद, देवतांचे स्तुतीगान व यज्ञाचे महत्व शिकवतो. | महत्त्व – धार्मिक विधी, धार्मिक आचार-विचार शिकवतो. | महत्त्व – संगीताचा आणि मंत्रांचा अभ्यास. | महत्त्व – आरोग्य, औषधे आणि घरगुती उपाय, जीवनोपयोगी ज्ञान यासंबंधीचा विचार मांडतो. |

हे ग्रंथ अरण्यात राहणाऱ्या साधकांसाठी रचले गेले. या ग्रंथांमध्ये यज्ञांच्या अर्थाबद्दल, ध्यान, साधना आणि आत्मज्ञान यांसंबंधी विचार मांडले आहेत.

**उपनिषदे –** गुरूजवळ बसून ज्ञान मिळवणे असा 'उपनिषद' या शब्दाचा अर्थ आहे. या ग्रंथांमध्ये आत्मा, परमात्मा, ब्रह्म आणि विश्व यांचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. उपनिषदांमध्ये दैनंदिन जीवनाच्या पलीकडे जाऊन व्यावहारिक ज्ञानावर भर दिला आहे.



**सांगा पाहू!**

१. या वेदात मुख्यतः देवतांची स्तवने आहेत.यामध्ये निसर्गदेवतांचे वर्णन आहे.

उत्तर ------------------------------------

२. या वेदात यज्ञ करण्याचे विधी आणि पद्धती दिलेल्या आहेत.

उत्तर ------------------------------------

३. या वेदातील स्तवने स्वरबद्ध केली जात होती. यामधील श्लोक संगीतासह म्हटले जातात.

उत्तर ------------------------------------

४. हा वेद 'सामान्य लोकांच्या जीवनाशी निगडित असणारा वेद' मानला जातो, कारण यात आरोग्य, घरगुती उपाय याविषयी महिती आहे.

उत्तर ------------------------------------

## ४.२ वैदिक काळातील लोकजीवन

वैदिक काळ दोन भागांत विभागला जातो – पूर्व वैदिक काळ (यालाच ऋग्वेद काळ असेदेखील म्हटले जाते) आणि उत्तर वैदिक काळ.

पूर्व वैदिक काळ साधारणपणे इ.स.पूर्व १५०० ते इ.स.पूर्व १००० असा मानला जातो. या काळाची माहिती आपल्याला मुख्यतः ऋग्वेदातून मिळते. या काळातील लोकजीवन पशुपालनावर आधारित होते. हळूहळू शेतीची सुरुवात झाली होती, त्या काळी गाय ही मुख्य संपत्ती मानली जात होती.

उत्तर वैदिक काळ हा इ.स.पूर्व १००० ते इ.स.पूर्व ६०० असा मानला जातो. या काळात वैदिक लोकांनी गंगेच्या खोऱ्यात स्थलांतर केले आणि तेथे स्थायिक झाले. शेती, व्यापार आणि हस्तकला यांचा अधिक विकास झाला. याच काळामध्ये नगरांचा उदय होऊ लागला होता.

**वैदिक काळ**

| पूर्व वैदिक काळ | उत्तर वैदिक काळ |
|---|---|
| इ.स.पूर्व सुमारे १५०० ते इ.स.पूर्व १००० | इ.स.पूर्व सुमारे १००० ते इ.स.पूर्व ६०० |

### कुटुंब आणि समाजरचना

वैदिक काळात कुटुंब हा समाजाचा सर्वांत लहान घटक होता. प्रत्येक कुटुंबात वडील, आई, मुले, आजी–आजोबा आणि इतर नातेवाईक असे सर्व एकत्र राहत. आताप्रमाणेच त्या काळातील समाज पितृसत्ताक होता म्हणजेच कुटुंबातील सर्व निर्णय घेण्याचा अधिकार कुटुंबप्रमुखाकडे होता. कुटुंबप्रमुखाला 'गृहपती' असे म्हटले जाई. कुटुंबातील इतर सदस्य कुटुंबप्रमुखाच्या आज्ञेचे पालन करत. **अनेक कुटुंबे मिळून ग्रामवसाहत (गाव) तयार होत असे, तर अनेक गावे मिळून 'जन' (राज्य) बनत असे.** गावाच्या प्रमुखाला **'ग्रामणी'** आणि राज्याच्या प्रमुखाला **'राजा'** म्हणत. समाजातील सर्वांना धर्म, सत्य, आणि न्याय यांचे पालन करणे आवश्यक मानले जात असे. लोक परस्परांशी सहकार्याने आणि प्रेमभावाने वागत. प्रत्येक व्यक्तीला समाजात विशिष्ट जबाबदारी आणि स्थान होते. वैदिक समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, आणि शूद्र हे चार वर्ण होते.

### शिक्षण

वैदिक काळात शिक्षण ही समाजातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट मानली जात असे. विद्यार्थ्यांना गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जात असे, म्हणजेच ते गुरूच्या आश्रमात राहून शिकत, गुरूंसमोर बसून अध्ययन करत. विद्यार्थ्यांना गुरुकुलात शिस्तबद्ध जीवन जगायला शिकवले जात असे, जेणेकरून ते ज्ञान, नैतिकता आणि



गुरुकुल

कर्तव्यनिष्ठा यांचा आदर्श ठेवून समाजात काम करतील. गुरू हे आदर्श जीवन जगण्यासाठीचे मार्गदर्शक होते. विद्यार्थी वेद, गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, नीतिशास्त्र आणि युद्धकला यांचा अभ्यास करत. शिक्षणाचा उद्देश केवळ ज्ञान मिळवणे नव्हे, तर नम्रता, शिस्त, धर्म, आणि आत्मनियंत्रण ही मूल्ये आत्मसात करणे हा होता.



**विचार करा.**

तुम्ही जर गुरुकुलात शिकत असता, तर तुमचा दिनक्रम काय असता? त्यावर एक निबंध लिहा.



**करून पहा.**

प्राचीन भारतीय साहित्यातील कथा, इतिहास आणि संस्कृती यांच्या काही पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी उपयोगी असतात. त्यातून समाजाची रचना आणि तत्कालीन जीवनावश्यक मूल्ये समजण्यास मदत होते. काही कथा तुम्हीही शोधा आणि वर्गात त्याचे सादरीकरण करा.

### आश्रमव्यवस्था

प्राचीन भारतातील वैदिक संस्कृतीत आश्रमव्यवस्था अस्तित्वात होती. या व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या आयुष्याचे चार आदर्श टप्पे मानलेले आहेत. प्रत्येक आश्रमात विशिष्ट कर्तव्ये आणि उद्दिष्टे दिली जात असत.

### चार आश्रम

**ब्रह्मचर्याश्रम –** ब्रह्मचर्याश्रम हा आयुष्याचा पहिला टप्पा मानलेला आहे. या टप्प्यात मुलांना गुरूंच्या देखरेखीखाली शिक्षण घेणे आवश्यक होते. या काळात विद्यार्थी मन लावून अध्ययन करत असे.

**गृहस्थाश्रम –** शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यक्ती गृहस्थाश्रमात प्रवेश करत असे. यामध्ये विवाह, कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणे या गोष्टींना महत्त्व असे.

**वानप्रस्थाश्रम –** गृहस्थाश्रमात राहून जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर व्यक्तीने कुटुंबापासून थोडे लांब जाऊन ध्यान, तपश्चर्या, तात्त्विक चिंतन करणे अपेक्षित असे.

**संन्यासाश्रम –** संन्यासाश्रम हा जीवनाचा अंतिम टप्पा मानलेला होता. या टप्प्यावर मनुष्याने सर्व नात्यांचा त्याग करून मनुष्यजन्माचा अर्थ समजावून घेण्यासाठी जगावे, फार काळ एके ठिकाणी राहू नये असा संकेत होता.



**करून पहा.**

'आश्रमव्यवस्थेवर आधारित जीवनपद्धतीतील चार टप्पे' यावर भित्तिपत्रक तयार करा. प्रत्येक टप्प्याचे चित्र, त्याचे कर्तव्य, महत्त्व यांची माहिती लिहून वर्गात प्रदर्शित करा.

वैदिक काळातील लोकांचे जीवन साधे पण शिस्तबद्ध होते. त्यांना सत्य, संयम, औदार्य यांसारख्या मूल्यांचे पालन करण्याचे महत्त्व शिकवले जात असे. समाजात एकता, सहकार्य आणि एकमेकांप्रति आदर यास महत्त्व दिले जात असे. लोक ऋतुमानानुसार येणारे उत्सव, यज्ञ, गीत-संगीत आणि नृत्य यांच्या माध्यमातून जीवनाचा आनंद साजरा करत. अन्नधान्य वाया न घालवणे, गरिबांची मदत करणे, शिस्तीने जीवन जगणे या गोष्टी नीतिमूल्याचा भाग होत्या. या नीतिमूल्यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक संस्कार प्रस्थापित होत असत आणि त्या आधारे व्यक्तिमत्त्व परिपक्व होत असे. वैदिक जीवनशैली ही निसर्गाशी सुसंगत आणि श्रमप्रधान होती.

**तुमचे मत काय आहे?**

आश्रमव्यवस्थेमुळे व्यक्तीच्या जीवनात नियोजन, नीटनेटकेपणा, संयम, आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होण्यास मदत होत असे.

### दैनंदिन जीवन

वैदिक काळातील लोकांचा आहार साधा आणि पौष्टिक होता. त्या काळात लोक शेती आणि पशुपालन यांवर अवलंबून होते, त्यामुळे त्यांच्या आहारात धान्य, दूध, दही, तूप, मध आणि भाज्या यांचा समावेश होता. सातू, गहू, तांदूळ, बाजरी इत्यादी धान्यांचा वापर ते आहारात करत असत. याप्रमाणे वनस्पतीजन्य अन्नाचा वापर होत असे. ते ऋतूनुसार फळे खात असत. अन्न शुद्ध आणि सात्त्विक असावे, तसेच योग्य वेळी अन्नग्रहण करावे हे सर्वसाधारण नियम होते. त्यांची आहारपद्धती एकूणच आरोग्यदायी आणि नियमितपणावर आधारित होती.



**जरा विचार करा.**

तुमच्या दिनचर्येत उठण्याची वेळ, आहार, व्यायाम, अभ्यास, विश्रांती यांमध्ये नियमितता असावी याबद्दल तुमचे काय मत आहे?

वैदिक लोकजीवनात आरोग्याला फार महत्त्व दिले जात असे. प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्रात रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी संतुलित आहार, योग आणि शारीरिक व मानसिक स्वास्थ्य यांवर भर दिला गेला. यामुळे लोक दीर्घायुषी असत व निरोगी जीवन जगत असत.



**करून पहा.**

कुटुंबातील एक दिवसाचा जेवणाचा बेत स्वतः तयार करा. त्यातले कोणते पदार्थ जास्त आरोग्यदायी आहेत आणि का? यावर कुटुंबातील सदस्यांशी चर्चा करा.

मनोरंजनाच्या दृष्टीने वैदिक लोक संगीत, नृत्य, गायन, वाद्यवादन, कथा सांगणे, तात्त्विक चर्चा अशा गोष्टींत रममाण होत असत. धनुर्विद्या, रथशास्त्र, मल्लयुद्ध, सारीपाटासारखे सोंगट्यांचे खेळ असे खेळ ते खेळत. उत्सव आणि धार्मिक मेळावे ही सामाजिक ऐक्य जपण्याची व मनोरंजनाची प्रमुख साधने होती.

वैदिक काळात संगीताला अतिशय महत्त्वाचे स्थान होते. संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन नव्हते वैदिक पठणामध्ये स्वरांना अत्यंत महत्त्व होते. संगीत हे धार्मिक आणि आध्यात्मिक तसेच लोकजीवनाचा अविभाज्य भाग मानले जात असे. मंत्रगायनासाठी स्वरांचे ज्ञान आवश्यक होते. त्याचा विचार सामवेदात केला आहे. त्या काळात वीणा, मृदंग, शंख आणि बासरी यांसारखी वाद्ये वापरली जात असत. या वाद्यांचा उपयोग यज्ञ, नृत्य आणि धार्मिक विधींसाठी केला जात असे. पुरुष आणि स्त्रिया दोघेही गायन व नृत्य यात सहभागी होत. वैदिक काळातील संगीत हे आनंद आणि आध्यात्मिकता यांचे प्रतीक होते. त्यावरूनच पुढे भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा विकसित झाली.

**स्त्रियांचे स्थान :** पूर्व वैदिक काळात स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान होते. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. त्यांना पुरुषांप्रमाणेच वेदाध्ययनाची मुभा होती. अनेक स्त्रिया विदुषी म्हणून प्रख्यात होत्या. लोपामुद्रा, घोषा, गार्गी, मैत्रेयी, अपला ही त्या काळातील प्रसिद्ध विदुषींची काही उदाहरणे आहेत. स्त्रिया धार्मिक विधी, यज्ञयाग यांत सक्रियपणे भाग घेत. उत्तर वैदिक काळात, मात्र समाज अधिक पितृसत्ताक बनला, स्त्रियांच्या शिक्षणावर बंधने आली व त्यांचे स्वातंत्र्य कमी झाले. हळूहळू त्यांच्यावरील बंधने वाढत गेली. त्यांचे कुटुंबातील आणि समाजातील स्थान अधिकाधिक दुय्यम होत गेले.

**आर्थिक जीवन : या काळातील लोकांचे आर्थिक जीवन मुख्यत: कृषी आणि पशुपालन यांवर आधारित होते.** गहू, सातू, तांदूळ आणि इतर धान्ये ते पिकवत असत. वैदिक काळात पशूंना अत्यंत महत्त्वाचे स्थान

होते. गाय, बैल, घोडे, मेंढ्या, शेळ्या हे प्रमुख प्राणी होते. गाय हे विनिमयाचे साधन होते. घोड्यांचा उपयोग युद्धात आणि यज्ञकर्मात होत असे, तर बैलांचा उपयोग नांगरणी आणि वाहतूक यासाठी केला जाई.

**कृषिव्यतिरिक्त इतर अनेक व्यवसाय प्रचलित होते. पशुपालन, धातुकाम, कुंभारकाम, विणकाम, सुवर्णकाम आणि रथनिर्मिती हे काही महत्त्वाचे उद्योग होते.** व्यापार हळूहळू विकसित होत होता. वस्तुविनिमय पद्धतीने व्यवहार केले जात. काही ठिकाणी लहान बाजारपेठा निर्माण झाल्या होत्या. नौकानयन आणि नदीमार्गाने व्यापार केल्याचे उल्लेखसुद्धा सापडतात. व्यावसायिक आणि कारागीर समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक होते. त्यांचे स्वतंत्र संघ 'श्रेणी' या नावाने ओळखले जात होते. त्यांच्या प्रमुखाला 'श्रेष्ठी' म्हणत असत.

**धार्मिक जीवन :** वैदिक काळातील लोकांचा धर्म निसर्गपूजेवर आधारित होता. वैदिक लोकांनी निसर्गातील घटकांना देवतांचे स्थान दिले होते. उदाहरणार्थ, अग्नि, वरुण, मरुत् (वायू), सूर्य, उषा (पहाट), पृथ्वी, सोम (चंद्र). इंद्र हा सर्वांत बलवान देव मानला जात असे. यज्ञात अर्पण केलेल्या हवी (आहुती) अग्नीच्या माध्यमातून देवांपर्यंत पोहोचते असे मानले जाई. यज्ञात अन्न, तूप आणि धान्य यांचा हवी अर्पण केला जात असे. वैदिक मंत्रांचे पठण करून देवांना प्रसन्न केले जाई. धर्माचा पाया सत्य, न्याय, 'ऋत' म्हणजे निसर्गचक्र अबाधित राखणे यांवर आधारलेला होता.




**माहीत आहे का तुम्हांला?**

भारतीय नौदलाच्या बोधचिन्हावरील ब्रीदवाक्य 'शं नो वरुणः' उपनिषदातील श्लोकावर आधारित आहे. या वाक्याचा अर्थ असा आहे, की वरुणदेवता आमचे रक्षण करो. नौदलाने या वाक्याच्या माध्यमातून जलाचा नियंत्रक आणि सागरी मार्गदर्शक असलेल्या वरुणदेवतेचा सन्मान केला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नौदल प्रमुखांचे बोधचिन्ह ठरवताना तत्कालीन गव्हर्नर जनरल सी. राजगोपालाचारी यांनी हे ब्रीदवाक्य सुचवले होते. भारतीय नौदलाचे नवीन चिन्ह छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेने प्रेरित आहे.




**राजकीय व्यवस्था :** वैदिक काळातील समाजात राजाचे स्थान महत्त्वाचे होते. राजा हा केवळ सत्ताधारक नाही, तर तो धर्माचे आणि न्यायाचे पालन करणारा असावा अशी आदर्श राजाची कल्पना होती. राजाच्या निर्णयांमध्ये त्याला सल्ला देण्यासाठी दोन संस्था काम करत. त्यांना 'सभा' आणि 'समिती' या नावाने संबोधले जात होते. सभा म्हणजे ज्येष्ठ व्यक्तींचे मंडळ, जे महत्त्वाचे निर्णय घेण्यास मदत करत असे, तर समिती म्हणजे ग्राम किंवा समुदायातील सर्वसामान्य लोकांच्या उपस्थितीत चर्चा करण्यासाठी आयोजलेली बैठक. याव्यतिरिक्त 'विदथ' आणि 'जन' या संस्थादेखील राजाला मार्गदर्शन करत. सभा आणि 'विदथ' या संस्थांच्या कामकाजात स्त्रियांचाही सहभाग असे.



वेदकालीन रथ

राज्यकारभार उत्तम रीतीने चालवण्यास साहाय्य करण्यासाठी राजाने अधिकारी नेमलेले असत. **पुरोहित, सेनापती आणि सभापती हे विशेष महत्त्वाचे अधिकारी होते.** करवसुली करण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याला 'भागदुघ' असे म्हणत. 'जन'च्या उत्पन्नातील राजाचा 'भाग' गोळा करणारा तो भागदुघ. युद्धकाळात राजा स्वतः सैन्याचे नेतृत्व करत असे. राजकारभार मुख्यतः धर्म, न्याय, संरक्षण आणि समाजातील सुव्यवस्था या तत्त्वांवर आधारित होता.

वैदिक काळात जरी राजा राज्याचा प्रमुख होता, तरी त्याला सर्वाधिकार नव्हते. त्याला सभा आणि समितीच्या सल्ल्याने राज्यकारभार करावा लागत असे.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) एका शब्दात उत्तरे लिहा.**

१. 'विद' म्हणजे -----------------------------


२. गुरूजवळ बसून ज्ञान मिळवणे म्हणजे -----------

३. ज्येष्ठ व्यक्तीचे मंडळ म्हणजे ----------------

**ब) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) ऋग्वेद | अ) यज्ञातील मंत्रांचे गायन |
| २) यजुर्वेद | ब) आरोग्य व औषधोपचार |
| ३) सामवेद | क) देवतांची स्तवने |
| ४) अथर्ववेद | ड) यज्ञविधीचे वर्णन |

**प्र.२ अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**ब) टिपा लिहा.**

१. वैदिककालीन शिक्षणव्यवस्था

२. वैदिककालीन आर्थिक जीवन

३. वैदिक समाजातील स्त्रियांचे स्थान

**प्र.३ अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१. वैदिक संस्कृतीमध्ये शेतीला महत्त्व होते.

२. वैदिक काळातील समाजात स्त्रियांचे स्थान सन्मानाचे होते.

**ब) वैदिक काळातील मनोरंजनाची साधने व वर्तमानकाळातील मनोरंजनाची साधने यांतील साम्याचे व फरकाचे मुद्दे लिहा.**

**प्र.४ वैदिक काळातील राजकीय व्यवस्था यावरील तक्ता पूर्ण करा.**

| पद/संस्था | कार्य |
|---|---|
| सभा | -------------------------------- |
| समिती | -------------------------------- |
| भागदुघ | -------------------------------- |

**प्र.५ योगसाधना केल्यानंतर आपल्या जीवनशैलीत कोणते बदल येऊ शकतील?**

**उपक्रम**

- शिक्षणाचा मनोमन ध्यास घेतलेला शिष्य एकलव्य याच्या कथेचे नाट्यीकरण करून ते सादर करा.
- आंतरजालाच्या साहाय्याने वेदांमधील श्लोकांचा संग्रह करा.
- भारतीय वायूसेना, भूसेना यांची बोधचिन्हे आणि ब्रीदवाक्ये मिळवून उपक्रम वहीत लिहा.

***

# ५ विविध धर्मांची शिकवण



५.१. वैदिक धर्म
५.२. जैन धर्म
५.३. बौद्ध धर्म
५.४. ज्यू धर्म
५.५. ख्रिश्चन धर्म
५.६. इस्लाम धर्म
५.७. पारशी धर्म

भारत हा धार्मिक विविधतेचा देश आहे. प्राचीन काळापासून, भारतात विविध धर्मांचा उगम आणि विस्तार झाला आहे. वैदिक, जैन, बौद्ध, ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम आणि पारशी धर्म या सर्वांचे भारतीय संस्कृतीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. पुढे मध्ययुगीन काळात शिख धर्माची स्थापना झाली. प्रत्येक धर्माच्या शिकवणीमध्ये मूलभूत जीवनमूल्ये, सहिष्णुता, न्याय, आणि नैतिकता यांवर भर दिला गेला आहे.

ही धार्मिक विविधता भारतीय समाजाच्या संस्कृतीला एक वेगळी ओळख देते. सर्वसमावेशकता हा भारतीय संस्कृतीचा अंगभूत गुण आहे. या गुणाने आपल्या देशातील विविधतेतील एकता आजतागायत टिकवून ठेवलेली आहे.

**प्राचीन भारतात कोणत्या धर्मांचा प्रसार झाला?**

**या विविध धर्मांचे तत्त्वज्ञान आपल्याला काय शिकवते?**

या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी, या प्रकरणात आपण प्राचीन भारतातील विविध धर्मांचे तत्त्वज्ञान, शिकवण आणि त्या धर्मांच्या पद्धती यांचा परिचय करून घेणार आहोत.

प्राचीन भारतात धर्माचे अस्तित्व व्यक्तिगत श्रद्धेपेक्षा अधिक व्यापक विचाराला महत्त्व देणारे होते. त्यामध्ये जीवनाच्या अंतिम ध्येयांची प्राप्ती, सत्याचा पाठपुरावा आणि सहिष्णुता यांना अधिक महत्त्व होते. प्राचीन भारतात अनेक धर्मांचा प्रसार झाला. वैदिक धर्म हा श्रुती म्हणजे वेद, स्मृति म्हणजे वैदिक साहित्य आणि पुराणे यांनुसार आचरण असणारा आहे. जैन आणि बौद्ध धर्म हे प्राचीन धर्मप्रवाह आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकात ज्यू आणि ख्रिश्चन धर्मांचा भारतात प्रवेश झाला इस्लाम आणि पारशी धर्माचे अनुयायी इसवी सनाच्या साधारणपणे सातव्या–आठव्या शतकात भारतात आले.



**विचार करा.**

आपल्या कुटुंबातील धार्मिक सण, पूजा, प्रथा, परंपरा यांविषयी आजी–आजोबांकडून किंवा आई–वडिलांकडून जाणून घ्या. हे सण–उत्सव साजरे करणे, प्रथा, परंपरा पाळणे यांमागील तार्किक कारणे काय असावीत यांवर त्यांच्याशी चर्चा करा.

## ५.१. वैदिक धर्म

वैदिक धर्म हा भारतातील सर्वांत जुना धर्म मानला जातो. वेदवाङ्मय हा या धर्माचा मूलभूत आधार आहे. वैदिक लोक यज्ञ, निसर्गपूजन आणि त्यासाठी वेदातील मंत्रांद्वारे हवि अर्पण करत असत. प्राचीन भारतातील सर्वसामान्य लोकांचे जीवन साधे होते. धर्मावर आणि नैतिक मूल्यांवर आधारित होते.

उदाहरणार्थ, सत्यवचन, कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींचा आदर राखणे, नात्यांचा मान राखणे, दुसऱ्याला इजा पोहोचेल असे वर्तन न करणे यांवर भर दिला जात असे. कालांतराने हे विधी अधिक गुंतागुंतीचे झाले.

वैदिक धर्माच्या प्रमुख ग्रंथांमध्ये वेद, उपनिषदे, पुराणे आणि धर्मशास्त्रे यांचा समावेश आहे. वेदांमध्ये यज्ञ, मंत्र आणि देवता यांची माहिती दिलेली आहे. उपनिषदांमधील तत्त्वज्ञानात आत्मा, ब्रह्म, जीवनाचा उद्देश आणि मोक्ष यांची चर्चा आहे. त्यानुसार, मानवी जीवन, निसर्ग आणि विश्व हे सर्व एकाच, 'परब्रह्माचा' अविष्कार आहेत. त्यालाच 'तत्' असे म्हटले जाते. हा विचार दोन प्रसिद्ध वाक्यांमध्ये मांडला आहे.

**ती दोन वाक्ये अशी आहेत:**

अहं ब्रह्मास्मि – मी ब्रह्म आहे.

तत् त्वम् असि – तू तेच आहेस (तू 'तत्' आहेस.)

हिंदू धर्म हे वैदिक धर्माचे अधिक व्यापक रूप आहे. हिंदू धर्माने वेदांचे ज्ञान जपले तसेच भक्ती, तत्त्वज्ञान आणि मोक्षकल्पना यांचाही विचार रूढ केला. हिंदू धर्मामध्ये असे मानले जाते, की प्रत्येक व्यक्तीच्या कर्मावर त्याचे भवितव्य अवलंबून असते. धर्म म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हे. सत्य, नैतिकता, कर्तव्यपालन आणि समाजसेवा या मूल्यांचे पालन करणे हा व्यक्तीचा उपजत धर्म आहे. या मूल्यांनुसार वागणे म्हणजे धर्माचे पालन करणे. यज्ञ-होमहवन, उपासना-पूजापाठ करणे, सण आणि उत्सव साजरे करणे या सर्व गोष्टी हिंदू धर्माच्या जीवनशैलीचा भाग आहे. धर्मपालन आणि दैनंदिन जीवनातील व्यवहार यांची हिंदू जीवनशैलीत उत्तम सांगड घातली गेलेली आहे. प्राचीन भारतीय समाजात विकसित झालेल्या संस्कृती, कला, साहित्य आणि विज्ञान यांतही धर्मजीवन आणि व्यावहारिकता यांची सांगड घातली गेलेली दिसते.

'भगवद्गीता' हा हिंदूंचा पवित्र ग्रंथ आहे. फळाची आशा न धरता प्रत्येकाने आपापले कर्तव्य करावे, असे या ग्रंथात सांगितले आहे. इसवी सनाच्या आठव्या शतकात आद्य शंकराचार्य होऊन गेले. ज्ञान आणि वैराग्य या गोष्टींवर त्यांनी भर दिला. 'उपनिषदे', 'ब्रह्मसूत्रे' आणि 'भगवद्गीता' या ग्रंथांवर भाष्य लिहून त्यांचा अर्थ त्यांनी स्पष्ट केला. त्यांनी भारताच्या चार दिशांना बद्रिनाथ, द्वारका, जगन्नाथपुरी आणि शृंगेरी या ठिकाणी चार मठांची स्थापना केली.



आद्य शंकराचार्य

सर्वे भवन्तु सुखिनः – सर्व जण सुखी होवोत.

सर्वे सन्तु निरामयाः – सर्व जण व्याधीमुक्त राहोत.

सर्वे भद्राणि पश्यन्तु: – सर्व जणांना कल्याणकारी गोष्टींचा प्रत्यय येवो.

मा कश्चिद्दु:खभाग्भवेत्: – कोणीही दुःखी न होवो.

या संस्कृत श्लोकांतील ओळींमध्ये सर्व प्राणिमात्रांचे कल्याण व्हावे हा विचार आणि त्यांच्याविषयी करुणा व्यक्त केलेली आहे.



**करून पहा.**

"सात दिवसांत तुम्ही केलेली चांगली कामे" तुमच्या नोंदवहीत लिहून ठेवा. उदाहरणार्थ, मित्राला मदत केली, घरात साफसफाई केली, झाडाला पाणी घातले इत्यादी. आठवड्याच्या शेवटी वर्गात या कृती करताना मला काय शिकायला मिळाले? ते सांगा.



### माहीत आहे का तुम्हांला ?

भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरेतील विविध मतप्रवाहांतून निर्माण झालेले सहा प्रमुख मतप्रवाह आहेत. त्यांना 'षड्दर्शने' असे म्हणतात. भारतीय तत्वज्ञानातील या सहा दर्शनांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. 'दर्शन' या शब्दाचा अर्थ तत्वज्ञान असा आहे.

षड्दर्शनांमध्ये सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा आणि वेदांत या सहा दर्शनांचा समावेश होतो. या दर्शनांमध्ये विश्वाचे स्वरूप, सृष्टी, आत्मा आणि मोक्ष यांसारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधली जातात.

१. **सांख्य दर्शन :** या दर्शनात विश्वाची उत्पत्ती कशी होते, याचे स्पष्टीकरण दिले आहे.
२. **योग दर्शन :** हे दर्शन निरामय शरीरासाठी साधना आणि ध्यान यांच्याद्वारे आत्मज्ञान प्राप्त करण्यावर भर देते.
३. **न्याय दर्शन :** हे दर्शन तर्कशास्त्र आणि ज्ञान यांवर आधारित आहे.
४. **वैशेषिक दर्शन :** विश्व अणूंचे बनलेले आहे, हा या दर्शनाचा एक महत्त्वाचा सिद्धांत आहे.
५. **पूर्वमीमांसा दर्शन :** हे दर्शन वेदांमधील कर्मकांडांचे विश्लेषण करते.
६. **वेदांत दर्शन :** हे दर्शन उपनिषदांच्या तत्वज्ञानावर आधारित आहे.

## ५.२. जैन धर्म

जैन धर्म हा भारतातील प्राचीन धर्मांपैकी एक धर्म आहे. या धर्मात 'अहिंसा' या तत्वाला महत्व दिलेले आहे. धर्मज्ञान प्रकट करणाऱ्यास जैन धर्मात 'तीर्थंकर' म्हणतात. जैन परंपरेत सांगितल्याप्रमाणे एकूण २४ तीर्थंकर होऊन गेले. वर्धमान महावीर जैन धर्माच्या परंपरेतील चोविसावे तीर्थंकर होत.

### वर्धमान महावीर (इ.स.पू ५९९ ते इ.स.पू ५२७)

आज ज्या राज्याला आपण बिहार या नावाने ओळखतो, त्या राज्यामध्ये प्राचीन काळी वृज्जी नावाचे एक महाजनपद होते. त्याची राजधानी होती वैशाली. वैशाली नगराचा एक भाग असलेल्या कुंडग्राम येथे वर्धमान महावीरांचा जन्म झाला. त्यांच्या पित्याचे नाव सिद्धार्थ आणि आईचे नाव त्रिशला होते.

वर्धमान महावीरांनी ज्ञानप्राप्तीसाठी घरादाराचा त्याग केला. साडेबारा वर्षे तपश्चर्या केल्यानंतर त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. हे ज्ञान 'केवल' म्हणजे 'विशुद्ध' स्वरूपाचे होते, म्हणून त्यांना 'केवली' असे म्हटले जाते. शरीराला सुखकारक वाटणाऱ्या गोष्टींनी होणारा आनंद आणि त्रासदायक गोष्टींनी होणारी पीडा, यांचा स्वतःवर काहीही परिणाम होऊ न देणे, म्हणजे विकारांवर विजय मिळवणे. असा विजय त्यांनी मिळवला, म्हणून त्यांना 'जिन' म्हणजे 'जिंकणारा', असे म्हटले जाऊ लागले. 'जिन' या शब्दापासून जैन हा शब्द तयार होतो. विकारांवर विजय मिळवणारे महान वीर म्हणून वर्धमान यांना 'महावीर' म्हटले जाते. ज्ञानप्राप्तीनंतर लोकांना धर्म समजावून सांगण्यासाठी त्यांनी सुमारे तीस वर्षे उपदेश केला. लोकांना धर्म



वर्धमान महावीर

सहजपणे कळावा म्हणून वर्धमान महावीर 'अर्धमागधी' या लोकभाषेतून लोकांशी संवाद साधत. त्यांनी सांगितलेला धर्म हा शुद्ध आचरणावर भर देणारा होता. शुद्ध आचरणासाठी त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे सार पंचमहाव्रते आणि त्रिरत्ने यांमध्ये सामावलेले आहे.

लोकांना उपदेश करण्यासाठी तीर्थंकरांच्या ज्या सभा होत, अर्धमागधी भाषेत त्यांना 'समवसरण' असे म्हणत असत, हे समवसरण समतेवर आधारलेले असे. या समवसरणांमध्ये सर्व वर्णांतील लोकांना प्रवेश असे.

**पंचमहाव्रते :** पंचमहाव्रते म्हणजे अत्यंत काटेकोरपणे पाळण्याचे पाच नियम.

**१. अहिंसा :** कोणत्याही जीवाला दुखापत होईल किंवा त्याची हिंसा होईल असे वागू नये.

**२. सत्य :** प्रत्येक वचन आणि कृती खरेपणाची असावी.

**३. अस्तेय :** 'स्तेय' म्हणजे चोरी. दुसऱ्याच्या मालकीची किंवा हक्काची गोष्ट मालकाच्या संमतीशिवाय घेणे म्हणजे चोरी. चोरी न करणे, म्हणजे अस्तेय.

**४. अपरिग्रह :** मनात हाव बाळगून मालमत्तेचा साठा करण्याकडे माणसाचा कल असतो. असा साठा न करणे, म्हणजे अपरिग्रह.

**५. ब्रह्मचर्य :** शरीराला सुखकारक वाटणाऱ्या गोष्टींचा त्याग करून व्रतांचे पालन करणे म्हणजे ब्रह्मचर्य.

**त्रिरत्ने :** त्रिरत्ने म्हणजे १. 'सम्यक् दर्शन', २. 'सम्यक् ज्ञान' आणि ३. 'सम्यक् चारित्र' ही तीन तत्त्वे. सम्यक् याचा अर्थ 'संतुलित' असा आहे.

**१. सम्यक् दर्शन :** तीर्थंकरांच्या उपदेशातील सत्य जाणून घेऊन त्यावर श्रद्धा ठेवणे.

**२. सम्यक् ज्ञान :** तीर्थंकरांच्या उपदेशाचा आणि तत्त्वज्ञानाचा नित्य अभ्यास करून, त्याचा सखोल अर्थ समजून घेणे.

**३. सम्यक् चारित्र :** पंचमहाव्रतांचे काटेकोर आचरण करणे.

**उपदेशाचे सार :** महावीरांच्या उपदेशातील 'अनेकान्तवाद' म्हटला जाणारा सिद्धान्त सत्याच्या शोधासाठी फार महत्त्वाचा मानला जातो. अनेकान्त या शब्दातील 'अन्त' या शब्दाचा 'पैलू' असा अर्थ आहे. सत्याचा शोध घेताना विषयाच्या केवळ एखाददुसऱ्या पैलूवर लक्ष देऊन निष्कर्ष काढल्यास सत्याचे पूर्ण ज्ञान होऊ शकत नाही. म्हणून त्या विषयाच्या अनेक पैलूंकडे लक्ष देणे आवश्यक असते, असे या सिद्धान्तात मानण्यात आले आहे. या सिद्धान्तामुळे समाजामध्ये स्वतःच्या मतांविषयी दुराग्रह धरण्याची वृत्ती राहत नाही. इतरांच्या मतांविषयी सहिष्णुता निर्माण होते.

मनुष्याचा मोठेपणा त्याच्या वर्णावर अवलंबून नसून त्याच्या उत्तम चारित्र्यावर अवलंबून असतो, अशी वर्धमान महावीरांची शिकवण होती. स्त्रियांना ज्ञान मिळवण्याचे मार्ग वैदिक परंपरेमध्ये हळूहळू बंद झाले होते, मात्र वर्धमान महावीरांनी स्त्रियांनाही संन्यास घेण्याचा अधिकार दिला. सर्व प्राणिमात्रांवर प्रेम करा, मनामध्ये इतरांबद्दल दया आणि करुणा असू द्या, जगा आणि जगू द्या, असा उपदेश त्यांनी केला.



**विचार करा.**

'सत्य बोलणे' हे तत्त्व आचरणात आणण्याचा उपयोग आजच्या काळात कसा होईल?

'प्रेम आणि दया' या तत्त्वज्ञानाचा आधुनिक समाजात कसा उपयोग होईल?

'अहिंसा' या तत्त्वाचे सध्याच्या काळात काय महत्त्व आहे?

आपण नागरिक म्हणून ही तत्त्वे आचरणात कशी आणू शकतो?

## ५.३. बौद्ध धर्म

बौद्ध धर्माचा प्रसार भारतामध्ये आणि भारताबाहेरील अनेक देशांमध्ये झाला. गौतम बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक होते.

### गौतम बुद्ध (इ. स. पू ५६३ ते इ. स. पू ४८३)

गौतम बुद्धांचा जन्म नेपाळमधील लुंबिनी वनात झाला. त्यांच्या पित्याचे नाव शुद्धोदन आणि आईचे नाव महामाया (मायादेवी) होते. गौतम बुद्धांचे मूळ नाव सिद्धार्थ होते. त्यांना मानवी जीवनाचे संपूर्ण ज्ञान प्राप्त झाले होते, म्हणून त्यांना 'बुद्ध' असे म्हटले गेले. मानवी जीवनात दुःख का आहे, हा प्रश्न त्यांना



गौतम बुद्‌ध

पडला. त्याचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला. एका वैशाख पौर्णिमेला बिहारमधील गया शहरापासून जवळच असलेल्या ऊरुवेला या ठिकाणी एका पिंपळाच्या झाडाखाली ते ध्यानस्थ बसले होते. त्या वेळी त्यांना 'ज्ञान' प्राप्त झाले. त्या पिंपळाच्या वृक्षाला आता 'बोधिवृक्ष' असे म्हणतात. तसेच 'ऊरुवेला' या स्थानाला 'बोधगया' असे म्हणतात. त्यांनी पहिले प्रवचन वाराणसीजवळ सारनाथ येथे दिले. या प्रवचनात त्यांनी जो उपदेश केला, त्यास 'धम्म' असे म्हटले जाते. या प्रवचनाद्‌वारे त्यांनी धम्माच्या चक्राला गती दिली म्हणून या घटनेला 'धम्मचक्कपवत्तन' असे पाली भाषेत म्हटले जाते. संस्कृतमध्ये त्याला 'धर्मचक्रप्रवर्तन' असे म्हटले जाते. नंतरच्या काळात त्यांनी धम्माचा उपदेश करण्यासाठी



बोधिवृक्ष

सुमारे पंचेचाळीस वर्षे चारिका केली. चारिका म्हणजे पायी फिरणे. त्यांनी आपला उपदेश पाली या लोकभाषेत केला. बौद्‌ध धम्मामध्ये बुद्‌ध, धम्म आणि संघ यांना शरण जाण्याची संकल्पना महत्त्वाची आहे. या संकल्पनेला 'त्रिशरण' असे म्हणतात. त्यांनी सांगितलेल्या धम्माचे सार पुढीलप्रमाणे आहे.

**आर्यसत्ये:** मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्ये आहेत. त्यांना आर्यसत्ये म्हटलेले आहे.

**१. दुःख :** मानवी जीवनात दुःख असते.

**२. दुःखाचे कारण :** दुःखाला कारण असते.

**३. दुःख-निवारण :** दुःख दूर करता येते.

**४. प्रतिपद :** प्रतिपद म्हणजे मार्ग. हा दुःखाचा अंत करण्याचा मार्ग आहे. हा मार्ग शुद्‌ध आचरणाचा आहे. या मार्गाला 'अष्टांगिक मार्ग' असे म्हटले आहे.

**पंचशील :** गौतम बुद्‌धांनी पाच नियमांचे पालन करण्यास सांगितले. त्या नियमांनाच 'पंचशील' असे म्हणतात.

१. प्राण्यांची हत्या न करणे.

२. चोरी करण्यापासून दूर राहणे.

३. अनैतिक आचरणापासून दूर राहणे.

४. असत्य बोलण्यापासून दूर राहणे.

५. मादक पदार्थांच्या सेवनापासून दूर राहणे.

**बौद्‌ध संघ :** आपल्या धम्माचा उपदेश करण्यासाठी त्यांनी भिक्खूंचा संघ निर्माण केला. गृहस्थ जीवनाचा त्याग करून संघात प्रवेश करणाऱ्या त्यांच्या अनुयायांना 'भिक्खू' असे म्हटले जाते. बुद्‌धांप्रमाणे भिक्खूही चारिका करून लोकांना धम्माचा उपदेश करत असत. स्त्रियांचा स्वतंत्र संघ होता. त्यांना 'भिक्खुनी' असे म्हणतात. बौद्‌ध धर्मात सर्व वर्णांतील व जातींमधील लोकांना प्रवेश होता.

## माहीत आहे का तुम्हांला?

**अष्टांगिक मार्ग**

**१. सम्यक् दृष्टी :** चार आर्यसत्यांचे ज्ञान होय.

**२. सम्यक् संकल्प :** हिंसा वगैरे तत्त्वांचा त्याग होय.

**३. सम्यक् वाचा :** असत्य, चहाडी, कठोरता आणि निरर्थक बडबड न करणे.

**४. सम्यक् कर्मान्त:** प्राण्यांची हत्या करणे, चोरी करणे आणि स्वैराचार यांच्यापासून दूर राहणे.

**५. सम्यक् आजीव :** उपजीविका गैर मार्गाने न करता योग्य मार्गाने करणे.

**६. सम्यक् व्यायाम :** व्यायाम म्हणजे प्रयत्न करणे होय. वाईट कर्मे उत्पन्न होऊ नयेत; उत्पन्न झाली असल्यास त्यांचा त्याग करावा; चांगली कर्मे उत्पन्न व्हावीत; तसेच ती उत्पन्न झाली असल्यास ती नष्ट होऊ नयेत, यांसाठी प्रयत्न करणे.

**७. सम्यक् स्मृती :** मन एकाग्र करून लोभ वगैरे विकारांना दूर करणे आणि आपले चित्त वगैरेंना योग्य रीतीने समजून घेणे.

**८. सम्यक् समाधी :** चित्त एकाग्र करून ध्यानाचा अनुभव घेणे.

**उपदेशाचे सार :** गौतम बुद्धांनी मानवी बुद्धीच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. वर्ण वगैरेंच्या आधारे मानली जाणारी विषमता नाकारली. जन्माने कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाही, तर आचरणावरूनच श्रेष्ठ-कनिष्ठता ठरते. 'छोटीशी चिमणीदेखील आपल्या घरट्यात स्वच्छंदपणाने चिवचिवते' हे त्यांचे वचन विख्यात आहे. ते स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांविषयींचे त्यांचे चिंतन दर्शवते. पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही स्वतःची उन्नती करण्याचा अधिकार आहे असा त्यांनी उपदेश केला. यज्ञासारख्या कर्मकांडाला विरोध केला. त्यांनी उपदेशलेली प्रज्ञा, शील, करुणा इत्यादी मूल्ये मानवाचे कल्याण साधणारी आहेत. सर्व प्राणिमात्रांविषयीची 'करुणा' हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे असाधारण वैशिष्ट्य होते.

## सांगा पाहू!

गौतम बुद्धांनी उपदेशलेली सहिष्णुता केवळ भारतीय समाजालाच नव्हे, तर सर्व मानवजातीला आजही मार्गदर्शक का ठरते?

## करून पहा.

जातक कथांमुळे बौद्ध धर्माची मूलभूत शिकवण सहज समजते. त्यातून आपल्याला नैतिक मूल्ये आणि जीवनाचे धडे मिळतात. तुमच्या वाचनालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकातून किंवा आंतरजालाच्या मदतीने एक जातक कथा निवडा आणि त्याचे वर्गात सादरीकरण करा.

**लोकायत :** लोकायत किंवा चार्वाक या नावाने ओळखला जाणारा प्राचीन काळातील विचारप्रवाहही महत्त्वाचा आहे. त्याचा भर स्वतंत्र विचारावर होता. त्याने वेदांचे प्रामाण्य नाकारले.

प्राचीन काळात भारतीय भूमीत नवनवीन धर्मिक विचारांचे स्रोत निर्माण होत राहिले. कालांतराने ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम आणि पारशी हे धर्म भारतीय समाजात रुजले.

## ५.४. ज्यू धर्म

ज्यू धर्माचे लोक साधारणपणे इसवी सनाच्या पहिल्या ते तिसऱ्या शतकात केरळमधील कोची येथे आले असावेत. ज्यू धर्माला 'यहुदी' धर्म असेही म्हटले जाते. देव एकच आहे, असे ज्यू धर्मीय मानतात.



सिनॅगॉग

'तोराह' हा ज्यू धर्माचा प्रमुख ग्रंथ आहे. ज्यू धर्माच्या शिकवणीत न्याय, सत्य, शांती, प्रेम, करुणा, विनम्रता, दान करणे, चांगले बोलणे आणि स्वाभिमान या गुणांवर भर दिलेला आहे. त्यांच्या प्रार्थनास्थळाला 'सिनॅगॉग' असे म्हणतात.

### ५.५. ख्रिश्चन धर्म

ख्रिश्चन धर्माची स्थापना येशू ख्रिस्तांनी केली. तो जगभर पसरला आहे. येशू ख्रिस्तांच्या १२ शिष्यांपैकी एक असणारे सेंट थॉमस हे इसवी सनाच्या पहिल्या शतकात केरळमध्ये आले. त्यांनी त्रिचूर जिल्ह्यातील पल्लयूर येथे इसवी सन ५२ मध्ये चर्चची स्थापना केली. ख्रिश्चन धर्माच्या शिकवणीनुसार देव एकच आहे. तो सर्वांचा प्रेमळ पिता आहे आणि सर्वशक्तिमान आहे. येशू ख्रिस्त हे देवाचे पुत्र असून मानवजातीच्या उद्‌धारासाठी पृथ्वीवर आलेले होते असे मानले जाते. आपण सारे एकमेकांचे बंधुभगिनी आहोत. आपण सर्वांवर प्रेम केले पाहिजे, अगदी शत्रूवर देखील. चुकलेल्यांना क्षमा केली पाहिजे, असे ख्रिश्चन धर्मामध्ये सांगितले आहे. 'बायबल' हा ख्रिश्चन धर्माचा पवित्र धर्मग्रंथ आहे. ख्रिश्चन लोकांच्या प्रार्थनास्थळाला 'चर्च' असे म्हणतात.



चर्च



**करून पहा.**

एका कागदावर सर्व धर्मांचे सकारात्मक संदेश लिहा आणि एकमेकांना द्या. सर्वांनी एकत्र येऊन त्या सकारात्मक संदेशांची एक साखळी तयार करा आणि वर्गात त्याचे वाचन करा.

### ५.६. इस्लाम धर्म

इस्लाम हा एकेश्वरवाद मानणारा धर्म आहे. अल्ला एकच असून मुहम्मद पैगंबर त्याचे प्रेषित आहेत. ईश्वराचा संदेश पैगंबरांमार्फत पवित्र 'कुरआन' या धर्मग्रंथामधून प्रकट झालेला आहे. 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ 'शांती' असा आहे. या शब्दाचा अर्थ 'अल्लाहला शरण जाणे' असाही होतो. सर्व काळी आणि सर्वत्र फक्त अल्लाह आहे, तो सर्वशक्तिमान आणि परम दयाळू आहे, असे इस्लाममध्ये सांगितलेले आहे. मानवी अस्तित्वाचा हेतू अल्लाहची उपासना करणे हाच आहे, असे मानलेले आहे. मनुष्याने आयुष्यात कसे वागावे याचे मार्गदर्शन पवित्र 'कुरआन' या धर्मग्रंथात केलेले आहे. भारत आणि अरबस्तान यांमध्ये फार प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. अरबस्तानातील व्यापारी केरळच्या किनाऱ्यावरील बंदरांना भेट देत असत. इसवी सनाच्या सातव्या शतकात अरबस्तानात इस्लामचा प्रसार झाला. त्याच शतकात अरबी व्यापाऱ्यांमार्फत भारतामध्ये इस्लामचे आगमन झाले. इस्लाम धर्माच्या प्रार्थनास्थळाला 'मशीद' असे म्हणतात.



मशीद

### ५.७. पारशी धर्म

पारशी लोक आणि वैदिक संस्कृतीचे लोक यांच्यामध्ये प्राचीन काळापासून संबंध होते. पारशी धर्माच्या पवित्र ग्रंथाचे नाव 'अवेस्ता' असे आहे. 'ऋग्वेद' आणि 'अवेस्ता' यांतील भाषेमध्ये साम्य आहे. पारशी लोक इराणच्या 'पार्स' किंवा 'फार्स' नावाच्या प्रांतातून भारतात आले, म्हणून त्यांना

'पारशी' या नावाने ओळखले जाते. ते प्रथम गुजरातमध्ये आले. ते इसवी सनाच्या आठव्या शतकात आले असावेत असे काहींचे मत आहे. झरथुष्ट्र हे पारशी धर्माचे संस्थापक होते. 'अहुर मज्द्' या नावाने त्यांच्या देवाचा उल्लेख केला जातो. पारशी धर्मामध्ये अग्नी आणि पाणी या दोन तत्त्वांना अत्यंत महत्त्व आहे. त्यांच्या देवळांमध्ये पवित्र अग्नी प्रज्वलित केलेला असतो. त्या देवळांना 'अग्यारी' असे म्हणतात. उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती ही तीन प्रमुख आचरणतत्त्वे हा पारशी विचारसरणीचा गाभा आहे.



अग्यारी

**पारशी धर्माचे तत्त्वज्ञान सांगते :**
"जगात चांगुलपणा आणि वाईटपणा यांचा संघर्ष सतत चालू असतो. माणसाने नेहमी चांगुलपणाचा मार्ग निवडावा."



**करून पहा.**

'धार्मिक सामंजस्य' या विषयावर पोस्टर किंवा चार्ट तयार करा. त्यात विविध धर्मांच्या तत्त्वज्ञानाचा समावेश करून वर्गात पोस्टरचे प्रदर्शन भरवा.

भारतात प्राचीन काळापासून धार्मिक सहिष्णुता होती. भारतीय संस्कृतीमध्ये 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ती' हे सूत्र रुजलेले आहे. त्याचा अर्थ अंतिम सत्य एकच आहे, त्याला अनेक नावे दिली जातात, असा होतो. त्यामुळे भारतीय समाजाने कायमच सर्वांना सामावून घेतले. सर्व धर्मांचा भारताच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांवर मोठा प्रभाव पडला. या धर्मांच्या अनुयायांनी सांस्कृतिक समृद्धी, सामाजिक सौहार्द आणि धार्मिक सहिष्णुता या विचारांना प्रोत्साहन दिले. धार्मिक विविधता असलेला भारत आजही या सर्व धर्मांच्या समन्वयाने समृद्ध आहे आणि इतर धर्मांसोबत सहिष्णुतेने जगणे हे त्याचे वैशिष्ट्य आहे.



**माहीत आहे का तुम्हांला?**

'प्रत्येक धर्माचे तत्त्वज्ञान जीवनाच्या नैतिकतेवर, शांतीवर आणि समाजातील न्यायावर आधारित आहे.'



## स्वाध्याय

**प्र.१ एका शब्दात उत्तरे लिहा.**

१. भारतीय संस्कृतीचा अंगभूत गुण ------------

२. जैन धर्मात धर्मज्ञान प्रकट करणारा -----------

३. गौतम बुद्धांनी पहिले प्रवचन वाराणसीजवळ ------------------ येथे दिले.

४. ज्यू धर्मियांचा प्रमुख धर्मग्रंथ ---------------

५. इस्लाम धर्मियांचे प्रार्थनास्थळ ------------

**प्र.२ अ) तक्ता पूर्ण करा.**

| धर्म | धर्मग्रंथ | प्रार्थनास्थळ |
|---|---|---|
| ----------- | ----------- | सिनॅगॉग |
| ----------- | बायबल | ----------- |
| ----------- | ----------- | मशीद |
| ----------- | अवेस्ता | ----------- |

ब)

| दर्शन | स्पष्टीकरण |
|---|---|
| ----------- | विश्वाची उत्पत्ती कशी होते, याचे विवेचन |
| योग दर्शन | ----------- |
| ----------- | तर्कशास्त्र व ज्ञान यावर आधारित |
| वैशेषिक दर्शन | ----------- |
| ----------- | वेदांमधील कर्मकांडाचे विश्लेषण |
| वेदांत दर्शन | ----------- |

**क) घटना योग्य कालक्रमानुसार लिहा.**

१. गौतम बुद्ध यांनी भ्रमण करून लोकांना उपदेश केला.

२. गौतम बुद्धांचा जन्म लुंबिनी येथे झाला.

३. बोधगया येथे बोधिवृक्षाखाली ध्यान करत असताना त्यांना ज्ञानप्राप्ती झाली.

**प्र.३ टिपा लिहा.**

१. आर्यसत्य २. भगवद्‌गीता

३. पंचशील तत्त्वे ४. त्रिरत्ने

**प्र.४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. विविध धर्मांतील अहिंसा, करुणा व सत्य यांसारख्या मूल्यांचा समाजावर काय परिणाम होतो ?

२. कोणत्याही दोन भिन्न धर्मांच्या शिकवणीत असलेली समानता सोदाहरण सांगा.

**प्र.५ प्रार्थना/ध्यान-धारणा, विपश्यना यांमुळे मानवी समूहाला कोणते फायदे होतात?**

**कृती**

- विविध धर्मांच्या सणांची माहिती एकत्र करा.
- 'सर्वधर्मसमभाव' यावर गटचर्चा करा.
- पाठात आलेली महत्त्वाची ठिकाणे नकाशात दाखवा. उदाहरणार्थ - धार्मिक स्थळे, स्तूप, जन्मस्थाने इत्यादी.

## उपक्रम

१. खालील रिकाम्या जागी तुमच्या आवडीचा सण व निसर्ग यांचे नाते दर्शवणारे चित्र काढा.

***

# ६ जनपदे आणि महाजनपदे




६.१ जनपद
६.२ महाजनपद
६.३ गणराज्य
६.४ मगध राज्याचा उदय




**माहिती करून घ्या.**

गाव किंवा शहराचा कारभार कोणामार्फत आणि कसा चालतो याविषयी माहिती घ्या.

प्राचीन भारतात अनेक छोट्या-छोट्या गाववसाहती होत्या, तेथे लोक शेती करत, व्यापार करत आणि एकत्रितपणे राहत असत. हळूहळू गाववसाहतींच्या कारभारासाठी गाववसाहतींचे समूह तयार झाले. अशा समूहाला 'जनपद' हे नाव मिळाले.

जसजसा काळ पुढे सरकला, तसतशी काही जनपदे प्रबळ होत गेली. त्यांच्याकडे सैन्य, सुपीक जमीन, उत्तम प्रशासन आणि समृद्ध व्यापार होता. जनपदांचा विस्तार होत होत त्यांचे रूपांतर पुढे महाजनपदांमध्ये झाले.



**चर्चा करा.**

**एवढ्या मोठ्या राज्यांमध्ये कोण सर्वांत शक्तिशाली ठरले असेल?**

**जनपदे, महाजनपदे आणि राज्ये यांमध्ये काय फरक असेल?**

**काही जनपदांचा विस्तार झाला तो कसा झाला असेल?**

आता आपण तत्कालीन समाजजीवन आणि शासनव्यवस्थेचे स्वरूप समजून घेऊ या.

## ६.१ जनपद

साधारणपणे इसवी सनपूर्व १००० ते इसवी सनपूर्व ६०० हा कालखंड म्हणजे उत्तर-वैदिक कालखंड मानला जातो. या काळात लोक हळूहळू अधिक स्थिर झाले. काही ठिकाणी त्यांच्या स्थायी गाव वसाहती निर्माण झाल्या. या गाव वसाहती पुढे 'जनपदे' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. 'जनपद' म्हणजे एका विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांचा समूह, तेथे लोक एकत्र राहून शेती, पशुपालन आणि छोट्या प्रमाणावर व्यापार करत. हे लोकसमूह एकाच जमातीचे असल्याने त्यांच्या जमातीचे नाव जनपदांना दिले जात असे. जनपदाचा एक प्रमुख असायचा, पण सर्व निर्णय समाजातील ज्येष्ठ लोकांच्या सल्ल्यानुसार घेतले जात. जनपदातील लोकजीवन परस्पर सहकार्यावर अवलंबून होते. जनपद हे प्राचीन भारतीय राजकीय व्यवस्थेची पहिली पायरी मानली जाते, तेथे लोकांचा सहभाग, सामूहिक निर्णय आणि सामाजिक संघटना या गोष्टींवर भर देण्यात आला.

## ६.२ महाजनपद

इसवी सनपूर्व सुमारे ६व्या शतकामध्ये काही जनपदे आर्थिक व्यवहाराच्या, सैन्यव्यवस्थेच्या आणि प्रशासनाच्या दृष्टिकोनातून अधिक सामर्थ्यशाली बनू लागली. अशा मोठ्या राज्यांना 'महाजनपद' अशी ओळख मिळाली. महाजनपदात अनेक गावे, नगरे, व्यापाराचे मार्ग आणि सशस्त्र सैन्य यांचा समावेश होता.




महाजनपदांमध्ये राजा किंवा सल्लागार मंडळ नेतृत्व करत असे. येथील प्रशासन व्यवस्था सुव्यवस्थित होती. महाजनपदांमध्ये शेती, व्यापार, बाजारपेठा आणि कला यांचा विकास झाला. काही जनपदांनी त्यांच्या शेजारील जनपदांचा पराभव करून त्यांचा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला. इसवी सनपूर्व ६व्या शतकापर्यंत महाजनपदांमधील सोळा महाजनपदांना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे –

**महाजनपदे आणि त्यांच्या राजधानीची नगरे :**

१. काशी–वाराणसी
२. कोसल–श्रावस्ती
३. अंग–चंपा
४. मगध–गिरीव्रज/ राजगृह
५. वृज्जी/ वज्जी–वैशाली
६. मल्ल/मालव–कुशिनार/कुशीनगर

७. चेदि–शुक्तिमती/सोथ्थिवती
८. वंश/वत्स–कौशांबी
९. कुरु–इंद्रप्रस्थ/इंद्रपट्टण
१०. उत्तर पांचाल–अहिच्छत्र, दक्षिण पांचाल–कांपिल्य
११. मत्स्य–विराटनगर
१२. शूरसेन–मथुरा
१३. अश्मक/अस्सक–पोटली/पोतन/पोदन
१४. अवंती–उज्जयिनी आणि महिष्मती
१५. गांधार–तक्षशिला
१६. कंबोज–राजपूर

महाजनपदांचा विकास हा प्राचीन भारतातील साम्राज्ये उदयाला येण्यापूर्वीचा टप्पा होता. सोळा महाजनपदांमध्येही मगध, कोसल, वत्स, अवंती ही चार महाजनपदे अधिक सामर्थ्यवान होत गेली. महाजनपद हे जनपदांच्या तुलनेत लोकसंख्या, भूभाग आणि साधनसंपत्ती यांनी मोठे होते.

## ६.३ गणराज्य

काही महाजनपदांमध्ये प्रशासन पद्धतीत जनपदातील सर्वसामान्य लोकांचा सहभाग असे त्याला 'गणराज्य' असे म्हणतात. गणराज्यांमध्ये सर्व निर्णय राजाच्या हाती केंद्रित नसून, सल्लागार मंडळाच्या मदतीने घेतले जात असत. या मंडळात वयोवृद्ध व्यक्तींचा, योद्ध्यांचा किंवा निवडून आलेल्या लोकांचा समावेश असे. जनपदांमधील ज्येष्ठ व्यक्तींची 'गणपरिषद' असे. गणपरिषदेचे सदस्य एकत्रितपणे चर्चा करून राज्यकारभारासंबंधीचे निर्णय घेत असत. त्यासंबंधीच्या चर्चा ज्या सभागृहात होत असत, त्याला 'संथागार' असे म्हटले जाई. उदाहरणार्थ, वृज्जी संघ हे गणराज्य होते, तेथे निर्णयप्रक्रियेत सर्वसामान्यांचा सहभाग असायचा. त्याचप्रमाणे, मल्ल गणराज्यामध्ये देखील सामूहिक नेतृत्वाची पद्धत होती. या गणराज्यांमुळे प्राचीन भारतात लोकशाहीची सुरुवात झाली असे म्हणता येते. प्राचीन भारतात राजसत्ताक आणि गणराज्य पद्धती कार्यरत होत्या.



**माहिती करून घ्या.**

**गणपरिषदेतील मतदान पद्धती** – सभागृहातील सदस्यांच्या बहुमताने निर्णय मंजूर होत असे. मतदानाचे स्वरूप खुले मतदान, आवाजी मतदान किंवा गोपनीय पद्धतीने मतदान अशा वेगवेगळ्या प्रकारचे होते. सभासदाच्या मताला 'छंद' असे म्हटले जाई. विविध रंगांच्या 'दांड्या' मतदानासाठी वापरल्या जात, त्यांना 'शलाका' असे म्हणत. मतदान प्रक्रिया राबवणाऱ्या व्यक्तीला 'शलाका ग्राहक' म्हणत असत. अनुपस्थित सभासदांनाही मतदानाचा अधिकार देण्यात आला होता, मात्र शक्यतो उपस्थित मतदानावरच निर्णय घेतले जात असत.



**विचार करा.**

गणराज्यातील मतदान पद्धती आणि सध्याची मतदान पद्धती यांची तुलना करा.

## ६.४ मगध राज्याचा उदय

सुमारे इसवी सनपूर्व ६व्या शतकामध्ये महाजनपदांमध्ये मगध हे सर्वांत सामर्थ्यशाली आणि प्रभावी महाजनपद म्हणून उदयास आले. प्राचीन भारतातील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून ते महत्वपूर्ण ठरले. मगध साम्राज्याचा उदय होण्यामागील काही प्रमुख कारणे होती –

**भौगोलिक स्थानाचा फायदा**

- गंगा नदीच्या काठावरील सुपीक जमीन
- जलमार्गाने व्यापार

**खनिज संपत्ती**

- विशेषतः लोखंडाचे मोठे नैसर्गिक साठे
- शेतीचे प्रगत तंत्र अवगत झाले.
- प्रगत शस्त्रांचा वापर होऊ लागला.

**राज्य ते साम्राज्य**

- बिंबिसार आणि अजातशत्रू यांसारख्या राजांनी राज्याचा विस्तार केला.
- पाटलीपुत्र येथे राजधानी स्थापन केली कारण हे लष्करी, राजकीय तसेच आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे केंद्र होते. पाटलीपुत्र येथून संपूर्ण मगध प्रदेशाचे नियंत्रण सोपे झाले.
- प्रशासकीय सुधारणांमुळे राज्य अधिक संघटित झाले.

**स्थिर अर्थव्यवस्था**

- व्यापार आणि बाजारपेठा यांचा विकास
- महत्वाचे मध्यवर्ती व्यापारी केंद्र होते, जेथून वस्त्र, मसाले, धातू यांसारख्या मौल्यवान वस्तूंची निर्यात होत होती.

**राजकीय संबंध**


- इतर महाजनपदे समाविष्ट केली.
- राज्याच्या विस्तारासाठी वैवाहिक संबंध प्रस्थापित केले.


हे प्राचीन भारतातील साम्राज्य स्थापनेचे पहिले उदाहरण होय.

बिंबिसार राजाने मगध साम्राज्याचा पाया रचला. त्याच्या काळात मगधाचा व्यापार वाढला. शेतीव्यवस्था सुधारली आणि आर्थिक स्थिती सुधारली. त्याने राजगृह येथे मगधाची राजधानी स्थापन केली. बिंबिसारानंतर त्याचा पुत्र अजातशत्रू सत्तेवर आला. त्यानेही मगधचा विस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. अजातशत्रूने वृज्जी आणि कोसल ही महाजनपदे जिंकून घेतली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

अजातशत्रूने काही नवी शस्त्रे तयार करवून घेतली. त्याने 'महाशिलाकंटक' नावाचे मोठ्या





दगडांचा भडिमार करणारे यंत्र तयार केले, त्यामुळे शत्रूंच्या किल्ल्यांच्या भिंती सहज कोसळत असत. तसेच 'रथमुसल' नावाचा लोखंडी टोकदार पाती असलेला विशेष रथ त्याने तयार केला, जो शत्रूंच्या पायदळात घुसवून मोठे नुकसान करीत असे. या नव्या शस्त्रास्त्रांनी अजातशत्रूला वृज्जीसारख्या बलाढ्य गणराज्यांविरुद्धच्या युद्धात निर्णायक विजय मिळवण्यास मदत झाली आणि मगधचे सामर्थ्य अधिकाधिक वाढले.

अजातशत्रूने बिहारमधील पाटलीपुत्र (आजचे पाटणा शहर) येथे नवीन राजधानी प्रस्थापित केली.



**सांगा पाहू!**

राजधानी का महत्त्वाची असते? राजधानी कोठे असावी? याचे निकष कोणते? यावर शिक्षकांच्या मदतीने वर्गात चर्चा करा.

अजातशत्रू गौतम बुद्धांचा अनुयायी झाला. गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर अजातशत्रूच्या कारकिर्दीत राजगृह येथे बौद्ध धर्माची पहिली संगिती (परिषद) झाली.

अजातशत्रूनंतर होऊन गेलेल्या मगधाच्या राजांमध्ये शिशुनाग हा महत्त्वाचा शासक होता. त्याने अवंती, वत्स आणि कोसल या राज्यांवर विजय मिळवला त्यामुळे मगध राज्याचे सामर्थ्य अधिक वाढले.

शिशुनागानंतर नंद वंशाचा उदय झाला. महापद्मनंद हा नंद घराण्यातील सर्वांत प्रसिद्ध राजा होता. त्याने मगध साम्राज्याचा विस्तार केला. उत्तर भारतातील अनेक छोटी राज्ये त्याने आपल्या आधिपत्याखाली आणली. नंद राजे त्यांच्या मोठ्या सैन्यदलासाठी, संपत्तीसाठी आणि करव्यवस्थेसाठी प्रसिद्ध होते. नंद घराण्याच्या काळात मगध हे सर्वांत बलशाली राज्य बनले, परंतु शेवटचा राजा धनानंद हा अत्यंत अहंकारी होता. त्याने अनेक जाचक कर लादल्याने प्रजेत असंतोष वाढला होता. प्रशासन व्यवस्था भ्रष्ट झाल्याने मगध साम्राज्य दुर्बल होऊ लागले होते. अखेरीस आचार्य चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य यांनी नंद राजवटीचा शेवट केला आणि मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

जनपदांपासून साम्राज्यांपर्यंतचा प्रवास प्राचीन भारतातील राजकीय विकासाचा महत्वाचा टप्पा आहे, गाववसाहतींपासून सुरुवात होऊन मोठ्या राज्यांपर्यंत त्यांचे रूपांतर कसे झाले आणि गणराज्ये कशी विकसित झाली, हे समजते.



अजातशत्रू-शिल्प



## स्वाध्याय

**प्र.१ अ) योग्य पर्यायासमोर ☑ अशी खूण करा.**

१. गाववसाहतींच्या कारभारासाठी गाववसाहतीचे समूह तयार झाले, त्या समूहाला काय म्हणतात?
   अ) जनपद ☐
   ब) महाजनपद ☐
   क) राज्य ☐

२. मगध साम्राज्याचा पाया कोणी रचला?
   अ) शिशुनाग ☐
   ब) अजातशत्रू ☐
   क) बिंबिसार ☐

३. चंद्रगुप्त मौर्य याने कोणत्या राजवटीचा शेवट केला?
   अ) शिशुनाग ☐
   ब) नंद ☐
   क) मौर्य ☐

**ब) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. मतदान प्रक्रिया राबवणारी व्यक्ती | अ) बौद्ध धर्माचा स्वीकार |
| २. वृज्जी | ब) शलाका ग्राहक |
| ३. अजातशत्रू | क) महाजनपद |
| | ड) जनपद |

**प्र.२ एका शब्दात उत्तरे लिहा.**

१. नंद घराण्याचा शेवटचा राजा –
२. मोठ्या दगडांचा भडिमार करणारे यंत्र–
३. पाटलीपुत्र येथे राजधानी प्रस्थापित करणारा–

**प्र.३ अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. गाववसाहती कशा निर्माण झाल्या?
२. जनपदांची निर्मिती कशामुळे झाली ?
३. महाजनपदांच्या विकासामागील कारणे सांगा.

**ब) तुमच्या शब्दांत लिहा.**

१. मगध साम्राज्य अधिक सामर्थ्यशाली करण्यासाठी अजातशत्रूने कोणत्या सुधारणा केल्या?
२. गणपरिषदेतील मतदान पद्धती व आताची मतदान पद्धती यांतील काही साम्य व फरक सांगा.

**प्र.४ पाठातील नकाशाचे निरीक्षण करा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारताच्या वर्तमान आंतरराष्ट्रीय सीमारेषेबाहेर असणाऱ्या महाजनपदांची नावे लिहा.
२. 'अश्मक' हे महाजनपद सध्याच्या कोणत्या राज्यात येते?
३. महाजनपदे कोणत्या नदीच्या खोऱ्यात अधिक प्रमाणात आहेत?

**उपक्रम**

पाठात आलेली महाजनपदे आता भारतातील कोणत्या राज्यात येतात?
आतंरजालाच्या मदतीने त्यांचा शोध घेऊन महाजनपदे व राज्य अशी यादी तयार करा.
उदाहरणार्थ – अवंती : गुजरात

***

# ७ मौर्यकालीन भारत




७.१ मौर्य साम्राज्याची स्थापना

७.२ सम्राट अशोक

७.३ मौर्य साम्राज्यातील राज्यव्यवस्था

७.४ कला, स्थापत्य व लोकजीवन


'युगप्रवर्तन' म्हणजे काळ बदलणे, विचारांचा आणि मूल्यांचा नवीन प्रवाह समाजात निर्माण होणे. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या कृतींमुळे किंवा विचारांमुळे समाजाला नवी दिशा मिळते, तेव्हा त्या व्यक्तीला 'युगप्रवर्तक' असे म्हणतात.

अशाच एका युगप्रवर्तक काळाचा आरंभ इसवी सनपूर्व चौथ्या शतकातील झालेल्या मौर्य साम्राज्याच्या स्थापनेने झाला. त्या काळात भारत अनेक लहान-लहान राज्यांमध्ये विभागला गेला होता. परकीय आक्रमणे वाढली होती आणि या काळात मगध साम्राज्य दुर्बल होऊ लागले होते. या काळात चंद्रगुप्त मौर्याने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. एका नव्या युगाची ती सुरुवात होती. या कामात राजा चंद्रगुप्त याला आर्य चाणक्य यांची मदत झाली.

**विचार करा.**

- भारतातले पहिले मोठे आणि संघटित साम्राज्य कसे निर्माण झाले?
- सम्राट अशोकाने त्याच्या साम्राज्यात ठिकठिकाणी स्तंभलेख का उभारले असतील?

चला, आपण या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधायचा प्रयत्न करू या.


## ७.१ मौर्य साम्राज्याची स्थापना

आपण मागील पाठात पाहिले आहे, की मगध साम्राज्यामध्ये नंद वंशाचा राजा धनानंद राज्य करत होता. तो अत्यंत धनवान होता. प्रजेच्या मनात त्याच्याबद्दल असंतोष होता. चंद्रगुप्ताने धनानंदाचा पराभव केला. इसवी सनपूर्व ३२१ मध्ये चंद्रगुप्ताने मगध जिंकून घेतले. पुढे त्याने अवंती आणि सौराष्ट्र जिंकून घेऊन मौर्य साम्राज्याचा विस्तार केला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

आर्य चाणक्य यांना 'कौटिल्य किंवा विष्णुगुप्त' असेही म्हटले जाते. ते महान राजनीतिज्ञ आणि विद्वान होते. त्यांनी 'अर्थशास्त्र' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात शासनव्यवस्था, करपद्धती, संरक्षण, गुप्तहेर आणि राजकारण यांबाबत महत्त्वाची तत्त्वे सांगितली आहेत.

चंद्रगुप्त लहानपणी आपल्या मित्रांसोबत खेळताना राजाची भूमिका बजावत असे. तो एखाद्या झाडाखाली आपला 'दरबार' भरवत असे.



एके दिवशी, आर्य चाणक्य तेथून जात होते. त्यांनी चंद्रगुप्ताला राजाची भूमिका करताना पाहिले. चंद्रगुप्ताचे नैसर्गिक नेतृत्वगुण आणि न्याय देण्याची पद्धत पाहून चाणक्यांनी त्याच्यातील क्षमता

ओळखली. त्यांना खात्री पटली, की हाच मुलगा धनानंदाच्या अन्यायी सत्तेचा शेवट करू शकेल.

त्यानंतर आर्य चाणक्यांनी चंद्रगुप्ताला आपल्यासोबत नेले, त्याला प्रशिक्षण दिले आणि युद्धकलेत व प्रशासनात पारंगत केले. पुढे चंद्रगुप्ताने मौर्य साम्राज्याची स्थापना केली. विशाखदत्त याने लिहिलेल्या 'मुद्राराक्षस' या नाटकात धनानंदाचा पराभव करून चंद्रगुप्त मौर्याने त्याची सत्ता कशी स्थापन केली, हे सांगितलेले आहे.



**करून पहा.**

ग्रंथालयातील पुस्तकांच्या आधारे किंवा आंतरजालावरील संकेतस्थळावरून चंद्रगुप्त मौर्याच्या चरित्रासंबंधी जाणून घ्या. वर्गात त्याच्या आधारे कथेचे नाट्यीकरण सादर करा.

ग्रीक सम्राट अलेक्झांडर उर्फ सिकंदर याने इसवी सनपूर्व ३२६मध्ये भारतीय उपखंडाच्या वायव्य प्रदेशावर स्वारी केली. भारतातील पंजाब प्रांतापर्यंत तो आला. त्यानंतर त्याने मायदेशी परतण्याचा निर्णय घेतला, मात्र परतीच्या वाटेवर सिकंदराचा मृत्यू झाला. भारतातील जिंकलेल्या प्रदेशांच्या व्यवस्थेसाठी त्याने अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या होत्या. त्यांना 'सत्रप' असे म्हटले गेले. त्याच्या मृत्यूनंतर सत्रपांमध्ये सत्तेसाठी लढाया सुरू झाल्या. याच काळात ग्रीक सेनापती सेल्युकस निकेटर भारतावर आक्रमण करण्याचा प्रयत्न करत होता, मात्र त्याला चंद्रगुप्त मौर्याने पराभूत केले. त्यामुळे मौर्य साम्राज्याचे सामर्थ्य वाढले. सिकंदरानंतर भारतात ग्रीक सत्तेचा प्रभाव वाढला नाही. अफगाणिस्तानातील काबूल, कंदाहार, हेरात या प्रदेशांचा चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्यात समावेश झाला. मेगॅस्थिनिस हा सेल्युकस निकेटरचा राजदूत चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात राहिला होता. त्याच्या 'इंडिका' या ग्रंथातील वर्णन हे मौर्यकालीन भारताच्या अभ्यासाचे महत्त्वाचे साधन आहे.



**माहीत आहे का तुम्हांला?**

चंद्रगुप्त मौर्याच्या काळात सध्याच्या गुजरात राज्यातील जुनागढ येथे 'सुदर्शन' नावाचा तलाव बांधला होता. शेती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी या तलावाचा उपयोग होत असे. जलव्यवस्था सांभाळण्यासाठी विशेष अधिकारी नेमले जात असत. 'अर्थशास्त्र' या ग्रंथात जलाशयाचे नुकसान केल्यास त्या व्यक्तीला काय दंड दिला जाईल हे विस्ताराने दिलेले आहे. सुनियोजित करव्यवस्था आणि पाणवठ्यांची देखभाल यांमुळे मौर्य काळात कार्यक्षम जलव्यवस्थापन निर्माण झाले. पुढे अनेक राजांनी या तलावाची देखभाल आणि दुरुस्ती यावर लक्ष दिले. सुदर्शन तलावाची दुरुस्ती सम्राट अशोक, शक राजा रुद्रदामन आणि नंतरच्या काळातील राजांनीही केली. त्याचा उल्लेख जुनागढच्या शिलालेखात आढळतो.

सुदर्शन तलाव प्राचीन भारतीय जलव्यवस्थापन आणि अभियांत्रिकी कौशल्य यांचे प्रतीक मानले जाते.

***तुमचे मत काय आहे?***

प्राचीन काळातील जलव्यवस्थापनाच्या माहितीचा उपयोग आधुनिक काळातही होईल का?

चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीच्या शेवटी राजपदाचा त्याग करून जैन धर्म स्वीकारला. तो कर्नाटकामधील श्रवणबेळगोळ येथे राहिला. चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार सत्तेवर आला. बिंदुसाराने साम्राज्याचा विस्तार करणे सुरू ठेवले. त्याने इंडो-ग्रीक सत्रपांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले. त्याच्या कारकिर्दीत मौर्य साम्राज्याचा राजकीय आणि आर्थिक पाया अधिक मजबूत झाला. बिंदुसाराच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र अशोक सत्तेवर आला.


मौर्यकालीन भारत
उ.
अशोकाचे शिलालेख
अशोकाचे स्तंभलेख
अशोकाचे साम्राज्य
भारताची वर्तमान आंतरराष्ट्रीय सीमा
आधुनिक शहर
हिंदुकुश पर्वत
शहाबाज गढी
मनसेरा
काबूल नदी
तक्षशिला
सिंधू नदी
तोप्रा
कालसी
मीरत
दिल्ली
(इंद्रप्रस्थ)
यमुना नदी
बैराट
मथुरा
चंबळ नदी
गंगा नदी
श्रावस्ती
निगलीवा
कपिलवस्तु
रुम्मिनदेई
नेपाळ
ललित पाटण
रामपूर्वा
लौरिया नंदनगढ
लौरिया अरराज
पाटलिपुत्र
प्रयाग
काशी
सहस्राम
मगध
चंपा
कच्छ
उज्जयिनी
रुपनाथ
सांची
सौराष्ट्र
नर्मदा नदी
गिरनार
ताम्रलिप्ती
तापी नदी
महानदी
तोशाली
जौगड
सोपारा
गोदावरी नदी
कलिंग
सन्नती
आंध्र
कृष्णा नदी
मस्की
कूपगल
सिद्धापूर
सुवर्णगिरी
ब्रह्मगिरी
नेल्लोर
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
कावेरी नदी
चोळ
लक्षद्वीप
(भारत)
पांड्य
अंदमान आणि निकोबार बेटे
(भारत)
0
500
किलोमीटर
श्रीलंका
हिंदी महासागर

## ७.२ सम्राट अशोक



सम्राट अशोक

बिंदुसाराने त्याच्या कारकिर्दीत उज्जयिनी व तक्षशिला येथे अशोकाची राज्यपाल म्हणून नेमणूक केली होती. पराक्रम व साहस या गुणांमुळे तो सत्तेवर आला. वायव्येस अफगाणिस्तानात आणि उत्तरेस नेपाळपासून दक्षिणेस कर्नाटक आणि आंध्रप्रदेशापर्यंत तसेच पूर्वेस बंगालपासून पश्चिमेस सौराष्ट्रपर्यंत सम्राट अशोकाचे साम्राज्य पसरले होते.

### सम्राट अशोकाचे कलिंग युद्ध

सम्राट अशोकाच्या चरित्रातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे त्याचे कलिंग युद्ध. प्राचीन कलिंग राज्याचा समावेश आजच्या ओडिशा राज्यात होता. कलिंग मौर्य साम्राज्याचा भाग नव्हते. त्यामुळे अशोकाने कलिंगावर स्वारी केली. त्यात तो विजयी झाला. या युद्धात लाखो सैनिक मारले गेले, अनेक जण कैद झाले. झालेली प्रचंड जिवितहानी पाहून अशोकाला दु:ख झाले. या युद्धामुळे सम्राट अशोकाचे सर्व जीवनच बदलून गेले.

**विचार करा.**

कल्पना करा, तुम्ही एक पत्रकार आहात. कलिंग युद्धानंतर सम्राट अशोकाचे जीवन कसे बदलले, याविषयी तुम्ही त्याची मुलाखत घेताना कोणते प्रश्न विचाराल ?

### सम्राट अशोकाचे धर्मप्रसाराचे कार्य

अशोकाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्याने दैनंदिन जीवनात अहिंसेचे आचरण, मातापित्यांची सेवा, गुरुजन व वडीलधाऱ्यांचा आदर ठेवणे, यांसारख्या गोष्टींवर भर दिला.

सम्राट अशोकाने आपला संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ठिकठिकाणी शिलालेख आणि स्तंभलेख कोरवून घेतले. हे लेख ब्राह्मी लिपीत आहेत. या लेखांमध्ये त्याने स्वत:चा उल्लेख 'देवानं पियो पियदसी' अर्थात 'देवांना प्रिय असलेला प्रियदर्शी' असा केलेला आहे. हे शिलालेख अशोककालीन इतिहासाची मोलाची साधने आहेत. या शिलालेखांतून त्याने अहिंसा, भूतदया, परोपकार, धर्मसहिष्णुता, उत्तम चारित्र्य इत्यादी सद्‌गुणांचे आचरण प्रजेने करावे, असे आवाहन केलेले आढळते. त्यासाठी त्याने संपूर्ण साम्राज्यात **धम्म अधिकारी** नेमले. त्यांना **'धम्ममहामात्त'** म्हटले जात असे. हे अधिकारी लोकांमध्ये नैतिकतेचा संदेश पोचवत असत. या तत्त्वांच्या प्रसारार्थ अशोकाने दूरवरच्या प्रदेशात धर्मप्रसारक पाठवले. आपला पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना त्याने श्रीलंका येथे धर्मप्रसारासाठी पाठवल्याचा उल्लेख मिळतो. याशिवाय पश्चिमेकडे सीरिया, इजिप्त, ग्रीस तर पूर्वेकडे म्यानमार इत्यादी अनेक देशांत अशोकाने धर्मप्रसारक पाठवले होते. अशोकाने पाटलीपुत्र येथे बौद्ध धर्मपरिषद भरवली होती.

### सम्राट अशोकाचे लोककल्याणकारी कार्य

अशोकाने आपल्या प्रजेसाठी अनेक लोककल्याणकारी कामे केली. त्याने रुग्णालये, औषधालये आणि धर्मशाळा बांधल्या. नगरांमध्ये आणि प्रवासी मार्गांवर दुतर्फा झाडे लावली. विहिरींची आणि पाणपोईंची सोय केली. त्याने प्राण्यांसाठीही दवाखाने बांधले. अशोकाच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची त्याची जबाबदारी, प्रेम आणि सेवाभाव स्पष्ट दिसून येतो.



**विचार करा.**

लोककल्याणकारी प्रशासकाकडे कोणते गुण असावेत आणि त्याने कोणत्या कामांना प्राधान्य द्यावे याविषयी वर्गात चर्चा करा.

## ७.३ मौर्य साम्राज्यातील राज्यव्यवस्था

मौर्यकालीन राज्यव्यवस्थेत राजाच्या हातामध्ये सर्वोच्च अधिकार होते. राजाला मदत करण्यासाठी मंत्रीपरिषद होती. त्यात विविध विभागांचे प्रमुख असत. त्यांना 'अध्यक्ष' असे म्हटले जाई. यांपैकी काही प्रमुख उदाहरणे म्हणजे, 'पण्याध्यक्ष' (व्यापाराचा प्रमुख अधिकारी) आणि 'सीताध्यक्ष' (शेतीचा प्रमुख अधिकारी).

मौर्यकाळात हेर खाते अतिशय सामर्थ्यवान होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात या गुप्तहेर व्यवस्थेचे सविस्तर वर्णन आहे. अर्थव्यवस्थेचे आणि करव्यवस्थेचे स्वरूपसुद्‌धा निश्चित केलेले होते. जनकल्याण, संरक्षण आणि धर्मकार्य यांसाठी राजकोशातून खर्च केला जाई.

राजकारभाराच्या सोयीसाठी राज्याची चार प्रांतांत विभागणी केली–

| विभाग | राजधानी |
|---|---|
| पूर्व | तोशाली |
| पश्चिम | उज्जयिनी |
| उत्तर | तक्षशिला |
| दक्षिण | सुवर्णगिरी |

**प्रशासन तीन प्रमुख पातळ्यांवर विभागलेले होते–**


**केंद्र शासन –** राजधानी पाटलीपुत्र येथून साम्राज्याचे सर्व निर्णय घेतले जात. राजा, मंत्रीपरिषद आणि विभागीय अधिकारी यांच्या साहाय्याने संपूर्ण साम्राज्याचे प्रशासन प्रभावीपणे केले जात असे.

**प्रांतीय प्रशासन–** साम्राज्य वेगवेगळ्या प्रांतांमध्ये विभागलेले होते. प्रत्येक प्रांतावर कुमार (राजपुत्र) आणि महामात्य (प्रशासकीय अधिकारी) यांच्या मदतीने नियंत्रण ठेवले जात असे.

**स्थानिक प्रशासन –** गावांच्या व नगरांच्या पातळीवर ग्रामणी (गावाचा प्रमुख), नगर आणि स्थानिक समित्यांच्याद्‌वारे दैनंदिन कारभार, कर, न्याय व सुव्यव्यस्था यांचे व्यवस्थापन केले जात असे.

**माहीत आहे का तुम्हांला?**






**तुम्ही भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र आणि राजमुद्रा पाहिली आहे का? या प्रतिकांसंबंधी तुम्हांला काय माहिती आहे? त्याविषयी अधिक माहिती मिळवा आणि त्यावर चर्चा करा.**

## ६.४ कला, स्थापत्य व लोकजीवन

मौर्यकाळात शिल्पकला विकसित झाली. सम्राट अशोकाने उभारलेले स्तंभ आणि स्तूप ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. मौर्यकाळातील शिल्पात सिंह, हत्ती, बैल या प्राण्यांचे हुबेहूब चित्रण केलेले दिसते.



अशोक स्तंभ

अनेक परकीय प्रवाशांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनात राजधानी पाटलीपुत्र येथील भव्य राजवाड्याची वर्णने आढळतात. या काळात खोदली गेलेली बिहार राज्यातील बाराबर लेणी सर्वांत प्राचीन आहेत. सांची येथील स्तूप, सारनाथ स्तूप हे त्या काळातील स्थापत्याचे उत्तम नमुने आहेत.



बाराबर गुहा

मौर्यकाळात दगडांना विशेष तंत्राने इतके गुळगुळीत आणि चमकदार घासले जात असे की त्यात आरशासारखे प्रतिबिंब दिसे. रथांच्या व घोड्यांच्या शर्यती, मल्लयुद्ध, नृत्यसंगीत स्पर्धा हे करमणुकीचे लोकप्रिय प्रकार होते. सोंगट्यांचा खेळ आणि बुद्धिबळ यांसारखे खेळ आवडीने खेळले जात.

**करून पहा.**

मौर्यकालीन स्तंभ, शिलालेख, शिल्प यांची चित्रे गोळा करा आणि वहीत चिकटवा.

मौर्यकाळात लोकजीवन संपन्न व सुखी होते. शेतीच्या उत्पादनाला महत्त्व होते. दूध, दही, तूप, निरनिराळी फळे, तांदूळ, बार्ली इत्यादींचा आहारात समावेश होता.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

मौर्यकाळातील लोकजीवनाविषयी मेगॅस्थिनीसच्या 'इंडिका' या ग्रंथातून बरीच माहिती मिळते. मेगॅस्थिनीस सांगतो, की 'इथले लोक कष्टाळू आणि काटकसरी आहेत. ते अनेक कलांमध्ये कुशल आहेत. शेतकरी वर्षातून दोन पिके काढतात. लढाई चालू असली, तरी शेतकऱ्यांना कोणी त्रास देत नाही. शत्रूदेखील पिकांची नासाडी करत नाही. लोक सुखी आणि प्रामाणिक आहेत. चोरी क्वचितच होते. लोकांवर न्याय मागण्याची वेळ क्वचितच येते. गुलामगिरीची पद्धत अस्तित्वात नव्हती.

सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मात्र मौर्य साम्राज्याचे सामर्थ्य हळूहळू कमी होत गेले. स्थानिक शासक स्वतंत्र होऊ लागले आणि साम्राज्य विभागले गेले. मौर्य साम्राज्याचा शेवटचा राजा बृहद्रथ याचा शेवट करून पुष्यमित्र शुंगाने शुंग घराण्याची स्थापना केली.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) योग्य पर्यायासमोर ☑ अशी खूण करा.**

१. 'मुद्राराक्षस' या नाटकाच्या कथानकाचा विषय–

अ) गुप्तहेर व्यवस्थेचे वर्णन. ☐

ब) नंद घराण्याचा शेवट आणि चंद्रगुप्तांचे कार्य. ☐

क) मौर्य काळातील लोकजीवन. ☐

२. आर्य चाणक्यांनी लिहिलेल्या अर्थशास्त्र ग्रंथात खालील बाबी होत्या.–

अ) सदाचरणावर भर ☐

ब) कलिंग युद्धाचे वर्णन. ☐

क) शासनव्यवस्था, करपद्धती, संरक्षण, गुप्तहेर व राजकारण. ☐

३. मेगॅस्थिनीसच्या 'इंडिका' या ग्रंथातून खालील गोष्टींचे वर्णन मिळते.–

अ) जलाशयाचे नुकसान केल्यास त्या व्यक्तीला कोणता दंड द्यावा याचे मार्गदर्शन. ☐

ब) अहिंसा, भूतदया, परोपकार, धर्मसहिष्णुता, उत्तम चारित्र्य इत्यादी सद्गुणांचे आचरण प्रजेने करावे. ☐

क) येथील लोक कष्टाळू आणि काटकसरी आहेत. ते अनेक कलांमध्ये कुशल आहेत. ☐


**ब) नावे लिहा.**

१. नंद वंशाचा शेवटचा राजा ....................

२. 'देवानं पियो पियदसी' ....................

३. मेगॅस्थिनिस याने लिहिलेला ग्रंथ ..............

**प्र.२ अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**



**ब) पुढील घटना कालक्रमानुसार लिहा.**

१. सम्राट अशोकाने बौद्‌ध धर्म स्वीकारला.

२. कलिंग युद्‌धात सम्राट अशोकाचा विजय झाला.

३. उज्जयिनी व तक्षशिला येथे अशोकाला शासक म्हणून नेमले गेले.

४. पुत्र महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना धर्मप्रसारासाठी श्रीलंकेत पाठवले.

**प्र.३ अ) थोडक्यात माहिती लिहा.**

१. सम्राट अशोकाचे धर्मप्रसाराचे कार्य.

२. मौर्यकालीन शिल्पकला.

**ब) पुढील घटना का घडल्या ? कारणे लिहा.**

१. सम्राट अशोकाने हिंसेचा मार्ग सोडून बौद्‌ध धर्म स्वीकारला.

२. चंद्रगुप्त मौर्य याने धनानंदाचा पराभव केला.

**प्र.४ खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. सम्राट अशोकाने त्याच्या शिलालेखांतून जनतेसाठी कोणत्या सूचना केल्या ?

२. सुदर्शन तलाव हा प्राचीन भारतीय जलव्यवस्थापन व अभियांत्रिकी कौशल्याचे प्रतीक का मानले जाते ?

३. बौद्‌ध धर्म स्वीकारल्यानंतर सम्राट अशोकाने स्वतःमध्ये कोणता बदल घडवून आणला ?

**उपक्रम**

१. 'मी आर्य चाणक्य बोलतोय......' या एकपात्री प्रयोगातून मौर्य साम्राज्याची माहिती परिपाठात सादर करा.

२. तुमच्या परिसरातील जलव्यवस्थापन, रेन-वॉटर-हार्वेस्टींग, 'हर घर जल' याची माहिती मिळवून त्यावर चर्चासत्र घडवून आणा.

***

# ८ प्राचीन भारतातील व महाराष्ट्रातील राज्ये व राजघराणी



| | |
|---|---|
| ८.१. शुंग घराणे | ८.५. सातवाहन घराणे |
| ८.२. काण्व घराणे | ८.६. कुशाण राज्यकर्ते |
| ८.३. इंडो – ग्रीक (यवन) राज्यकर्ते | ८.७. गुप्त घराणे |
| ८.४. शक राज्यकर्ते | ८.८. वर्धन घराणे |

**'भारताचा नकाशा जर बोलू लागला तर?'**

कल्पना करा भारताचा नकाशा तुमच्याशी बोलतो आहे!

नकाशा म्हणतो :

"प्राचीन काळात माझ्या अंतर्गत सीमांनी अनेक साम्राज्यांचे चढउतार पाहिले आहेत. काही राज्यकर्ते आले साता समुद्रापलीकडून; तर काही स्थानिक होते."

सम्राट अशोकानंतर मौर्य साम्राज्याचा ऱ्हास सुरू झाला आणि शेवटी ते लुप्त होऊन अनेक लहान – मोठ्या राजसत्ता उदयास आल्या. मौर्यांनंतर शुंग घराण्याने आपली सत्ता स्थापन केली. याच सुमारास भारतावर ग्रीक (यवन), शक, कुशाण या परकीयांची आक्रमणे झाली. त्यांच्या सत्ता येथे स्थापन झाल्या. दक्षिणेत सातवाहन घराणे याच काळात उदयास आले. पुढे दक्षिणेत वाकाटक आणि उत्तरेत गुप्त घराण्याचे राज्य स्थापन झाले. गुप्त राज्याच्या अस्तानंतर वर्धन घराणे विशेष प्रभावी ठरले."

**नकाशा तुम्हांला विचारतो :**

- **नकाशाचे निरीक्षण केल्यानंतर तुम्हांला कोणकोणत्या बाबी समजतात?**
- **इतिहास समजून घेताना तुम्हांला माझी मदत कशी होते?**
- **गुप्त साम्राज्य हे एक महत्त्वाचे साम्राज्य होते. महाराष्ट्र या साम्राज्याचा भाग होता का हे सांगा?"**

विद्यार्थ्यांनो, नकाशा सोबत घेऊन प्रवास करताना तुम्हांला इतिहासाचा मागोवा घ्यायला आवडेल का? चला तर मग...

## ८.१. शुंग घराणे

सम्राट अशोकानंतर मौर्य साम्राज्यात राजकीय अस्थिरता वाढू लागली. अशा अस्थिर परिस्थितीत मौर्य सैन्याचा सेनापती पुष्यमित्र शुंग याने सत्ता हाती घेतली. पुष्यमित्र हा वैदिक धर्माचा समर्थक होता. त्याने अश्वमेध यज्ञ केला. त्याच्या राज्याचा विस्तार पंजाबात जालंधर आणि सियालकोट (शाकल) पर्यंत होता असे दिसते.

## ८.२. काण्व घराणे

देवभूती हा शुंग घराण्याचा शेवटचा राजा होता. त्याच्यानंतर काण्व घराण्याची सत्ता तेथे स्थापन झाली. काण्व घराण्याचा संस्थापक वसुदेव कण्व हा होता. त्यांनी कला, संस्कृती आणि शिक्षण यांना प्रोत्साहन दिले.

## ८.३. इंडो – ग्रीक (यवन) राज्यकर्ते

सिकंदराच्या स्वारीनंतर त्याच्या सैन्यातील अनेक अधिकारी आणि प्रशासक भारताच्या वायव्य भागात स्थायिक झाले. पुढे त्यांनी स्वतंत्र राज्ये निर्माण केली. त्यांना 'इंडो ग्रीक' (यवन) म्हणून ओळखले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

प्राचीन भारतात 'यवन' हा शब्द ग्रीक लोकांसाठी वापरला जात असे. या शब्दाची व्युत्पत्ती 'आयोनियन' या मूळ ग्रीक शब्दापासून झाली. या इंडो-ग्रीकांना भारतीय साहित्य आणि शिलालेख यांमध्ये 'यवन' असे संबोधले गेले. पुढे परदेशातून येणाऱ्या सगळ्यांनाच 'यवन' म्हटले जाऊ लागले.

अफगाणिस्तान, पंजाब आणि गांधार या प्रदेशांत इंडो-ग्रीकांचा प्रभाव लक्षणीय होता. इंडो-ग्रीक राजांमध्ये मिनॅन्डर म्हणजेच मिलिंद हा प्रसिद्ध राजा होऊन गेला. 'मिलिंदपन्ह' या प्रसिद्ध ग्रंथात, मिलिंद आणि बौद्ध भिक्खू नागसेन यांच्यात झालेला प्रश्नोत्तररूपी संवाद पाहायला मिळतो. त्यात बौद्ध धर्माचे तत्वज्ञान उलगडून सांगितलेले आहे.

इंडो-ग्रीक राजांच्या नाण्यांवर दर्शनी बाजूवर ग्रीक आणि मागील बाजूवर खरोष्ठी या लिपींमधील लेख आढळतात. नाण्यांवर एका बाजूला राजाचा चेहरा, त्याचे वैशिष्ट्यपूर्ण शिरस्त्राण आणि मागील बाजूवर एखाद्या देवतेची प्रतिमा कोरलेली असायची. या काळात सागरी व खुष्कीच्या मार्गाने पश्चिम आशियाशी होणारा व्यापार वाढला.



इंडो-ग्रीक नाणे: दर्शनी बाजू आणि मागील बाजू

**माहीत आहे का तुम्हांला ?**

गांधार शिल्प शैली ही भारतातील कलाशैलींमध्ये उत्तम मानली जाते. या शैलीवर ग्रीक शैलीचा प्रभाव दिसून येतो. या कलाशैलीचा विकास प्रामुख्याने कुशाणांच्या काळात झाला. आधुनिक पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि



वायव्येकडील भारत हे प्रदेश या कलाशैलीचे मुख्य केंद्र होते. गांधार शैलीतील मानवी आकृती अगदी वास्तववादी असतात. गांधार शैलीत गौतम बुद्धांच्या अनेक प्रतिमा साकारलेल्या दिसतात.

## ८.४. शक राज्यकर्ते

मौर्योत्तर काळात भारताच्या वायव्येकडून अनेक परकीय टोळ्यांनी भारतात प्रवेश केला. त्यांपैकीच एक म्हणजे शक. त्यांना 'स्किथियन' असेही म्हटले जाते. त्यांचे मूळ स्थान शकस्तान किंवा शिस्तान (स्किथिया) या नावाने ओळखले जाते. शकस्तान (स्किथिया) सध्याचा इराण, अफगाणिस्तान या प्रदेशाच्या काही भागांत पसरलेले होते. ते पश्चिम भारतातील गुजरात, महाराष्ट्र आणि माळवा या प्रदेशांत स्थिरावले. पहिला रुद्रदामन हा भारतातील शक राज्यकर्त्यांपैकी सर्वांत

प्रसिद्ध आणि सामर्थ्यवान शासक होता. त्याच्या काळात व्यापार वाढला.



जुनागढ येथील शिलालेख

रुद्रदामनाचा जुनागढ येथील शिलालेख प्रसिद्ध आहे. या शिलालेखाविषयी तुम्ही मागील पाठात जाणून घेतले आहे. या शिलालेखात त्याच्या शासनव्यवस्थेची, प्रजेच्या कल्याणासाठी केलेल्या कामांची आणि युद्धातील पराक्रमाची सविस्तर माहिती मिळते.

शकांच्या काळामध्ये समुद्री व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला होता. शकांनी बंदरांचा विकास केला, व्यापाऱ्यांना संरक्षण दिले. शकांची नाणी प्रामुख्याने चांदीची असत. त्यावर ब्राह्मी लिपीतील लेख आढळतात. भारतीय नाणकशास्त्राचा अभ्यास करताना शकांची नाणी महत्त्वाची मानली जातात. या नाण्यांवर शकसंवत्सराचा उल्लेख आढळतो. ही नाणी प्राचीन भारताच्या इतिहासाचे महत्त्वाचे साधन आहे.



### माहीत आहे का तुम्हांला ?

'शक संवत्' ही भारतीय कालगणनेतील एक महत्त्वाची पद्धती आहे. आजही ती आपल्या पंचांगात वापरली जाते. 'संवत्सर' याचा अर्थ, वर्ष. प्रत्येक संवत्सराला विशेष नाव असते. शक संवताची सुरुवात इसवी सन ७८मध्ये झाली.

आजचे चालू वर्ष शक कालगणनेमध्ये कितवे हे जाणून घ्यायचे असेल, तर पुढीलप्रमाणे गणित करा –

इसवी सनाचे चालू वर्ष वजा ७८ केले, तर चालू शक वर्ष कोणते हे कळू शकते.

उदाहरणार्थ– इसवी सन वर्ष २०२६ – ७८ = सध्याचे शक वर्ष १९४८

आपल्या पाठ्यपुस्तकाच्या सुरुवातीला देखील तुम्हांला अशी तिथी दिसेल, बघा बरं!



### करून पहा.

वरील उदाहरणाच्या आधारे, तुमच्या कुटुंबातील सदस्यांच्या किंवा तुमच्या मित्रमैत्रिणींच्या जन्मवर्षाचे शक संवत्सर शोधा.

## ८.५. सातवाहन घराणे

सातवाहन घराणे हे महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिले सामर्थ्यशाली साम्राज्य म्हणून ओळखले जाते. मौर्योत्तर काळात देशात अनेक ठिकाणी राजकीय अस्थिरता निर्माण झाली होती, व्यापार मंदावला होता. परकीय आक्रमणे वाढली होती. अशा परिस्थितीत **सिमुक या राजाने सातवाहन घराण्याची स्थापना केली.** सातवाहनांनी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश या भागांवर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. सातवाहनांमध्ये **सामर्थ्यवान राजा** म्हणजे **गौतमीपुत्र सातकर्णी**. त्याने शक आणि यवन यांसारख्या परकीय सत्तांना पराभूत करून मध्यप्रदेश ते महाराष्ट्र असे स्थिर आणि संघटित साम्राज्य उभे केले. त्याच्या पराक्रमाचे वर्णन त्याची माता गौतमी बलश्री हिच्या नाशिक येथील त्रिरश्मी लेण्यातील शिलालेखात पहायला मिळते. त्यामध्ये त्याला 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' असे संबोधले आहे. याचा अर्थ ज्याचे घोडे तीन समुद्रांचे पाणी प्यायले आहेत. तीन समुद्र म्हणजे अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि हिंदी महासागर.


सातवाहनांच्या काळात व्यापाराचा विस्तार झाला. त्यांच्या राज्यातून रेशीम मार्ग आणि सागरी व्यापारमार्ग जात होता. यामुळे भारतीय व्यापाऱ्यांचा रोम, ग्रीस अशा दूरवरच्या देशांशी व्यापार सुरू झाला.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

इसवी सनपूर्व पहिल्या शतकाच्या कालखंडातील सातवाहन राजा पुळुमावी याच्या नाण्यावरील जहाजाचे हे चित्र आहे. हे चित्र सातवाहनांच्या काळातील समुद्री मार्गाने चालणाऱ्या व्यापाराचे निदर्शक आहे.



सातवाहनांच्या नाण्यांवर ब्राह्मी लिपीतील प्राकृत लेख आढळतात. सांस्कृतिक दृष्टीने सातवाहन काळ अत्यंत भरभराटीचा मानला जातो. या काळात बौद्ध धर्माचे महत्त्व वाढले आणि अनेक बौद्ध लेणी खोदली गेली. सातवाहन काळातील नाशिक, कार्ले, कान्हेरी, भाजे आणि पितळखोरा ही प्रसिद्ध लेणी आहेत.




## ८.६. कुशाण राज्यकर्ते

कुशाण टोळ्या मूळच्या मध्य आशियातील होत्या. त्यांनी अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि पुढे उत्तर भारतात प्रवेश केला व भारतीय उपखंडात आपली सत्ता प्रस्थापित केली. **कुशाण घराण्यातील प्रभावशाली राजा म्हणजे सम्राट कनिष्क.** कनिष्काच्या काळात कुशाण साम्राज्य मथुरेपासून पंजाब, अफगाणिस्तान व काश्मीरपर्यंत पसरले होते.

कनिष्काने आपली राजधानी पुरुषपूर (आजचे पेशावर) येथे स्थापन केली. त्याने बौद्ध धर्माच्या प्रसाराला चालना दिली. त्याच्या काळात बौद्ध परिषद भरवण्यात आली.

कुशाण राजवटीत व्यापार आणि अर्थव्यवस्था प्रचंड वाढली. भारत, चीन, रोम आणि मध्य आशियाला जोडणारा प्रसिद्ध रेशीम मार्ग त्यांच्या नियंत्रणाखाली होता. या मार्गाने मसाले, कापड, धातू, रेशीम इत्यादींचा मोठ्या प्रमाणावर व्यापार होत असे. कुशाणांनी सोन्याची व चांदीची उत्कृष्ट नाणी पाडली. या नाण्यांवर विविध देवदेवतांच्या प्रतिमा आढळतात. उदाहरणार्थ, हेरॅक्लिस (ग्रीक देवता), अर्दोक्शो (इराणी देवता), शिव (भारतीय देवता). यावरून कुशाणांवरील विविध सांस्कृतिक प्रवाहांचा प्रभाव दिसून येतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

कनिष्काच्या कारकिर्दीत चौथी बौद्ध परिषद कुंडलवन (काश्मीर) येथे भरवण्यात आली. या परिषदेत बौद्ध धर्माच्या शिकवणींची नव्याने मांडणी करण्यात आली. या परिषेदत 'हीनयान' आणि 'महायान' हे दोन संप्रदाय प्रस्थापित झाले. महायान संप्रदायाने मूर्तीपूजेचा स्वीकार केला. या कालखंडात मथुरा आणि गांधार या कलाशैलींमध्ये गौतम बुद्धांच्या प्रतिमा निर्माण केल्या गेल्या.

**विचार करा.**

नाणकशास्त्राचे अभ्यासक नाण्यांचा बारकाईने अभ्यास करतात आणि त्या आधारे त्या त्या काळाच्या इतिहासाची मांडणी करण्यास मदत होते. तुम्ही हा प्रयत्न करून पाहा बरं. चित्रात दिलेल्या कनिष्काच्या

नाण्याचे बारकाईने निरीक्षण करा. नाण्याच्या दोन्ही बाजूं पाहून तुमच्या काय लक्षात येते याची वहीत नोंद करा.





समुद्रगुप्ताचे नाणे

## ८.७. गुप्त घराणे

गुप्त साम्राज्याचा काळ हा प्राचीन भारताचा 'सुवर्णयुग' मानला जातो. **श्रीगुप्त हा गुप्त घराण्याचा संस्थापक होता.** गुप्त साम्राज्याच्या विस्ताराची सुरुवात पहिला चंद्रगुप्त याच्या काळात झाली. त्याच्यानंतर सत्तेवर आलेल्या समुद्रगुप्ताच्या पराक्रमाचे वर्णन त्याच्या दरबारातील कवी हरिषेण याने लिहिलेल्या प्रशस्तीमध्ये नोंदले गेले आहे. ही प्रशस्ती प्रयागराज येथील अशोक स्तंभावरील सम्राट अशोकाच्या लेखाखाली कोरलेली आहे. भारतात काश्मीरपासून नर्मदेपर्यंत दक्षिणेत कांचीपर्यंत समुद्रगुप्ताने आपली सत्ता प्रस्थापित केली. पुढे राजा दुसरा चंद्रगुप्त उर्फ विक्रमादित्य याच्या काळात गुप्त साम्राज्य भरभराटीला आले. त्याने मिळवलेला शकांवरचा विजय ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वांत महत्त्वाची घटना मानली जाते. त्याच्या काळात फाहियान नावाचा एक चिनी प्रवासी भारतात येऊन गेला. त्याने गुप्त साम्राज्यातील शांतता व सुबत्ता यांची स्तुती केलेली दिसून येते. या काळात कालिदास, धन्वंतरी, वराहमिहीर यांसारखे महान विद्वान होऊन गेले.

गुप्त राजांच्या काळात कला, साहित्य, गणित, खगोलशास्त्र, धातूकाम, शिक्षण आणि धर्म यांचा विकास झाला. **स्कंदगुप्त हा गुप्त घराण्याचा शेवटचा बलशाली राजा होता.**

### तुमचे मत काय आहे ?

गुप्तकाळाला 'सुवर्णयुग' का म्हणतात ?

## ८.८. वर्धन घराणे

गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारतात पुन्हा राजकीय अस्थिरता निर्माण झाली होती. विविध प्रादेशिक राजे सत्ता मिळवण्यासाठी एकमेकांशी संघर्ष करत होते. अशा अस्थिर परिस्थितीत वर्धन घराण्याचा उदय झाला. दिल्लीजवळ असणाऱ्या थानेसर या ठिकाणी प्रभाकरवर्धन नावाचा राजा राज्य करत होता. त्याच्या काळात वर्धन घराणे प्रभावी बनले. या घराण्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले ते त्याचा मुलगा सम्राट हर्षवर्धनमुळे. त्याने संपूर्ण उत्तर भारताला एकत्रित करून एक बलाढ्य साम्राज्य निर्माण केले. हर्षवर्धनाने कनौज येथे त्याची राजधानी प्रस्थापित केली. त्याचे साम्राज्य पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार आणि बंगालपर्यंत पसरले होते.

हर्षवर्धन हा धर्मशील, दयाळू, लोकाभिमुख आणि दानशूर राजा म्हणून ओळखला जातो. त्याने धार्मिक उत्सवांना प्रोत्साहन दिले.


इ. स. चौथ्या ते सहाव्या शतकातील भारत
भारताची वर्तमान आंतरराष्ट्रीय सीमा
० ५०० किलोमीटर
उ.
गुप्तांचे साम्राज्य
आधुनिक शहर
हिंदुकुश पर्वत
पुरुषपूर
काश्मीर
तिबेट
नेपाळ
कामरूप
सिंधू नदी
दिल्ली
(इंद्रप्रस्थ)
यमुना नदी
गंगा नदी
कनौज
वैशाली
पाटलिपुत्र
चंपा
प्रयाग
काशी
बोधगया
चंबळ नदी
माळवा
बुंदेलखंड
सांची
उज्जयिनी
कच्छ
सौराष्ट्र
वलभी
भडोच
नर्मदा नदी
ताम्रलिप्ती
तापी नदी
सोपारा
वाकाटक
महानदी
गोदावरी नदी
कृष्णा नदी
तुंगभद्रा नदी
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
पल्लव
कांची
कावेरी नदी
चोळ
पांड्य
लक्षद्वीप
(भारत)
अंदमान आणि निकोबार बेटे
(भारत)
श्रीलंका
हिंदी महासागर



### माहीत आहे का तुम्हांला ?

एकदा हर्षवर्धनाने पाहिले की त्याची राजधानी कनौजमधील एका गरीब कुटुंबाची अन्न-पाण्याविना दुर्दशा झालेली आहे. हे लक्षात आल्यावर राजाने स्वतः राजवाड्याच्या बाहेर येऊन त्या कुटुंबाला दान केले. त्याला असे वाटले की केवळ अन्न देणे पुरेसे नाही, तर लोकांना शिक्षणाची आणि आरोग्याची सुविधादेखील द्यायला हवी. त्याने आज्ञा केली, की प्रत्येक गावात विद्यालये स्थापन केली जावीत, रुग्णालये उभारण्यात यावीत आणि भिक्खुंना अन्न व निवारा उपलब्ध करून दिला जावा. हर्षवर्धनाच्या दयाळू वृत्तीमुळे राज्यातील सर्व प्रजेला त्याच्याविषयी आदर आणि प्रेम वाटत असे.

एकदा हर्षवर्धनाने त्याच्या दरबारात सभा घेतली आणि सांगितले, की 'राज्याची खरी समृद्धी लोकांच्या आनंदात आणि कल्याणात आहे. जो दान करतो तोच खरा बलवान राजा असतो.' चिनी प्रवासी युआन श्वांग याने त्याच्या प्रवासवर्णनात देखील हर्षवर्धनाच्या दानशूरतेविषयी लिहिले आहे. तो म्हणतो, की सम्राट हर्षवर्धन दर पाच वर्षांनी प्रयागराज येथे दानाचा भव्य उत्सव आयोजित करायचा. या उत्सवात प्रत्येक वेळी तो त्याच्याकडील सर्व मालमत्ता आणि संपत्ती दान करायचा.

हर्षवर्धनाचा हा दानधर्म इतका प्रसिद्ध झाला, की आजही त्याला 'दानशूर' सम्राट म्हणून ओळखले जाते.

दक्षिण भारतात असलेल्या चालुक्य साम्राज्याबरोबर हर्षवर्धनाचा संघर्ष झाला. चालुक्यांचा राजा पुलकेशी दुसरा याने त्याचा दक्षिण भारतातील प्रवेश रोखला. त्यामुळे हर्षवर्धनाचे साम्राज्य गंगेच्या खोऱ्यापुरतेच मर्यादित राहिले. त्याच्या मृत्यूनंतर वर्धन साम्राज्याचा ऱ्हास झाला.



### करून पहा.

एक नकाशावही तयार करा. प्रत्येक घराणे दर्शविण्यासाठी स्टेन्सिलच्या आधारे भारताचे स्वतंत्र नकाशे काढा. प्रत्येक घराण्याच्या प्रदेशाला स्वतंत्र रंग द्या, आणि त्यांची राजधानी, उल्लेखनीय स्थळे, व्यापारमार्ग यांसाठी काही चिन्हांचा वापर करा.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) एका शब्दात उत्तर लिहा.**

१. मौर्य सैन्याचा सेनापती.

२. काण्व घराण्याचा संस्थापक.

३. बौद्ध भिक्खू नागसेन आणि मिनॅन्डर यांच्यातील संवादावरील ग्रंथ.

४. भारतीय कालगणनेतील एक महत्त्वाची पद्धती.

**ब) कोण ते लिहा.**

१. 'त्रिसमुद्रतोयपीतवाहन' असे त्याला संबोधले आहे.


२. बौद्ध धर्माची चौथी परिषद याच्या कारकिर्दीत झाली.

३. हा गुप्त घराण्याचा संस्थापक मानला जातो.

४. हा दर पाच वर्षांनी आपल्याजवळील सर्व संपत्ती दान करत असे.

५. हर्षवर्धनाचा पराभव करून वर्धन साम्राज्याचा दक्षिणेकडील विस्तार ह्याने रोखला.

**प्र.२ अ) संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**ब) घटना योग्य कालक्रमानुसार लिहा.**

१. सम्राट अशोकानंतर मौर्य साम्राज्यात अस्थिरता वाढू लागली.

२. वसुदेव कण्व हा काण्व घराण्याचा संस्थापक होता.

३. मौर्य सैन्याचा सेनापती पुष्यमित्र शुंग याने सत्ता हाती घेतली.

४. देवभूती हा शुंग घराण्याचा शेवटचा राजा होता.

**प्र.३ अ) थोडक्यात माहिती लिहा.**

१. इंडो-ग्रीक राजांची नाणी.

२. कुशाण शासकांवरील विविध सांस्कृतिक प्रवाहांचे प्रभाव.

**ब) सकारण लिहा.**

१. प्राचीन कालखंडात भारताला भेट देण्यासाठी आलेल्या परकीय प्रवाशांनी लिहिलेली प्रवासवर्णने इतिहासाचे साधन म्हणून महत्त्वाची असतात.

२. गुप्तकाळ प्राचीन भारताचा 'सुवर्णकाळ' मानला जातो.

**कृती**

तुम्ही तुमच्या पालकांबरोबर सहलीला / पर्यटनाला गेल्यानंतर त्याविषयीच्या नोंदी करा.

उदाहरणार्थ,

- कोणत्या वाहनाने तेथे गेलात?
- तेथे काय पाहिले?
- तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये.
- त्या ठिकाणची कला, भाषा, आहार.

**उपक्रम**

- सातवाहनकालीन ऐतिहासिक स्थळे नकाशात दाखवा.
- चलन त्या देशाची वैशिष्ट्ये, ध्येयधोरणे प्रतिबिंबित करते. भारताच्या चलनी नोटांचे निरीक्षण करून त्यावरील वैशिष्ट्यपूर्ण बाबी लिहा.

***

# ९ प्राचीन भारताचा सांस्कृतिक वारसा




९.१. प्राचीन भारतातील सांस्कृतिक जीवन

९.२. प्राचीन भारतातील व्यापार, व्यवसाय आणि आर्थिक जीवन

९.३. प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र

९.४. महाराष्ट्राची संमिश्र संस्कृती

९.५. प्राचीन भारतातील शिक्षण पद्धती


विद्यार्थ्यांनो, कल्पना करा की आपल्याकडे परंपरेने चालत आलेला एक असा खजिना आहे, ज्यामध्ये सोने, माणके, नाणी या कशाचाही समावेश नाही पण तरीही तो मौल्यवान आहे! आज आपण या अनमोल खजिन्याचे रहस्य उलगडणार आहोत. हा खजिना म्हणजे 'भारताचा सांस्कृतिक वारसा!'

चला तर मग, या खजिन्याची पेटी हळूच उघडून पाहू या आणि आपल्या देशाने जपलेल्या कला, परंपरा, नृत्य, संगीत आणि प्राचीन वास्तू यांची अनोखी दुनिया शोधू या!



**विचार करा.**

- आपल्या देशात विविधता आहे आणि विविधतेतही एकता आहे असे का म्हटले जाते?
- भारतात वेगवेगळ्या भाषा, नृत्य, वेशभूषा, रूढी आणि परंपरा का आहेत?
- अजिंठ्याच्या लेण्यांमधील सुंदर चित्रांचे निरीक्षण करताना तुम्हांला काय वाटते?
- नालंदा विद्यापीठात हजारो विद्यार्थी शिकत होते हे तुम्हांला माहिती आहे का?
- महाराष्ट्राच्या भूमीत संमिश्र संस्कृती रुजली. त्याची कारणे काय असावीत असे तुम्हांला वाटते?


याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी तयार व्हा!

## ९.१. प्राचीन भारतातील सांस्कृतिक जीवन

प्राचीन भारतातील सांस्कृतिक जीवन अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण होते. संस्कृतीच्या विविध पैलूंद्वारे आपल्याला भारतातील धर्म, तत्त्वज्ञान, कला, साहित्य, सण-उत्सव, सामाजिक जीवन आणि दैनंदिन व्यवहार या सर्वांचे दर्शन घडते. विविध भौगोलिक प्रदेशातील परिस्थितीला अनुसरून भाषेचे, वेशभूषेचे, खाद्यसंस्कृतीचे आणि वास्तूकलेचे विविध पैलू निर्माण झाले. इतके वैविध्य असूनही 'वसुधैव कुटुंबकम्' यासारखी मूल्ये आपल्या संस्कृतीमध्ये इतकी रुजलेली आहेत की त्यामुळे भारतीय समाजात विविधतेतही एकता दिसून येते.

### ■ वाङ्मय आणि साहित्य

एका पिढीने दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेने दिलेले ज्ञान म्हणजे 'वाङ्मय' आणि लिखित स्वरूपात जे आपल्यापर्यंत पोचले आहे त्याला 'साहित्य' असे म्हणतात. वाङ्मयामध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत या महाकाव्यांचा समावेश होतो. तर साहित्यात पुराणे, बौद्ध ग्रंथ, जैन ग्रंथ, काव्य, नाटके, नीतिशास्त्र, तत्वज्ञान आणि इतर धार्मिक ग्रंथ या सर्वांचा समावेश होतो.




साहित्य हे ज्ञान, तत्वज्ञान, नैतिक मूल्ये, धार्मिक आणि सामाजिक मूल्ये शिकवण्याचे माध्यम होते. पाणिनी या व्याकरणकाराने 'अष्टाध्यायी' हा ग्रंथ लिहिला. त्यावर भाष्य करणारा 'महाभाष्य' हा ग्रंथ पतंजलीने लिहिला. महाभारत आणि रामायण यांचा सामाजिक आदर्श आणि नीतिमूल्ये रुजवण्यासाठी उपयोग केला गेला. काश्मीरचा इतिहास सांगणारा 'राजतरंगिणी' हा कल्हण कवीने रचलेला ग्रंथ, बाणभट्टाचे. 'हर्षचरित' हे इतिहासविषयक साहित्य प्राचीन काळात तयार झाले.

### माहीत आहे का तुम्हांला ?

'पंचतंत्र' हा प्राचीन भारतातील एक प्रसिद्ध कथासंग्रह आहे. याची रचना विष्णुशर्मा याने केली असे समजले जाते. पंचतंत्रातील कथांमधील पात्रे सिंह, वाघ, हंस, कासव, ससा हे प्राणी आहेत. त्या कथांचे तात्पर्य हे प्रामुख्याने माणसाचे नैतिक वर्तन कसे असावे, याबद्दल मार्गदर्शन करणारे आहे.

पंचतंत्रातील कथा कोणत्या निमित्ताने सांगितल्या गेल्या, याची ही एक कथा आहे –

'अमरशक्ती नावाचा एक राजा होता. त्याला तीन मुले होती. ते तिघेही अभ्यासात अजिबात रस घेत नसत. राजाला त्यांच्या भविष्याची काळजी वाटत होती. त्यामुळे राजाने विद्वान शिक्षक विष्णुशर्मा यांना बोलावले आणि विनंती केली की त्यांनी राजकुमारांना व्यवहारकुशलता शिकवावी. विष्णुशर्माने ते आव्हान स्वीकारले. शिक्षण ग्रंथांद्वारे नव्हे, तर कथांद्वारे हे शिकवण्याचे वेगळे तंत्र त्यांनी वापरले. त्याकरिता प्राण्यांवरील छोट्या छोट्या कथा तयार केल्या. या कथांच्या तात्पर्यामुळे मैत्री, धैर्य, नीती, संकटातून मार्ग काढणे, विश्वास आणि व्यवहारकुशलता यांविषयीचे मार्गदर्शन मिळते. ते राजकुमार या कथांमध्ये इतके रमले की हसतखेळत त्यांना जीवनाचे महत्त्वाचे धडे सहज सोप्या पद्धतीने मिळत गेले आणि काही महिन्यांतच ते सूज्ञ, समजूतदार आणि राज्यकारभारासाठी योग्य बनले.

या सर्व कथांचा संग्रह 'पंचतंत्र' या नावाने ओळखला जाऊ लागला. अनेक शतके आणि अनेक

देशांमध्ये या कथा पिढ्यान्‌पिढ्या मोठ्या आवडीने वाचल्या गेल्या व सांगितल्या गेल्या. पंचतंत्राचा पन्नासहून अधिक भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. तसेच जातककथाही सोप्या भाषेत, योग्य-अयोग्याची जाण करून देतात.



**करून पहा.**

तुम्हांला पंचतंत्रातील एखादी कथा किंवा जातककथा माहिती आहे का? त्या कथा मिळवून वाचा. त्यातील एखाद्या कथेचे नाट्यीकरण सादर करा.

| प्राचीन भारतातील नाट्य | प्राचीन भारतातील संगीत | प्राचीन भारतातील नृत्य |
|---|---|---|
| ✻ प्राचीन भारतातील नाट्यकला प्रगत होती. भरतमुनी यांनी 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात नाट्यकलेच्या सर्व अंगांचा अत्यंत सविस्तर ऊहापोह केला आहे. आजही नाटक, नृत्य आणि अभिनय शिकताना या ग्रंथांचा अभ्यास केला जातो.<br><br>✻ या काळातील काही सुप्रसिद्ध नाटके :<br>- महाकवी भास याने 'स्वप्नवासवदत्त' हे प्रसिद्ध नाटक लिहिले.<br>- अश्वघोष याने 'सारीपुत्तप्रकरण' हे नाटक लिहिले.<br>- कालिदास हा श्रेष्ठ कवी आणि नाटककार होऊन गेला. त्याने 'शाकुंतल', 'मालविकाग्निमित्र' व 'विक्रमोर्वशीय' ही तीन जगप्रसिद्ध नाटके लिहिली.<br>- शूद्रकाने 'मृच्छकटिक' हे नाटक, तर विशाखदत्ताने 'मुद्राराक्षस' हे नाटक रचले.<br>- सम्राट हर्षवर्धनाने 'रत्नावली', 'प्रियदर्शिका' आणि 'नागानंद' अशी तीन नाटके रचली. | ✻ भारतीय संगीतपरंपरेचा उगम सामवेदात आहे.<br><br>✻ आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद आणि अर्थशास्त्र हे चार उपवेद मानले जातात. त्यांपैकी गांधर्ववेद हा भारतीय संगीत, नृत्य आणि वादन यांचा स्रोत मानला जातो.<br><br>✻ 'संगीतरत्नाकर' हा संगीतविषयक प्रसिद्ध ग्रंथ आहे. तो शारंगदेव नावाच्या संगीततज्ज्ञाने लिहिला आहे. | ✻ वैदिक काळापासून नृत्यांविषयीचे संदर्भ सापडतात.<br><br>✻ भारताच्या अनेक प्रदेशात विविध नृत्यप्रकार स्वतंत्रपणे विकसित होत गेले.<br><br>✻ भारतीय नृत्यकलेमध्ये कथ्थक, कथकली, भरतनाट्यम्, मणिपुरी, ओडिसी, कुचिपुडी आणि मोहिनीअट्टम अशा एकूण सात अभिजात नृत्यपरंपरा आहेत असे मानतात.<br><br>✻ प्राचीन भारतात विविध प्रदेशांत लोकनृत्ये सादर केली जात असत. सण, उत्सव अशा प्रसंगी आनंद व्यक्त करण्यासाठी नृत्य करत असत. लोकनृत्य हे उत्स्फूर्त असते. |

## कला आणि स्थापत्य

प्राचीन भारतातील अजिंठा लेण्यांमधील भित्तिचित्रे जगभर प्रसिद्‌ध आहेत. या चित्रांसाठी विविध वनस्पती, माती, दगड यांपासून तयार केलेले रंग वापरलेले आहेत. चित्रातील व्यक्तींचे दागिने, कपडे, केसांची रचना यांतील सूक्ष्म तपशील दाखवलेले आहेत. त्यांतून त्या काळातील जीवनशैली, नृत्य, वाद्ये, निसर्ग इत्यादींचे सुंदर चित्रण दिसते. वेरूळ लेण्यांमध्ये बौद्‌ध, जैन आणि हिंदू लेणी पाहायला मिळतात. वेरूळ येथील कैलास लेणे हे जगातील एक अद्‌भुत मंदिर आहे. एका विशाल शिलाखंडातून कोरलेल्या या लेण्याची सुरुवात कळसापासून पायापर्यंत झाली. त्यावरूनच 'आधी कळस मग पाया' असे म्हणण्याची पद्‌धत रूढ झाली असावी. मंदिरात सुंदर शिल्पे, कोरीव खांब, नंदी मंडप असे अप्रतिम कोरीव काम पाहायला मिळते. तसेच या शिल्पांमध्ये विविध देवदेवता आणि पौराणिक कथांमधील दृश्येही कोरलेली आहेत.



वेरूळ–कैलास मंदिर

बौद्‌ध लेण्यांमध्ये स्तूप, चैत्यगृह आणि विहार हे तत्कालीन स्थापत्याचे मुख्य घटक आहेत. स्वतंत्रपणे उभारलेले स्तूप हे भारतीय स्थापत्यकलेचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. सम्राट अशोकाच्या काळात सांची येथे स्तूप बांधला गेला. पुढे सातवाहन काळात सांची स्तूपाभोवती चार भव्य तोरणे (द्‌वार) तयार केली गेली. त्यावर सिंह, हत्ती इत्यादी आकृत्या कोरल्या गेल्या, तसेच गौतम बुद्‌धांच्या चरित्रातील प्रसंगही कोरलेले आहेत. इतर प्राचीन स्तूपांवरही अशा आकृती कोरलेल्या दिसतात. काही स्तूपांभोवती धर्मचर्चा



सांची स्तूप

करण्यासाठी किंवा उपासनेसाठी सभागृह तयार केलेले असे. त्याला 'चैत्यगृह' असे म्हणतात. कार्ले येथील चैत्यगृह हा शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे.

चैत्यगृहाजवळच बौद्‌ध भिक्खूंच्या वास्तव्यासाठी गुंफा खोदलेल्या असत. त्यांना 'विहार' असे म्हणत. महाराष्ट्रातील भाजे येथील विहार सर्वांत प्राचीन समजला जातो. नाशिक, बेडसे, अजिंठा इत्यादी ठिकाणांचे विहारही प्रसिद्‌ध आहेत. ओडिशामधील खंडगिरी व उदयगिरी येथील जैन गुंफाही प्रसिद्‌ध आहेत.



### माहीत आहे का तुम्हांला?

दिल्ली येथील मेहरौली येथे असलेला लोहस्तंभ हा भारताच्या प्राचीन प्रगत धातुशास्त्राचा नमुना आहे. हा स्तंभ गुप्त सम्राट दुसरा चंद्रगुप्त उर्फ विक्रमादित्य याच्या काळात उभारला गेला. या स्तंभाविषयी सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे तो १६०० वर्षांहून अधिक काळ उभा असूनही त्याला आजतागायत गंज चढलेला नाही.



लोहस्तंभ

## ९.२. प्राचीन भारतातील व्यापार, व्यवसाय आणि आर्थिक जीवन

या काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. लोकांच्या अन्नधान्याच्या, वस्त्राच्या आणि रोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शेती महत्वाची होती. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा यांसारख्या नद्यांच्या खोऱ्यातील प्रदेश सुपीक होता. देशांतर्गत आणि आंतरदेशीय व्यापार समुद्रमार्गे आणि खुष्कीच्या मार्गांद्वारे विकसित झाला. प्राचीन भारतात अन्नधान्याबरोबरच कापड, मसाले, धातू, दागिने, हस्तिदंत, मौल्यवान रत्न यांसारख्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे. विशेषतः सातवाहन काळात, रोमन साम्राज्याशीही व्यापाराचे संबंध होते. मसाले, रेशीम कापड, मणी यांसारख्या वस्तूंचा व्यापार होत असे. नवीन बाजारपेठा निर्माण झाल्या. चलनव्यवस्था नियोजित होती. न्याय करप्रणाली राबवली जात असे. त्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था स्थिर राहिली. शेतीच्या व्यतिरिक्त वस्त्रोद्योग आणि धातुकाम यांसारखे उद्योगही आर्थिक जीवनात महत्त्वाचे होते. व्यापारी मार्गांवर बंदरे, बाजारपेठा आणि नगरे विकसित होत होती. या काळात व्यापारामुळे आलेल्या समृद्धीचा प्रभाव सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनावरही दिसून येतो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

सातवाहनांच्या काळापासून दक्षिणेत व्यापाराची व उद्योगांची भरभराट सुरू होती. त्यामुळे दक्षिणेत अनेक नगरे उदयास आलेली दिसतात. उदाहरणार्थ– प्रतिष्ठान (पैठण), तगर (तेर), नासिक (नाशिक) करहाटक (कऱ्हाड) इत्यादी. ही नगरे तटबंदी असलेली होती. अशा नगरांच्या उत्खननात सापडलेल्या रोमन नाण्यांवरून त्या काळातील प्रगत व्यापाराची कल्पना येते. सोपारा, कल्याण, भडोच ही त्या काळची मुख्य बंदरे होती. जुन्नर व नाशिक या ठिकाणांच्या शिलालेखांत कुलारिक (मातीची भांडी बनवणारा), तीलपिषक (तेलाच्या घाण्यावर काम करणारा), कोलिक (विणकर) अशा अनेक व्यावसायिकांचे उल्लेख आढळतात.



**काय कराल ?**

तुम्ही जर प्राचीन काळात असता, तर तुम्हांला कोणत्या प्रकारचा व्यवसाय किंवा व्यापार करायला आवडला असता ? का ?

## ९.३. प्राचीन भारतातील वैद्यकशास्त्र

भारतीय वैद्यकशास्त्राचा उगम अथर्ववेदामध्ये आहे. प्राचीन भारतातील जीवक, सुश्रुत, चरक यांसारख्या प्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञांनी शरीररचना, शस्त्रक्रिया, औषधनिर्मिती, रोगनिवारण आणि आहाराचे नियम यांबाबत अमूल्य ग्रंथ रचले.


या ग्रंथांनी प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्राचा पाया घातला.

- जीवक हा प्राचीन भारतातील प्रख्यात वैद्य होता. त्याने गौतम बुद्धांवर उपचार केले होते, असे बौद्ध ग्रंथांवरून दिसते. त्याने तक्षशिला येथे वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेतले. शस्त्रक्रिया, रोगनिदान व औषधोपचार या क्षेत्रांत त्याने महत्वाचे कार्य केले.
- सुश्रुताने 'सुश्रुतसंहिता' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात वैद्यक, रोगनिदान, शल्यक्रिया, आरोग्यविज्ञान इत्यादींचे शास्त्रीय विवेचन केलेले आहे.
- चरकाने 'चरकसंहिता' या ग्रंथात रोगप्रतिकारक शक्ती, औषधांचा योग्य वापर, आहार–विहाराच्या आणि जीवनशैलीच्या नियमांचा सविस्तर उल्लेख केलेला आहे. हा ग्रंथ अरबस्तान, तिबेट, चीन इत्यादी देशांतही प्रसिद्ध होता.

### माहीत आहे का तुम्हांला ?

'सुश्रुतसंहिता' या ग्रंथामध्ये सुश्रुताने अनेक शस्त्रक्रियांची व त्यासाठी लागणाऱ्या अनेक उपकरणांची सचित्र माहिती दिलेली आहे. पोटावर शस्त्रक्रिया करणे, कृत्रिम नाक बसवणे, त्वचारोपण करणे इत्यादी शस्त्रक्रियाही सुश्रुतसंहितेत सांगितलेल्या आहेत; तसेच एकूण ११२० रोगांची लक्षणांसह यादी दिलेली आहे. सुश्रुताला शस्त्रक्रियांचे 'आद्यजनक' मानले जाते. नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी त्याने शोधलेली पद्धती नावीन्यपूर्ण होती. नाक तुटल्यामुळे आलेले व्यंग घालवण्यासाठी नाकाच्या शस्त्रक्रियेत सुश्रुताने सुरुवातीला गालाच्या त्वचेचे रोपण केले. सुश्रुताने विकसित केलेल्या या तंत्राचा अभ्यास पुढे १८व्या शतकात युरोपीय लोकांनी केला. या त्वचारोपणाच्या तंत्राला 'इंडियन फ्लॅप' असे म्हटले जाते.






सुश्रुताच्या ग्रंथात दिलेली शल्यक्रियेची उपकरणी

## ९.४. महाराष्ट्राची संमिश्र संस्कृती

महाराष्ट्रात धर्म, कला, भाषा, शिक्षण आणि परंपरा यांचा अद्‌वितीय संगम झाला. महाराष्ट्र हा प्रदेश इंग्रजीत प्राचीन भारतातील 'मेल्टिंग पॉट' म्हणून ओळखला जातो. विस्तृत समुद्र किनाऱ्यामुळे या प्रदेशात व्यापार, बाह्यसंपर्क आणि विविध संस्कृतींची देवाणघेवाण सुलभ झाली. सातवाहन काळात रोमन साम्राज्याशी व्यापार वाढला. अजिंठा, वेरूळ व कान्हेरी या लेण्यांमध्ये बौद्‌ध, जैन व हिंदू परंपरा दिसतात. स्थापत्यकला, शिल्पकला आणि शिलालेख यांमुळे तत्कालीन इतिहासाचा शोध घेता येतो. महाराष्ट्रात भाषा आणि साहित्य यांत वैविध्य दिसते.

महाराष्ट्रात काही प्रसिद्‌ध शैक्षणिक केंद्रे होती. महाराष्ट्रातील प्राचीन शिक्षण प्रामुख्याने गुरुकुल परंपरेवर आधारित होते. त्याशिवाय ठिकठिकाणचे बौद्‌ध विहारसुद्‌धा शिक्षणासाठी प्रसिद्‌ध होते. पैठण, अजिंठा, वेरूळ आणि कान्हेरी ही शिक्षणाची महत्त्वाची केंद्रे होती. तेथे विद्यार्थी धर्म, तत्त्वज्ञान, भाषा, वैद्यकशास्त्र, शिल्पकला यांसारखे विषय शिकत असत.

### माहीत आहे का तुम्हांला ?



विद्यार्थ्यांनो, दिलेल्या चित्राचे सूक्ष्म निरीक्षण करा. हे चित्र कशाचे आहे, तुम्हांला माहीत आहे का ?

खडकाळ माळावर अशी शिल्पे हजारो वर्षांपूर्वी खोदून ठेवलेली आहेत. त्यामध्ये सूर्य, प्राणी, नृत्य करणारी माणसे, शिकारी, विविध चिन्हे असलेली चित्रे आहेत. त्यांना 'कातळशिल्पे' असे म्हणतात. ती महाराष्ट्रातील कोकण प्रांतात विशेषतः रत्नागिरी, राजापूरच्या प्रदेशात सापडतात.

ही कातळशिल्पे, हा महाराष्ट्राचा महत्त्वाचा सांस्कृतिक वारसा आहे.

## ९.५. प्राचीन भारतातील शिक्षण पद्धती

शिक्षणाची सुरुवात घरी होई आणि विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी गुरुकुलात पाठवले जाई. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला या विद्यापीठांत विशेष विषय शिकवले जात. विद्यार्थ्यांना शास्त्र, गणित, ज्योतिष, तत्वज्ञान, भाषा, संगीत, शिल्पकला, शस्त्रविद्या, आयुर्वेद, वास्तुकला यांबाबत सखोल शिक्षण दिले जात असे. गुरुकुल प्रणालीत विद्यार्थ्यांना आचार, संस्कार, नैतिक मूल्ये आणि शिस्त यांचा विचार करून घडवले जाई. प्राचीन भारतात स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी यांचा उल्लेख काही ग्रंथांमध्ये आढळतो.

### ■ तक्षशिला विद्यापीठ

तक्षशिला हे भारतातील सर्वांत प्राचीन आणि प्रतिष्ठित शिक्षणकेंद्रांपैकी एक होते. ते आजच्या पाकिस्तानमधील रावळपिंडीजवळ होते. तक्षशिला विद्यापीठात विविध विषयांचे सखोल शिक्षण दिले जात असे. या विद्यापीठात दूरवरून विद्यार्थी येत. मौर्य साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याचे शिक्षण तक्षशिला विद्यापीठात झाले. व्याकरणकार पाणिनी, चरक आणि जीवक हे वैद्य याच विद्यापीठाचे विद्यार्थी होते.

### ■ नालंदा विद्यापीठ

नालंदा हे प्राचीन भारतातील एक सुप्रसिद्ध विद्यापीठ होते. नालंदा विद्यापीठाचे पुरातत्वीय स्थळ युनेस्कोने जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे. इसवी सन ५व्या शतकात गुप्त राजवटीच्या काळात नालंदाची स्थापना झाली. नालंदा विद्यापीठात बौद्ध तत्वज्ञान, वेद, गणित, ज्योतिष, साहित्य, संगीत आणि कला हे विषय शिकवले जात. येथे १०,०००पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची राहण्याची सोय होती. येथे विविध ठिकाणांहून अध्यापक येत असत. नालंदा विद्यापीठात भव्य ग्रंथालय होते. नालंदा विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठी अतिशय कठीण प्रवेशपरीक्षा द्यावी लागत असे.



नालंदा विद्यापीठ

### ■ विक्रमशिला विद्यापीठ

इसवी सन ८व्या शतकात विक्रमशिला विद्यापीठाची स्थापना झाली. हे विद्यापीठ आजच्या बिहारमधील भागलपूरजवळ होते. या विद्यापीठात प्रवेशपरीक्षा घेतली जात असे. येथे मुख्यतः बौद्ध तत्वज्ञान, धर्मशास्त्र, तंत्रविषयक ग्रंथ, आयुर्वेद आणि साहित्य यांचा अभ्यास केला जात असे.

### ■ अन्य महत्त्वाची शिक्षणकेंद्रे

प्राचीन भारतात नालंदा, तक्षशिला आणि विक्रमशिला या विद्यापीठांव्यतिरिक्त वाराणसी,

वलभी आणि कौशाम्बी ही शिक्षणाची महत्त्वाची केंद्रे होती. येथे कला, स्थापत्य आणि साहित्य यांचा सखोल अभ्यास होत असे. महाराष्ट्रात पैठण हे सातवाहन काळातील शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. पाहिलेत ना! भारताचा प्राचीन सांस्कृतिक वारसा किती अद्‌भुत आहे! भारताने ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली होती. खरंच, हा एक अनमोल सांस्कृतिक खजिना आहे.



**करून पहा.**

तुम्ही प्राचीन सांस्कृतिक बाबींशी निगडित चित्रे शोधा. त्या चित्रांचे रंगीत तक्ते तयार करा. तुमच्या शाळेत एक प्रदर्शन आयोजित करा.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. पतंजलींचा ............. हा व्याकरणविषयक ग्रंथ आहे.

२. भरतमुनी यांनी ............ हा ग्रंथ लिहिला.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. विष्णुशर्मा यांनी लिहिलेल्या कथासंग्रहाचे नाव काय?

२. गौतम बुद्धांच्या जीवनासंबंधीच्या कथांना काय म्हणतात?

३. काश्मीरचा इतिहास सांगणाऱ्या कवी कल्हणच्या ग्रंथांचे नाव लिहा.

४. सातवाहनकालीन महाराष्ट्रातील शिक्षणाचे प्रमुख केंद्र कोणते?

**प्र.२ अ) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) शारंगदेव | अ) शाकुंतल |
| २) भास | ब) संगीतरत्नाकर |
| ३) कालिदास | क) मुद्राराक्षस |
| ४) विशाखदत्त | ड) स्वप्नवासवदत्त |

**ब) तक्ता पूर्ण करा.**

| प्राचीन विद्यापीठ | सध्याचे ठिकाण |
|---|---|
| ........................... | रावळपिंडी |
| नालंदा | ........................... |
| ........................... | भागलपूर |

**प्र.३ अ) टिपा लिहा.**

१. नालंदा विद्यापीठ

२. सुश्रुतसंहिता

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. भारतातील सात अभिजात नृत्यप्रकार प्रामुख्याने कोणत्या राज्यांमध्ये आहेत त्यांची नावे लिहा.

२. दिल्ली येथील मेहरौली येथे असलेल्या लोहस्तंभाची माहिती लिहा.

**प्र.४ सविस्तर उत्तरे लिहा.**

१. सांची येथील स्तूपाचे चित्र पाहा व वर्णन लिहा.

२. महाराष्ट्राच्या संमिश्र संस्कृतीविषयी थोडक्यात माहिती लिहा.

**प्र.५ प्राचीन काळातील शिक्षणपद्धती आणि आधुनिक काळातील शिक्षणपद्धती यांची तुलना करा.**

**प्र.६ कोडे पूर्ण करा.**

१)

| | | | |
|---|---|---|---|
| **१) म** | | | **२)** |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **३)** | | | |

**उभे शब्द**

१) एक प्राचीन महाकाव्य

२) एक प्राचीन विद्यापीठ

**आडवे शब्द**

३) एक प्राचीन विद्यापीठ

**उपक्रम**

- आपल्या परिसरातील आयुर्वेद डॉक्टरची भेट घेऊन आयुर्वेद उपचार पद्धतीची माहिती लिहा.
- आंतरजालाच्या मदतीने कातळशिल्पांची चित्रे शोधा.
- पंचतंत्र आणि जातककथा वाचा. त्यांतील एका कथेचे नाट्यीकरण परिपाठात सादर करा.

***

# १० प्राचीन भारत व जग



१०.१. पर्शियन संस्कृतीशी संपर्क
१०.२. ग्रीक – रोमन संस्कृतींचा भारतावरील परिणाम
१०.३. भारत आणि शेजारील देश

**विचार करा.**



हे भारतात सापडलेले एक **रोमन नाणे** आहे. भारतात हे नाणे कसे आले असेल?





डावीकडील चित्रात इराणी साम्राज्याची राजधानी **पर्सिपोलीस** येथील स्तंभ आहे आणि उजवीकडील चित्रात एक **अशोकस्तंभ** आहे. दोघांमध्ये काय साम्य दिसते?




तुम्ही पाठ क्र. ८ मध्ये हे चित्र पाहिलेले आहे. गौतम बुद्धांच्या या प्रतिमेवर **ग्रीक कलेचा** प्रभाव दिसतो. असे का असेल बरे?





वरील दोन चित्रांमधील एक चित्र **भारतातील** आणि एक **श्रीलंकेतील** आहे. या दोन्हींमध्ये तुम्हांला काही साम्य दिसते का?




**हा नकाशा भारत आणि पश्चिम आशिया यांमधील व्यापारी मार्गाचा आहे. या मार्गाने कोणत्या वस्तूंचा व्यापार झाला असेल?**

या सर्व चित्रांमधून तुम्हांला लक्षात येईल की, प्राचीन भारताचा भारताबाहेरील देशांशी व्यापारी संबंध होता. अर्थातच त्यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण होत होती. प्राचीन काळात भारत अनेक देशांशी सांस्कृतिक, धार्मिक आणि व्यापारी संबंधांनी जोडलेला एक महत्त्वाचा केंद्रबिंदू होता. मध्य आशियातील देश, इराण(पर्शिया), चीन, तिबेट, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि इंडोनेशिया या देशांशी भारताचे घनिष्ठ संबंध होते. या देशांमध्ये भारतातील धर्मांचा प्रसार झाला. सांस्कृतिक संबंधामुळे त्या त्या देशांमध्ये भिन्न-भिन्न कलाशैलींचा उदय झाला.

**करून पहा.**

पाठ्यपुस्तकाच्या शेवटच्या पृष्ठावर दिलेल्या ऐतिहासिक बोधपर कथामालेचा भाग ४ मिळवा आणि त्यातील कथा वाचून भारत आणि इतर देश यांच्यामध्ये असलेला सांस्कृतिक संबंध जाणून घ्या.

### १०.१. पर्शियन संस्कृतीशी संपर्क

प्राचीन भारत आणि पर्शियाचे सांस्कृतिक, व्यापारी आणि राजकीय संबंध होते. प्राचीन पर्शियन संस्कृती ही जगातील विकसित संस्कृतींपैकी एक होती. पर्शियाचे साम्राज्य रोमपर्यंत पसरलेले होते. त्या साम्राज्याचे प्रशासन सुव्यवस्थित होते. प्राचीन पर्शियाची शिल्पकलेची परंपरा विकसित होती. पर्शियन शिल्पकलेचा भारतीय शिल्पकलेवरही प्रभाव पडलेला दिसतो. भारतीय उपखंडाचा वायव्य प्रांत (गांधार, सिंध) पर्शियन साम्राज्याचा एक भाग होता. पर्शियन साम्राज्याला 'अखमोनीय साम्राज्य' म्हणून ओळखले जात असे. पर्शियन साम्राज्याची प्रांतवार

विभागणी केलेली होती. विभागीकरण आणि त्यानुसार करपद्धती, गुप्तचर व्यवस्था आणि अधिकाऱ्यांची श्रेणी यांची रचना केलेली होती. मौर्य साम्राज्याच्या राज्यव्यवस्थेवर या बाबींचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

सम्राट अशोकाच्या लेखातील खरोष्ठी आणि अरेमाइक या लिपी पर्शियन लिपीतून विकसित झालेल्या आहेत.

भारतातून पर्शियात कापड, मोती, मसाल्याचे पदार्थ आणि हत्ती निर्यात होत असत. पर्शियातून मौल्यवान धातू भारतात येत असत.

मौर्य साम्राज्यातील शिल्पकलेवर व स्थापत्यावर पर्शियन कलेचा व स्थापत्याचा प्रभाव दिसतो. अशोकस्तंभावर सिंह, अश्व आणि बैल यांची शिल्पे आहेत. त्यावर पर्शियन शिल्पशैलीचा प्रभाव दिसतो.

### १०.२. ग्रीक – रोमन संस्कृतीचा भारतावरील परिणाम



सम्राट सिकंदर

इसवी सनपूर्व ३२६मध्ये मॅसिडोनियाचा राजा सिकंदर याने पर्शिया जिंकून भारताच्या वायव्य प्रदेशाकडे कूच केले. सिकंदराच्या भारतातील स्वारीमुळे भारतीय उपखंडातील लोकांना ग्रीक संस्कृतीची ओळख झाली. त्याने सिंधू प्रदेशातील अनेक लहान राज्ये आपल्या अधिपत्याखाली आणली. सिकंदरच्या मृत्यूनंतर त्याच्या साम्राज्याचे तुकडे झाले आणि इंडो-ग्रीक राजघराणी उदयाला आली. त्यांच्या काळामध्ये ग्रीक संस्कृतीशी संबंध आला. मौर्य सम्राट चंद्रगुप्त, बिंदुसार आणि सम्राट अशोक यांचे इंडो-ग्रीक राजांशी राजकीय संबंध प्रस्थापित झाले होते. मेगॅस्थिनीस हा चंद्रगुप्ताच्या दरबारातील राजदूत होता. मेगॅस्थिनीसने लिहिलेल्या 'इंडिका' ग्रंथातून मौर्यकालीन समाजरचना, प्रशासन, कृषी, व्यापार इत्यादींची माहिती मिळते. ग्रीक मूर्तीकलेच्या प्रभावातून कुशाण काळात भारतामध्ये एका नव्या कलाशैलीचा उदय झाला. त्याला 'गांधार कला' असे म्हणतात. गांधार कलाशैलीतील गौतम बुद्धांच्या अनेक मूर्ती घडवल्या गेल्या. या शैलीतील मूर्तींची चेहरेपट्टी ग्रीक चेहरेपट्टीशी मिळतीजुळती असे. बॅक्ट्रियामधील ग्रीक राजांची नाणी हे या कलेचे उत्तम नमुने आहेत. त्या नाण्यांना 'इंडो-ग्रीक' नाणी असे म्हटले जाते. त्या नाण्यांवर ग्रीक प्रभाव आढळतो.



**सांगा पाहू!**

मी सम्राट नाही, सैनिक नाही,
पण राजदरबारात जागा माझी.
परकीयांच्या नजरेतून भारत पाहिला,
जे पाहिले ते सांगण्यास 'इंडिका' हा ग्रंथ लिहिला.
मी कोण?

इसवी सनाच्या पहिल्या-दुसऱ्या शतकांच्या काळात भारत आणि रोम यांच्यामधील व्यापार भरभराटीस आला होता. या व्यापारात दक्षिण भारतातील बंदरांना खूप महत्त्व प्राप्त झाले. महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील उत्खननात कांस्य

या धातूच्या काही वस्तू सापडल्या. त्या रोमन बनावटीच्या आहेत. तमिळनाडूमधील अरिकामेडू येथील उत्खननातही रोमन बनावटीच्या अनेक वस्तू सापडल्या आहेत.



**माहीत आहे का तुम्हांला?**

तेर हे महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्यातील सातवाहनकालीन एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. येथील उत्खननात रोमन नाणी, अँफोरा (एक प्रकारचा कुंभ), काचेचे मणी आणि हस्तिदंताची नाजूक कोरीव शिल्पे सापडली आहेत. तेरचे कापड, मोती, दागिने आणि हस्तकलेच्या वस्तू रोमन बाजारात खूप लोकप्रिय होत्या. यांतील हस्तिदंताची १२ सेमी. उंचीची कोरीव बाहुली विशेष लक्ष वेधून घेते. अशाच हस्तिदंती बाहुली इटलीतील पाँपेई या प्राचीन शहराच्या उत्खननात मिळालेल्या आहेत. हे शहर इ.स ७९ मध्ये झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकात नष्ट झाले. यावरून तेर हे एक व्यापारी केंद्र होते व त्याचा रोमशी व्यापारी संबंध होता, हे सिद्ध झाले आहे.

अशा अनेक व्यापारी केंद्रांचा उल्लेख तत्कालीन साहित्यात मिळतो. या व्यापारात इजिप्तमधील अलेक्झांड्रिया नावाचे बंदर महत्त्वाचे होते. भारतीय माल अरब व्यापारी अलेक्झांड्रियापर्यंत घेऊन जात. तेथून तो युरोपातील देशांमध्ये पाठवला जाई. दक्षिण भारतातील बंदरांमधून रोमन व्यापारी थेट भारतात येत आणि कापड, मसाले, मौल्यवान रत्ने, औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात विकत घेत. भारतात आजही अनेक रोमन नाणी सापडतात. यावरून या व्यापाराचे प्रमाण व महत्त्व दिसून येते.



**माहीत आहे का तुम्हांला?**

प्राचीन काळात भारतातून निर्यात होणारी काळी मिरी ही युरोपात अत्यंत मौल्यवान वस्तू मानली जात असे. रोममध्ये ती इतकी महाग होती की तिला 'काळे सोने' असे संबोधले जात असे. रोमन लोकांच्या अन्नपदार्थांमध्ये मसाल्यांचा अभाव होता. मिरी त्यांच्यासाठी चव आणि आरोग्य दोन्ही दृष्टींनी खूप महत्वाची होती. दक्षिण भारतातील बंदरांमधून मिरी मोठ्या प्रमाणावर रोमन साम्राज्यात निर्यात केली जात असे. रोमन व्यापारी भारतीय व्यापाऱ्यांना सोन्याची नाणी देऊन मिरी घेत असत. रोमन लेखक प्लिनी आपल्या ग्रंथात लिहितो, की "रोममध्ये भारतातून मसाले आणण्यासाठी दरवर्षी प्रचंड प्रमाणात सोने रोममधून बाहेर जाते."



बोरोबुदूर स्तूप

## १०.३. भारत आणि शेजारील देश

प्राचीन भारताचे शेजारील देशांशी विशेषतः आग्नेय आशियातील देशांशी जवळचे संबंध होते. समुद्री व्यापार, बौद्‌ध व हिंदू धर्मांचा प्रसार, भाषांची आणि कलांची देवाणघेवाण यांद्‌वारे भारताचा प्रभाव श्रीलंका, म्यानमार, थायलंड, कंबोडिया, व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि मलेशिया या प्रदेशांपर्यंत पोचला. भारतीय व्यापारी मसाले, कापड, मौल्यवान रत्ने आणि धातू घेऊन समुद्री मार्गाने या देशांमध्ये गेले. त्यांतील काही तेथेच स्थिरावले आणि त्यातील काहींनी त्या प्रदेशात राज्ये प्रस्थापित केली. बौद्‌ध भिक्खूंनी बौद्‌ध तत्त्वज्ञानाचा प्रचार केला. आग्नेय आशियातील मंदिरे, नृत्यकला, कला, स्थापत्य आणि राजकीय परंपरा यांमध्ये भारतीय संस्कृतीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. अंकोरवटसारखे भव्य मंदिर, बोरोबुदूर स्तूप, भारतीय महाकाव्यांमुळे प्रेरित झालेल्या कलापरंपरा ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. प्राचीन भारत आणि आग्नेय आशिया यांमधील संबंध हे केवळ व्यापारापुरते मर्यादित नव्हते, तर ते सांस्कृतिक आणि आध्यात्मिक आदानप्रदानाचे प्रतीक होते.



सिगिरिया लेण्यांतील भित्तिचित्र

### ■ श्रीलंका

बौद्‌ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सम्राट अशोकाने त्याचा मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना श्रीलंकेमध्ये पाठवले होते. त्या दोघांच्या नावाचा उल्लेख ‘महावंस’ या श्रीलंकेतील बौद्‌ध ग्रंथात केलेला आहे. संघमित्राने स्वतःबरोबर बोधिवृक्षाची शाखा नेली होती. श्रीलंकेतील अनुराधपूर येथे असलेला बोधिवृक्ष याच शाखेपासून वृद्‌धिंगत झाला असे तेथील परंपरेनुसार मानले जाते.

श्रीलंकेतील मोत्यांना आणि इतर मौल्यवान वस्तूंना भारतात मोठ्या प्रमाणात मागणी होती. तेथील सिगिरिया या ठिकाणी इसवी सनाच्या पाचव्या शतकात कश्यप नावाच्या राजाने लेणे खोदवले होते. त्या लेण्यातील भित्तिचित्रांची शैली अजिंठ्याच्या चित्रशैलीशी साम्य दर्शवणारी आहे. श्रीलंकेतील ‘महावंस’ आणि ‘दीपवंस’ हे पाली भाषेतील ग्रंथ भारत आणि श्रीलंका यांच्यामधील परस्परसंबंधांची माहिती देतात.

### ■ चीन

प्राचीन काळापासून भारत आणि चीन यांच्यामध्ये व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले होते. सम्राट हर्षवर्धनाने चीनच्या दरबारात राजदूत पाठवला होता. चीनमध्ये तयार होणाऱ्या रेशमी कापडाला भारतात ‘चीनांशुक’ असे नाव होते. चीनांशुकाला भारतात मोठी मागणी होती. प्राचीन भारतातील व्यापारी हे चीनांशुक पश्चिमेकडील देशांमध्ये पाठवत असत. हा व्यापार खुश्कीच्या मार्गाने होत असे. भारत, अफगाणिस्तान व मध्य आशिया या प्रदेशांतून जाणाऱ्या

मार्गाला 'रेशीम मार्ग' असे म्हणतात. भारतातील काही प्राचीन स्थळे या रेशीम मार्गाशी जोडलेली होती. त्यामध्ये महाराष्ट्रातील मुंबईजवळ असलेले पालघर जिल्ह्यातील नालासोपारा हे एक होते. चीनमधून भारतात आलेले फाहियान आणि युआन श्वांग हे बौद्‌ध भिक्खूही रेशीम मार्गानेच भारतात आले. युआन श्वांगचा उल्लेख ह्यूएनत्संग असादेखील केला जातो.

इसवी सनाच्या पहिल्या शतकातील चिनी सम्राट 'मिंग' याच्या आमंत्रणावरून धर्मरक्षित आणि कश्यप मातंग हे बौद्‌ध भिक्खू चीनमध्ये गेले. त्यांनी अनेक भारतीय बौद्‌ध ग्रंथांचे चिनी भाषेत रूपांतर केले. त्यानंतर चीनमधील बौद्‌ध धर्माच्या प्रसारास चालना मिळाली. बौद्‌ध धर्म जपान, कोरिया, व्हिएतनाम या देशांमध्येही पोचला.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

इसवी सनाच्या सातव्या शतकात युआन श्वांग चीनमधून भारतात बौद्‌ध धर्माचे शिक्षण घेण्यासाठी आला. नालंदा विद्‌यापीठात त्याने अनेक वर्षे ज्ञानसाधना केली. येथील विद्‌वान भिक्खूंनी त्याला बौद्‌ध तत्त्वज्ञान, व्याकरण, वैद्‌यकशास्त्र, ध्यानविद्‌या अशा अनेक विषयांवरील मौल्यवान ग्रंथ दिले. भारतातून परतताना बरोबर नेण्यासाठी त्याने ६००पेक्षा अधिक हस्तलिखित ग्रंथ गोळा केले होते. हे ग्रंथ चीनमध्ये नेऊन तेथील लोकांना बौद्‌ध धर्माची माहिती द्‌यायची, हा त्याचा उद्‌देश होता. युआन श्वांगने भारतातून मध्य आशियाकडे जाणारी वाळवंटातील वाट धरली. दिवसभर भयंकर उन्हात चालणे आणि रात्री गोठवणारी थंडी अशी कठीण परिस्थिती होती. वाळवंट त्याच्या धैर्याची परीक्षा घेत होते. तरीही तो थांबला नाही, कारण त्याच्याकडे असलेले ग्रंथ हे ज्ञानाचा खजिना होते. एके दिवशी तो ताक्लमकान वाळवंटातून जात असताना अचानक आकाश काळवंडले. काही क्षणांतच त्याच्या आजूबाजूला वाळूचे प्रचंड वादळ उठले. उंटावरील नियंत्रण जाऊ लागले आणि ग्रंथ खराब होतील अशी भीती त्याला वाटू लागली. युआन श्वांगने जीवाचा आटापिटा करून ते ग्रंथ वादळापासून वाचवले. हळूहळू वादळ शांत होऊ लागले. आकाशात पुन्हा उजेड दिसू लागला. थकलेला, धुळीने माखलेला युआन श्वांग उठला आणि सर्वांत आधी सर्व ग्रंथ सुरक्षित आहेत ना, हे पाहिले. सुदैवाने सर्व ग्रंथ सुरक्षित होते.



अनेक महिन्यांच्या प्रवासानंतर तो अखेर चीनमध्ये पोचला. तेथे त्याचे स्वागत झाले. तेथील काही विद्‌वानांनी त्याने आणलेल्या ग्रंथांचा अभ्यास सुरू केला, त्यांचे भाषांतर केले आणि त्यामुळे पूर्व आशियात बौद्‌ध धर्माची माहिती मोठ्या प्रमाणात पसरली. चीनच्या सम्राटाने देखील त्याचे स्वागत केले आणि त्याच्या संग्रहातील ग्रंथांचे भाषांतर करण्यासाठी विशेष केंद्र उभारले. युआन श्वांगने पुढील काही वर्षांत ७५पेक्षा अधिक बौद्‌ध ग्रंथांचे चीनी भाषांतर केले.



अंकोरवट येथील मंदिर

## आग्नेय आशिया

कंबोडियातील 'फुनान' या प्राचीन राज्याची स्थापना इसवी सनाच्या पहिल्या शतकात झाली. चिनी परंपरेच्या आधारे कौंडिण्य नावाच्या भारतीयाने त्याची स्थापना केली, अशी माहिती मिळते. फुनानच्या लोकांना संस्कृत भाषेचे ज्ञान होते. त्या काळातील एक कोरीव शिलालेख उपलब्ध आहे. तो संस्कृतमध्ये आहे.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

चिनी प्रवाशांनी केलेल्या नोंदींनुसार इंडोनेशियातील 'श्रीविजय' साम्राज्य हे बौदध धर्मग्रंथांच्या अध्ययनाचे आणि संस्कृत शिकण्याचे महत्त्वाचे केंद्र होते. याविषयी एक उल्लेखनीय नोंद आहे. त्यानुसार इसवी सन ६७१मध्ये इत्सिंग नावाचा चिनी प्रवासी चीनमधून परतणाऱ्या पर्शियन जहाजातून इंडोनेशियात आला होता. त्या वेळी श्रीविजय राज्यात तो सहा महिने संस्कृत भाषा शिकण्यासाठी राहिला होता. पुढे तो समुद्रमार्गे भारतात दाखल झाला. श्रीविजय राज्यात एक ते दोन वर्ष संस्कृत शिकण्यासाठी राहून मगच भारतात जाण्याचा सल्ला इत्सिंगने त्याच्या लिखाणातून चिनी भिक्खूंना दिला आहे. त्याच्या नोंदीनुसार, श्रीविजय राज्यातील विहारांमध्ये एक हजार भिक्खू राहत होते. त्यानुसार चीनमधून भारतात येणारे चिनी भिक्खू इंडोनेशियात काही महिने संस्कृत शिकण्यासाठी राहून मगच भारतात येत असत.

आग्नेय आशियातील इतर देशांमध्येही भारतातून गेलेल्या काहींनी राज्ये स्थापन केली. त्यातील काही राज्यांचे साम्राज्यात रूपांतर झाले. या राज्यांमुळे भारतीय संस्कृतीचा प्रसार आग्नेय आशियामध्ये होत राहिला. आग्नेय आशियातील कला आणि सांस्कृतिक जीवन यांवर भारतीय संस्कृतीचा ठसा उमटलेला दिसतो. इंडोनेशियात आजही रामायण आणि महाभारत यांतील कथांवर आधारलेली नृत्य-नाट्ये लोकप्रिय आहेत. आग्नेय आशियातील राज्यांमध्ये भारतीय

विनामूल्य वितरणासाठी

संस्कृतीचा प्रभाव उत्तरोत्तर वाढत गेला. प्राचीन कालखंडात बौद्ध धर्म म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया इत्यादी देशांत पोहोचला. नंतरच्या काळात शिव आणि विष्णू यांच्या मंदिरांचीही निर्मिती झाली.



**शोधा पाहू.**

कंबोडिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम, थायलंड, म्यानमार या देशांमधील भारतीय संस्कृतींचा प्रभाव असलेल्या काही वास्तूंना युनेस्कोतर्फे जागतिक दर्जा प्राप्त झाला आहे. त्यांची माहिती शोधा आणि त्यांची एक यादी तयार करा.

या पाठात आपण प्राचीन भारत व जग यांच्यातील परस्परसंबंध समजावून घेतले. या प्रक्रियेत आपण हेही शिकलो, की प्राचीन इतिहास शिकल्यामुळे विविध देशातील सांस्कृतिक संबंध कसे दृढ होतात.



## स्वाध्याय

**प्र.१ अ) योग्य पर्यायांपुढे ☑ अशी खूण करा.**

१. गांधार शैलीतील कोणत्या मूर्ती मोठ्या प्रमाणावर सापडल्या ?

अ) शिव ☐

ब) विष्णू ☐

क) गौतम बुद्ध ☐

२. चीनी भिक्खू युआन श्वांग याने भारतातील कोणत्या विद्यापीठात अनेक वर्षे ज्ञानसाधना केली ?

अ) तक्षशिला ☐

ब) विक्रमशिला ☐

क) नालंदा ☐

३. रामायण आणि महाभारत यांतील कथांवर आधारित नृत्य-नाट्ये कोणत्या देशात लोकप्रिय आहेत ?

अ) इंडोनेशिया ☐

ब) थायलंड ☐

क) कंबोडिया ☐

४. 'रेशीम मार्ग' खालीलपैकी कोणत्या देशातून जातो ?

अ) भारत-श्रीलंका-कंबोडिया ☐

ब) भारत-अफगाणिस्तान-मध्य आशिया ☐

क) भारत-इंडोनेशिया-चीन ☐

**प्र.२ अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. मौर्य साम्राज्यातील शिल्पकलेवर व स्थापत्यावर पर्शियन कला स्थापत्याचा प्रभाव कसा दिसून येतो ?

२. भारतीय संस्कृतीचा प्रसार भारताबाहेरही मोठ्या प्रमाणावर झाला याची उदाहरणे लिहा.

३. भारताचे आग्नेय आशियातील देशांशी जवळचे संबंध होते याचे पुरावे लिहा.


**ब) टिपा लिहा.**

१. रेशीम मार्ग

२. प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतर देशांवरील प्रभाव

३. गांधार शिल्प

**प्र.३ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**कृती**

- जगाच्या नकाशा आराखड्यात भारतीय संस्कृतीचा प्रभाव पोचला, अशी ठिकाणे दर्शवा. उदाहरणार्थ, श्रीलंका, इंडोनेशिया, कंबोडिया.
- आंतरजालाच्या साहाय्याने श्रीलंकेतील अनुराधपूर येथे असलेल्या बोधिवृक्षाचे चित्र व माहिती मिळवा.

**उपक्रम**

- भारत आणि इतर देश यांच्यात कोणकोणत्या बाबींचे आदानप्रदान होत होते, हे दर्शवणारा तक्ता तयार करा.

उदाहरणार्थ,

| देश | भारतातून काय नेले ? | भारतावर काय प्रभाव पडला ? |
|---|---|---|
| रोम | काळी मिरी | व्यापारामुळे सोने भारतात आले. |
| ........ <br> ........ | ............. <br> ............. | .................... <br> .................... |

- युआन श्वांगने अनेक भारतीय ग्रंथ मायदेशी नेऊन भाषांतरित का केले असतील याची वर्गात चर्चा करा.



शिल्पपट्ट : गांधार शैली

***

# नागरिकशास्त्र

# पाठनिहाय अध्ययन निष्पत्ती

| अ. क्र. | अभ्यासक्रम क्षमता | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| अभ्यासक्रम ध्येय : CG–५ कुटुंबात प्रचलित असलेल्या बाबींपासून ते समुदाय/प्रादेशिक/राष्ट्रीय स्तरावर समाजात असणारी विविध प्रकारची असमानता, पूर्वग्रह हे समजून घेणे आणि या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पुढाकार घेणे. | | | |
| १ | **आपले समाजजीवन**<br>C–५.२ : सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांद्वारे विविध स्तरांवर केलेले प्रयत्न ओळखतो, स्पष्ट करतो व त्याआधारे समानता, समावेशन आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यासाठी व्यक्ती काय करू शकतो याचा अभ्यास करतो. | १. समाज संकल्पना स्पष्ट करतो.<br>२. कुटुंबाचे महत्व सांगतो.<br>अ) नातेसंबंधाचे महत्व सांगतो.<br>ब) सामाजिक रितीरिवाजांचे वर्णन करतो. | ८७,९३<br>८८, ९३<br>८८<br>९०,९१ |
| | | ३. मानवी जीवनातील सामाजिक संस्थांचे योगदान स्पष्ट करतो.<br>४. सामाजिक संस्थांची कार्ये सांगतो.<br>५. शाळा ही एक सामाजिक संस्था आहे हे सांगतो. | ८९, ९३<br><br>८९<br>८९ |
| | | ६. सामाजिक विविधता यांविषयी माहिती सांगतो.<br>अ) धार्मिक विविधता यांविषयी माहिती सांगतो.<br>ब) भाषिक विविधतेबद्दल माहिती सांगतो. | ९०, ९२, ९३<br>९०, ९२<br>९०, ९२, ९३ |
| | | ७. सांस्कृतिक विविधता सांगतो. | ९१, ९२ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG–८ भारतीय संविधानाच्या विकासाची प्रक्रिया समजून घेऊन भारतीय समाजात लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी संविधानाचे महत्व जाणणे. | | | |
| २ | **भारतीय संविधान**<br>C– ८.१ गेल्या काही दशकांत, कोणत्याही देशाला विशेषत: भारताला संविधानाची गरज का भासते आणि संविधानाची सखोल उद्दिष्टे कोणती हे जाणतो.<br>C– ८. २ भारतीय संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करतो. त्यात अंतभूर्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय चळवळीतील आदर्श कल्पना, तसेच भारतीय वारसा, परंपरेतून असलेल्या सभ्यता समजून घेतो. | १. संविधानाचा अर्थ सांगतो.<br>२. संविधानाचे प्रकार सांगतो.<br>३. भारतीय संविधानाची गरज व महत्व स्पष्ट करतो. | ९५, ९९<br>९५<br>९५, ९९ |
| | | ४. भारतीय संविधान निर्मितीची पार्श्वभूमी सांगतो. | ९५,९६, ९९ |
| | | ५. संविधान सभेविषयी माहिती सांगतो.<br>६. मसुदा समितीविषयी माहिती सांगतो. | ९६,९७,९८, ९९<br>९७,९८, ९९ |
| ३ | **भारतीय संविधानाची प्रास्ताविका व वैशिष्ट्ये**<br>C– ८.१ गेल्या काही दशकांत, कोणत्याही देशाला विशेषत: भारताला संविधानाची गरज का भासते आणि संविधानाची सखोल उद्दिष्टे कोणती हे जाणतो.<br>C– ८. २ भारतीय संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करतो. त्यात अंतभूर्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय चळवळीतील आदर्श कल्पना, तसेच भारतीय वारसा, परंपरेतून असलेल्या सभ्यता समजून घेतो. | ७. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे महत्त्व स्पष्ट करून सांगतो.<br>अ) भारतीय संविधानाची उद्दिष्टे सांगतो<br>८. भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये सांगतो. | १००, १०२<br><br>१०१,१०२, १०३<br>१०१, १०३ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG–८ भारतीय संविधानाच्या विकासाची प्रक्रिया समजून घेऊन भारतीय समाजात लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी संविधानाचे महत्व जाणणे. | | | |
| ४ | **ग्रामीण स्थानिक शासन संस्था**<br>C– ८.३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रिस्तरीय कार्याचे स्पष्टीकरण देतो आणि तळागाळातील स्तरापर्यंत लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी त्याचे महत्व सांगून प्रशंसा करतो, प्रोत्साहन देतो. | १. स्थानिक स्वराज्य संस्थांची त्रिस्तरीय रचना सांगतो.<br>२. ग्रामपंचायतीची माहिती सांगतो.<br>अ) ग्रामपंचायतीची रचना सांगतो.<br>ब) ग्रामपंचायतीचे कार्य सांगतो.<br>क) ग्रामपंचायत प्रशासनाची माहिती सांगतो.<br>ड) ग्रामसभेविषयी माहिती सांगतो. | १०४, १११<br>१०४,१०५<br>१०४,१०५, १११<br>१०५, १११<br>१०६, ११०, १११<br>१०६,१०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. पंचायत समितीची रचना स्पष्ट करतो.<br>अ. पंचायत समितीचे कार्य स्पष्ट करतो.<br>ब. पंचायत समिती प्रशासनाबाबत माहिती सांगतो. | १०८<br>१०८<br>१०८, ११०, १११ |
| | | ४. जिल्हा परिषदेची रचना स्पष्ट करतो.<br>अ) जिल्हा परिषदेची कार्ये सांगतो.<br>ब) जिल्हा परिषद प्रशासनाबाबत माहिती सांगतो. | १०९<br>१०९<br>१०९, ११०, १११ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG-८ भारतीय संविधानाच्या विकासाची प्रक्रिया समजून घेऊन भारतीय समाजात लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी संविधानाचे महत्व जाणणे. | | | |
| ५ | **शहरी स्थानिक शासन संस्था**<br>C- ८.३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रिस्तरीय कार्याचे स्पष्टीकरण देतो आणि तळागाळातील स्तरापर्यंत लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी त्याचे महत्व सांगून प्रशंसा करतो, प्रोत्साहन देतो. | १. नगरपंचायतीची रचना सांगतो.<br>२. नगरपंचायतीची आरोग्यविषयक व शिक्षणविषयक कार्ये सांगतो. | ११२, ११९, १२०<br>११३ |
| | | ३. नगरपरिषदेची रचना सांगतो.<br>अ) नगराध्यक्ष निवड प्रक्रिया सांगतो.<br>४. नगरपरिषदेची कामे सांगतो.<br>अ) नगरपरिषदेची आवश्यक कामे सांगतो.<br>ब) नगरपरिषदेची ऐच्छिक कामे सांगतो.<br>५. नगरपरिषद उत्पन्नाचे स्रोत सांगतो. | ११२, ११३,११४, ११९<br>११४<br>११३, ११४, ११९<br>११३, ११४<br>११४<br>११५ |
| | | ६. महानगरपालिकेची रचना सांगतो.<br>अ) महानगरपालिकेची कार्ये सांगतो.<br>ब) महानगरपालिकेच्या विविध विषय समित्यांची माहिती सांगतो.<br>क) महानगरपालिकेची प्रशासन व्यवस्था सांगतो.<br>ड) महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत सांगतो. | ११५, ११६, ११९<br>११६, ११९, १२०<br>११६, ११७<br>११६, १२०<br>११७ |
| | | ७. कटक मंडळाचा अर्थ सांगतो.<br>अ) कटक मंडळाची रचना सांगतो.<br>ब) कटक मंडळाची वैशिष्ट्ये सांगतो.<br>क) कटक मंडळाचे कार्य सांगतो. | ११७<br>११८<br>११८<br>११८,११९ |
| अभ्यासक्रम ध्येय : CG-८ भारतीय संविधानाच्या विकासाची प्रक्रिया समजून घेऊन भारतीय समाजात लोकशाही मूल्ये रुजविण्यासाठी संविधानाचे महत्व जाणणे. | | | |
| ६ | **जिल्हा प्रशासन**<br>C- ८.३ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रिस्तरीय कार्याचे स्पष्टीकरण देतो आणि तळागाळातील स्तरापर्यंत लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी त्याचे महत्व सांगून प्रशंसा करतो, प्रोत्साहन देतो. | १. जिल्हा प्रशासनातील विविध विभागांची नावे सांगतो. | १२१ |
| | | २. जिल्हा महसूल प्रशासनाची रचना स्पष्ट करतो.<br>अ) जिल्हा महसूल प्रशासनाच्या कार्याचे वर्णन करतो.<br>ब) जिल्हा महसूल प्रशासनाच्या अधिकारासंदर्भात माहिती सांगतो. | १२१,१२२<br>१२२,१२६, १२७<br>१२१,१२२,१२३,१२६ |
| | | ३. जिल्हा पोलिस प्रशासनाची रचना स्पष्ट करतो.<br>अ) जिल्हा पोलिस प्रशासनाच्या कार्याचे वर्णन करतो. | १२४<br>१२४,१२७ |
| | | ४. जिल्हा न्याय प्रशासनाची रचना स्पष्ट करतो.<br>अ) जिल्हा न्याय प्रशासनाची कार्ये सांगतो. | १२५,१२६<br>१२५,१२६,१२७ |

**टीप :** पाठ्यपुस्तकात वापरण्यात आलेले नकाशे हे शैक्षणिक उद्देशासाठी तयार करण्यात आलेले आहेत. यांचा राजकीय व भौगोलिक प्रमाणासाठी उपयोग ग्राह्य धरण्यात येऊ नये. नकाशे तयार करताना ते जास्तीत जास्त अचूक करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. तथापि काही त्रुटी असल्यास त्या तांत्रिक मर्यादेमुळे असू शकतील.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आपले समाजजीवन | ८७ |
| २ | भारतीय संविधान | ९४ |
| ३ | भारतीय संविधानाची प्रास्ताविका आणि वैशिष्ट्ये | १०० |
| ४ | स्थानिक शासन संस्था (ग्रामीण) | १०४ |
| ५ | स्थानिक शासन संस्था (शहरी) | ११२ |
| ६ | जिल्हा प्रशासन | १२१ |



# १ आपले समाजजीवन

| | |
|---|---|
| १.१. समाज : अर्थ व गरज | १.३ सामाजिक विविधता |
| १.२ सामाजिक संस्था व कार्य | १.४ सांस्कृतिक विविधता |

मानवाची उत्क्रांती कशी झाली हे तुम्ही यापूर्वी शिकला आहात. आजचे आपले सामाजिक जीवन हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून आकारास आले आहे. माणसाने भटक्या अवस्थेतून स्थिर समाजजीवनाकडे वाटचाल केली आहे.

## १.१ समाज : अर्थ व गरज

केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे, तर समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणाऱ्या संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज होय. समाजात वृद्ध, प्रौढ, तरुण, लहान मुले-मुली अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश असतो.


### १.१.१ मानवाला समाजाची गरज का वाटली ?

भटक्या अवस्थेतील मानवाला स्थैर्य व सुरक्षितता नव्हती. आपल्या शारीरिक व भावनिक गरजा पूर्ण करण्याकरिता तो एकत्र आला. तो एकत्रितपणे प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीचा अधिक सक्षमपणे सामना करू लागला. अन्न व निवारा मिळवण्याकरिता मानव एकत्रितपणे कष्ट करू लागला. समूहातील सर्वांनी कष्ट घेतले, तर सर्वांचेच जगणे सुकर होते हे मानवाला समजले. यातूनच मानवी समाजाच्या निर्मितीची सुरुवात झाली.


### १.१.२ मानवातील समाजशीलता

मानव स्वभावत:च समाजाचा भाग असण्यात आनंद मानणारा समाजशील प्राणी आहे. आपणा सर्वांना एकमेकांसह राहायला आवडते. मानव केवळ सुरक्षिततेसाठी किंवा आपल्या शारीरिक व भौतिक गरजा भागवण्याकरिता समाजात राहत नाही, तर तो आपल्या सर्वांगीण विकासासाठी समाजात राहतो. आपल्याला आनंद झाला, तर तो कोणाला तरी सांगावा असे वाटते. आपल्याला दु:ख झाले, तर ते कोणीतरी समजून घ्यावे असे आपल्याला वाटते. आपल्याला नव्या कल्पना सुचल्या, तर त्या प्रियजनांना सांगाव्याशा वाटतात. अशा प्रकारच्या भावनिक व बौद्धिक देवाणघेवाणीतून आपली समाजशीलता दिसून येते.

**खालील पहिली तीन चित्रे पाहून शेवटच्या चित्रात दिलेल्या प्रश्नाचे उत्तर शोधा.**




**समाजशीलता :** समाजशीलता म्हणजे व्यक्तींची इतर लोकांशी सहजपणे, सुसंवादाने व सहकार्याने वागण्याची क्षमता होय.




समाजशीलतेतून बालकाचा विकास

## १.१.३ कुटुंबसंस्थेचा विकास

संयुक्त कुटुंब



विभक्त कुटुंब



संयुक्त कुटुंब → आजी-आजोबा → आई-वडील → मुले; आजी-आजोबा → काका-काकू → मुले

विभक्त कुटुंब → आई-वडील → मुले

मानवाच्या सुरुवातीच्या काळात 'कुटुंब' ही संकल्पना आजच्यासारखी स्पष्ट नव्हती. मानव टोळ्यांनी राहत असे. निसर्गातील संकटांपासून संरक्षण मिळवण्यासाठी लोक एकत्र राहू लागल्यामुळे त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

अन्नाची गरज भागवण्यासाठी मानवाने शेती करायला सुरुवात केली, यातूनच त्याचे जीवन स्थिर झाले. शेतीसाठी मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने 'कुटुंबपद्धती' अस्तित्वात आली.



**चला, करू या.**

तुमच्या कुटुंबाचा तक्ता तयार करून कुटुंबातील कामांची विभागणी दाखवा. तुम्ही स्वत: घरातील कोणकोणती कामे करता याची यादी तयार करा.




## १.१.४ समाजातील कामांची विभागणी

समाजातील विविध घटकांच्या विशिष्ट रूढी व परंपरेनुसार नियम व कायदे अस्तित्वात येतात. समूहातील सर्वांना सर्व कामे करणे शक्य नव्हते. त्यामुळे, समूहात कामांच्या विभागणीची सुरुवात झाली आणि त्यातून समाज निर्माण झाला. त्यानंतर समाजातील व्यवहार सुरळीत चालण्यासाठी नियम तयार होत गेले.

**कुटुंब** : ज्या व्यक्ती रक्तसंबंध, विवाह किंवा दत्तकसंबंध यांमुळे एकत्रित समूहात राहतात व एकमेकांची काळजी घेतात, त्या समूहाला कुटुंब म्हणतात.

**छोटे कुटुंब** : कुटुंबातील सदस्यांची संख्या ४ किंवा ४ पेक्षा कमी असते. ते छोटे कुटुंब किंवा विभक्त कुटुंब होय. (उदा. आई, वडील, भाऊ, बहीण)

**मोठे कुटुंब** : ज्या कुटुंबात आई-वडील-मुले यांच्यासह आजी-आजोबा, काका-काकू व त्यांची मुले एकत्र राहतात, त्या कुटुंबाला मोठे किंवा संयुक्त कुटुंब म्हणतात.

## १.२ सामाजिक संस्था व कार्य




कुटुंब, शाळा, महाविद्यालय, धार्मिक संघटना इत्यादी सामाजिक संस्था म्हणून ओळखल्या जातात. त्यांचे मुख्य कार्य म्हणजे मूलभूत सामाजिक गरजांची पूर्तता करणे. समाजाला चांगल्या मूल्यांची शिकवण व भावनिक आधाराबरोबरच समाजात शिस्त राखणे हे सामाजिक संस्थांचे प्रमुख कार्य आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे स्वतंत्र विचार करण्याची क्षमता असते. ही विचार करण्याची क्षमता विकसित होण्यात त्यांच्या कुटुंबीयांचा, शेजाऱ्यांचा, नातेवाईकांचा, मित्र-मैत्रिणींचा, शिक्षकांचा महत्त्वाचा वाटा असतो. त्याचप्रमाणे रेडिओ, वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी (टी.व्ही.), चित्रपट, नाटके, इंटरनेट, सामाजिक संघटना, धार्मिक संस्था इत्यादी माध्यमांतून प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व व विचार विकसित होत असतात. स्वतंत्र विचार करण्याच्या क्षमतेतून व्यक्ती-व्यक्तींच्या वेगवेगळ्या आवडी-निवडी निर्माण होतात.

एकाच गावातील किंवा शहराच्या एका भागातील समाजात राहणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे कलागुण व कौशल्ये विकसित होतात. या कलागुणांच्या व कौशल्यांच्या आधारे एकाच शाळेतील विद्यार्थी भविष्यात वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत होतात.

### शाळा : एक महत्त्वाची सामाजिक संस्था

समाजाने निर्माण केलेली एक मूलभूत सामाजिक संस्था म्हणजे शाळा होय. शिस्त, सहकार्य, विविध घटकांची व विषयांची ओळख, कलागुणांचे संगोपन, सांघिक भावना इत्यादी बाबी शाळेच्या माध्यमांतून आपण शिकतो. व्यक्तिगत जीवन व सामाजिक गरजा यांमधील महत्त्वाचा दुवा म्हणजे शाळा होय.



**चला, करू या.**

१) तुमच्या मित्र-मैत्रिणींना कोणकोणत्या कलागुणांची आवड आहे याची यादी तयार करा.
२) तुमच्या मित्र-मैत्रिणींना मोठे झाल्यावर काय व्हायला आवडेल याबाबत त्यांच्याशी चर्चा करून तक्ता तयार करा.

### १.२.१ समाजातील परस्परावलंबन

प्रथम अन्न व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा होत्या. कुटुंबात राहणाऱ्या मानवाला वस्त्रांची गरज वाटू लागली. अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याकरिता स्थायी व्यवस्था उभारण्याची जबाबदारी समाजाची असते. उदाहरणार्थ,

१) अन्नाची पूर्तता करण्यासाठी शेती करणे.
२) शेती करण्यासाठी अवजारे व पशू उपलब्ध करणे.
३) बी-बियाणे उपलब्ध करणे.

**समाज** : विशिष्ट प्रदेशात राहणारा, स्वत:ची आचारपद्धती असलेला व जीवनविषयक दृष्टीकोन असलेला मानवी समूहांचा समुच्चय म्हणजे समाज होय.

**सामाजिक संस्था** : ✻ मूलभूत सामाजिक कार्यांच्या पूर्तीसाठी माणसांच्या आचरणांचे संघटित रूप म्हणजे सामाजिक संस्था होय. ✻ विवाहसंस्था, जातिसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था ही सामाजिक संस्थांची काही उदाहरणे होत.

**समाजाचे घटक** : व्यक्ती, कुटुंब, समूह, संस्कृती, सामाजिक नियम व मूल्ये, सामाजिक संबंध, सामाजिक संस्था हे सर्व समाजाचे घटक आहेत.

४) शेतीमालावर प्रक्रियेचे उद्योग निर्माण करणे.

५) या सर्व बाबींची पूर्तता होण्याकरिता आर्थिक सोयी (जसे की, पतपेढी किंवा बँकेकडून कर्ज) उपलब्ध करणे.

अशा प्रकारची परिपूर्ण व्यवस्था समाजात उभी करावी लागते. समाजातील व्यक्तींच्या बौद्धिकतेतून शिक्षण, आरोग्य अशा सेवा-सुविधांची निर्मिती होते. समाजातील व्यक्तींच्या कला-गुणांमधून सांस्कृतिक संपन्नता येते आणि मनोरंजनाची साधने तयार होतात. समाजातील व्यक्तींच्या व्यापार कौशल्यातून व उद्यमशीलतेतून उद्योगधंद्यांची वाढ होते. भौतिक, मानसिक व भावनिक गरजांच्या पूर्ततेकरिता समाजातील सर्व माणसे एकमेकांवर अवलंबून असतात. यालाच ‘समाजातील व्यक्तींचे परस्परावलंबन’ असे म्हणतात.




## १.३. सामाजिक विविधता

भारतीय समाजात अनेक भाषा, संस्कृती, खाद्य पदार्थ, धर्म, चालीरिती व परंपरा आहेत. भारताची भौगोलिक विविधतादेखील उल्लेखनीय आहे. भौगोलिक वैविध्याचा परिणाम सांस्कृतिक वैविध्य निर्माण होण्यात होत असतो. ही विविधता भारताचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे आणि भारताची खरी ताकद आहे.

### १.३.१ धार्मिक विविधता

भारतात हिंदू, इस्लाम, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, शीख आणि पारसी अशा अनेक धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणे सण-उत्सव साजरे करण्याचे स्वातंत्र्य आहे. यामुळे समाजात एकोपा निर्माण होतो.

### १.३.२ भाषिक विविधता

समाजामुळे प्रत्येक व्यक्तीमध्ये विशिष्ट गुण व क्षमता यांचा विकास होतो. परस्परांशी बोलण्याकरिता आपण भाषा शिकतो. ती भाषा आपल्याला जन्मत: अवगत नसते. आपण ती आपल्या घरात, शेजारी व शाळेत शिकतो. शाळेमध्ये तर निरनिराळ्या भाषा शिकण्याची आपणांस संधी मिळते.

मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती, कन्नड, तेलुगू, तमिळ, बंगाली, सिंधी अशा अनेक भाषा बोलणारे लोक आपल्या आजूबाजूला असतात. तसेच अहिराणी, कोंकणी, वऱ्हाडी यांसारख्या बोली भाषांमुळे आणि गोंडी, भिल्ल, संथाली यांसारख्या आदिवासी बोली भाषांमुळे भाषिक वारसा समृद्ध होतो.

**समाजातील परस्परावलंबन** : समाजातील व्यक्ती एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी परस्परावर अवलंबून असतात. या स्थितीस समाजातील परस्परावलंबन म्हणतात.

**सामाजिक विविधता** : सामाजिक विविधता म्हणजे समाजात आढळणारी भाषा, धर्म, जात, संस्कृती, परंपरा, वेशभूषा, विचारधारा इत्यादींमधील भिन्नता होय.

**धार्मिक विविधता** : एका समाजात अथवा देशात विविध धर्मांचे लोक एकत्र नांदणे म्हणजे धार्मिक विविधता होय.

विनामूल्य वितरणासाठी



**सांगा पाहू!**

तुमच्या परिसरात कोणकोणत्या भाषा बोलल्या जातात ?

## १.४ सांस्कृतिक विविधता

मानवी समाजजीवनाचा विकास हा कला, भाषा, वेशभूषा, खाद्य, परंपरा, खेळ इत्यादी घटकांच्या आंतरक्रियेतून झाला आहे. भारत सांस्कृतिक वैविध्याने संपन्न असा देश आहे. प्रत्येक प्रदेशाचे सण, उत्सव, गीते आणि चालीरिती इत्यादी भिन्न आहेत, परंतु या विविधतेमागील प्रेरणा आणि आस्था एकच असल्याने संपूर्ण देश एकतेच्या सूत्रात बांधलेला आहे.



**शोधा पाहू.**

महाराष्ट्रात जानेवारी महिन्यात मकर-संक्रांतीचा सण साजरा होतो. त्याचप्रमाणे, विविध प्रदेशांमध्ये जानेवारी महिन्यात सूर्याचे संक्रमण साजरे करणारे सण कोणत्या नावांनी ओळखले जातात?

### १.४.१ खाद्य विविधता

भौगोलिक परिस्थितीनुसार शेतीतील उत्पादने बदलतात आणि त्यानुसार दैनंदिन आहारसुद्धा प्रदेशानुसार बदलतो. महाराष्ट्रात चवीने खाण्यात येणारी पिठलं-भाकरी इतर प्रदेशांमध्ये अपवादानेच आढळते.

- **तेल:** भारताच्या दक्षिणेत नारळ तेल, उत्तरेत मोहरी तेल, तर पश्चिमेत शेंगदाणा तेल वापरले जाते.
- **मुख्य अन्न:** भारताच्या दक्षिण भागात, किनारपट्टी भागात व तलावांची संख्या जास्त असलेल्या भागात 'भात', तर उत्तर व मध्य भारतात 'गहू, बाजरी, ज्वारी व मका' हे मुख्य अन्न आहे.
- **एकता:** इडली-डोसा आणि सामोसा-पराठा यांसारखे पदार्थ आज देशभर लोकप्रिय आहेत, जे 'विविधतेत एकता' दर्शवतात.



**शोधा पाहू.**


देशाच्या विविध प्रदेशांमध्ये लोकप्रिय असलेल्या मिष्टान्नांची यादी तयार करा.
(उदाहरणार्थ, महाराष्ट्र – पुरणपोळी)



भारतातील खाद्य विविधता

**भाषिक विविधता** : भाषिक विविधता म्हणजे एका देशात, राज्यात किंवा समाजात वेगवेगळ्या भाषा, बोली आणि लिपींचे अस्तित्व असणे.

**सांस्कृतिक विविधता** : वेगवेगळ्या भाषा, धर्म, परंपरा, चालीरिती, सण-उत्सव आणि जीवनपद्धती असणे म्हणजे सांस्कृतिक विविधता होय.






**शोधा पाहू.**

| राज्य | भाषा | नृत्यप्रकार | खेळ |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | मराठी | लावणी | कबड्डी |
| गुजरात | | | |
| राजस्थान | | | |
| पंजाब | | | |
| हरियाणा | | | |
| उत्तर प्रदेश | | | |
| पश्चिम बंगाल | | | |
| ओडिशा | | | |
| आसाम | | | |
| कर्नाटक | | | |
| मध्यप्रदेश | | | |
| केरळ | | | |
| तमिळनाडू | | | |
| छत्तीसगड | | | |

### १.४.२ विविधता ही भारताची ओळख व ताकद

भारतीय समाजात भाषा, धर्म, संस्कृती, खाद्यपदार्थ यांमध्ये विविधता आढळते. ही विविधता भारताची खरी 'ताकद' आणि 'वैशिष्ट्य' आहे. विविध समाजांतील सामंजस्य आणि एकमेकांच्या परंपरा व चालीरीती यांचा आदर केल्यामुळे विशाल भौगोलिकता व प्रचंड लोकसंख्या असूनदेखील आपल्याला सर्वत्र भारतीयत्वाची प्रचिती येत असते. परस्परांच्या जीवनपद्धतींना व संस्कृतींना समजून घेतल्याने सर्वच जीवनपद्धती व संस्कृती अधिक संपन्न झाल्या आहेत. वेगवेगळ्या भाषा या एकमेकांच्या संपर्कातून अधिक समृद्ध झाल्या आहेत. परस्परांप्रतिच्या सहिष्णु भावनेतून सामाजिक एकोपा निर्माण होतो. वेळोवेळी समाजावर आलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात या सामाजिक एकोप्याच्या भावनेने एकमेकांना मदतीचा हात दिला जातो. भारताच्या विविधतेला सामावून घेणाऱ्या लोकशाही पद्धतीचा सर्वांनी केलेला स्वीकार हे भारताच्या विविधतेतील एकता दर्शवते.



# स्वाध्याय

**प्र.१ ओळखा आणि लिहा.**

१. अन्नाची गरज भागवण्यासाठी मानवाने हा व्यवसाय सुरू केला -----------

२. रक्तसंबंध, विवाह किंवा दत्तकसंबंध यांमुळे व्यक्ती एकत्र राहतात व एकमेकांची काळजी घेतात ती सामाजिक संस्था -----------

३. भारताच्या दक्षिण किनारपट्टीवरील मुख्य अन्न -----------

**प्र.२ यादी करा.**

तुम्हांला माहिती असणाऱ्या किमान पाच भाषांची यादी तयार करा.

**प्र.३ पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१. समाज

२. कुटुंबसंस्था

**प्र.४ समाजाला नीतिनियम, कायदे यांची आवश्यकता का असते हे तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र.५ संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.६ चला, स्वतःच पडताळणी करून पाहू.**

तुम्ही 'आदर्श नागरिक' आहात का ?
खालील प्रश्नांपुढे (✓) किंवा (✗) अशी खूण करा.

१. मी कचरा कचराकुंडीतच टाकतो. [ ]

२. मी रांगेत उभा राहतो, धक्काबुक्की करत नाही. [ ]

३. मी पाणी वाया घालवत नाही. [ ]

४. मी शेजाऱ्यांना व ज्येष्ठ नागरिकांना मदत करतो. [ ]

५. मी सार्वजनिक बागेतील फुले तोडत नाही. [ ]

**उपक्रम :**

- भारतातील घटकराज्यनिहाय खाद्यपदार्थ, सण-उत्सव व नृत्य यांची विविधता दाखवणारा तक्ता बनवा व वर्गात लावा.
- भारताच्या नकाशात सर्व राज्ये वेगवेगळ्या रंगांत रंगवा आणि तेथे प्रसिद्ध असलेल्या एका गोष्टीचे नाव लिहा.
- 'शाळा' ही सर्वांसाठी एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. हे स्पष्ट करणारा चित्रतक्ता शिक्षकांच्या मदतीने तयार करा.

***



# २ भारतीय संविधान

२.१. संविधानाचा अर्थ, गरज व महत्त्व
२.२ भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया
२.३ संविधान सभेचे कामकाज

**समता :** तुला माहीत आहे का? स्वातंत्र्यदिन आणि गणराज्यदिन हे आपले राष्ट्रीय सण आहेत.

**अमन :** हो, स्वातंत्र्यदिनाला, म्हणजे १५ ऑगस्टला आणि गणराज्य दिनाला, म्हणजे २६ जानेवारीला आपल्या शाळेत ध्वजारोहण होते तसेच विविध कार्यक्रमदेखील होतात. या दोन्ही दिवशी किती उत्साहाचे व आनंदाचे वातावरण असते!

**मेरी :** १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. आपण ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त झालो. म्हणून, दरवर्षी आपण १५ ऑगस्टला स्वातंत्र्यदिन साजरा करतो.

**समता :** पण, गणराज्यदिन म्हणजे नक्की काय रे?

**अमन :** २६ जानेवारी १९५० रोजी भारताने आपल्या देशाचा कारभार चालवण्याकरिता तयार केलेले संविधान लागू झाले. म्हणून दरवर्षी आपण २६ जानेवारीला गणराज्यदिन साजरा करतो.

**मेरी :** पण या दिवसाला गणराज्यदिन का म्हणतात? संविधान म्हणजे तरी काय असते? ते कोणी बनवले आणि संविधानाची गरज का असते? २६ जानेवारी १९५० या दिवशीच संविधान का लागू झाले?

भारतीय संविधानाबद्दल मेरीला पडलेले प्रश्न व जिज्ञासा आपल्या मनातसुद्धा असेलच. चला तर आपण या घटकाच्या माध्यमातून जाणून घेऊ या.

मागील घटकात आपण समाजाबद्दल अभ्यास केला. समाजातील विविध घटक गुण्यागोविंदाने एकत्रित राहावेत आणि सर्वांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध असाव्यात याकरिता कायद्यांची व नियमांची गरज असते. समाजाच्या संचलनाकरिता बहुतेक सर्व देशांनी आपापल्या ‘संविधानाची’ निर्मिती केलेली आहे. आपल्या भारत देशाचा राज्यकारभार आपल्या संविधानाप्रमाणे चालतो.



**विचार करा.**

मैदानावर खेळला गेलेला क्रिकेटचा सामना व रस्त्यावर खेळला गेलेला क्रिकेटचा सामना यांमध्ये काय फरक आहे, हे खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारावर सांगून या मुद्द्यांचे काय महत्त्व असते ते सांगा.

(१) नियम (२) सीमारेषा
(३) सुरक्षितता (४) पंच

क्रिकेट मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात संघटितपणा, औपचारिकता, लिखित नियम पाळले जातात, परंतु रस्त्यावर खेळल्या जाणाऱ्या सामन्यात लिखित नियम नसतात, संघटितपणा नसतो व अधिकृत पंचही नसतात. अशाच पद्धतीने देश व्यवस्थित चालवायचा असेल, तर राज्यघटना आवश्यक आहे. राज्यघटना नसेल, तर देशाचा कारभार व्यवस्थित चालणार नाही.



## २.१ संविधानाचा अर्थ, गरज व महत्त्व

कोणत्याही देशाच्या सुव्यवस्थित कारभारासाठी आणि नागरिकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी संविधान अत्यंत आवश्यक असते. देशाच्या राज्यकारभारासाठी तयार करण्यात आलेले मूलभूत कायदे, नियम व तरतुदी यांस एकत्रितपणे ‘संविधान’ असे म्हणतात. संविधानास ‘राज्यघटना’ असेही म्हणतात.

**संविधानाची गरज का असते, याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.**

**१. नियमांची चौकट आणि सुव्यवस्था :** संविधान हे देशातील कायद्यांचे सर्वोच्च स्रोत आहे. समाजात विविध जातींचे, धर्मांचे आणि विचारांचे लोक एकत्र राहतात. त्यांच्यामध्ये समन्वय राखण्यासाठी आणि देश कशा प्रकारे चालवला जावा, यासाठी काही मूलभूत नियमांची आवश्यकता असते व संविधान ही नियमावली प्रदान करते.

**२. शासनाच्या अधिकारांवर मर्यादा :** जर संविधान नसेल, तर सरकार सत्तेचा दुरूपयोग करू शकते. संविधान सरकारचे अधिकार स्पष्ट करते आणि त्यावर मर्यादा घालते.

**३. नागरिकांच्या हक्कांचे रक्षण :** संविधान नागरिकांना काही मूलभूत हक्क प्रदान करते व त्याचे रक्षण करते. (जसे की– अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य)

**४. सत्तेचे विभाजन :** संविधानामुळे राज्यकारभाराचे तीन महत्त्वाच्या घटकांत विभाजन होते.

- **कायदेमंडळ :** कायदे तयार करणाऱ्या घटकास ‘कायदेमंडळ’ म्हणतात.
- **कार्यकारीमंडळ :** कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या घटकास ‘कार्यकारीमंडळ’ म्हणतात.
- **न्यायमंडळ :** कायद्याचा अर्थ लावणे आणि न्याय देणाऱ्या घटकास ‘न्यायमंडळ’ म्हणतात.

**५. अल्पसंख्याकांचे हितरक्षण :** लोकशाहीत बहुमताचा आदर केला जातो, पण संविधानामुळे बहुसंख्याक गट अल्पसंख्याकांवर अन्याय करू शकत नाहीत. त्यांची भाषा, संस्कृती आणि शैक्षणिक हक्क यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाची असते.

**६. देशाची उद्दिष्टे आणि मूल्ये स्पष्ट करणे :** देशाला कोणत्या दिशेने न्यायचे आहे, हे संविधानातील ‘उद्देशिकेवरून’ स्पष्ट होते. उदाहरणार्थ, भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही उद्दिष्टे स्वीकारली आहेत.

संविधान हा देशाचा ‘आत्मा’ आहे, जो भारतासारख्या देशात लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम करतो.



**करून पहा.**

आपल्या वर्गात शांतता व शिस्त राहावी यासाठी नियमावली तयार करा.

### २.१.१ संविधानाचे प्रकार

साधारणत: संविधानाचे लिखित व अलिखित असे दोन प्रकार आहेत.

**लिखित :** देशाचा राज्यकारभार चालवण्यासाठी आवश्यक असणारे सर्व मूलभूत नियम, कायदे आणि तत्त्वे जेव्हा एकाच किंवा काही ठरावीक लिखित दस्तऐवजांमध्ये पद्धतशीरपणे संकलित केलेले असतात, त्याला ‘लिखित संविधान’ असे म्हणतात. उदा. भारत, अमेरिका.

**अलिखित :** ज्या देशाचा राज्यकारभार चालवण्यासाठी लागणारे नियम कोणत्याही एका विशिष्ट काळात, एका विशिष्ट घटना समितीने एकत्र बसून लिहिलेले नसतात, त्याला ‘अलिखित संविधान’ असे म्हणतात. उदा. ब्रिटन (युनायटेड किंगडम)



**चला, शोधू या व चर्चा करू या.**

लिखित संविधान व अलिखित संविधान कोणकोणत्या देशांत आहे ते आंतरजालाच्या साहाय्याने शोधा आणि वर्गात चर्चा करा.

## २.२ भारतीय संविधान निर्मितीची प्रक्रिया

भारताची भौगोलिक विशालता, मोठी लोकसंख्या आणि सांस्कृतिक विविधता लक्षात घेतली, तर संविधानाशिवाय देशाचा कारभार चालवणे कठीण

बाब आहे. देशात लोकशाही व्यवस्था रुजवण्यासाठी संविधान आवश्यक आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित झाल्यानंतर सन १९४६ मध्ये संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली. यासाठी संविधान सभा स्थापन करण्यात आली.

'स्वतंत्र भारताचा राज्यकारभार ब्रिटिशांनी तयार केलेल्या कायद्यांनुसार नव्हे, तर तो भारतीयांनी स्वत: तयार केलेल्या कायद्यांनुसार चालेल', असा स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांचा आग्रह होता.




**माहीत आहे का तुम्हांला ?**

देशातील विविध प्रांतांचा (त्या वेळी मुंबई प्रांत, बंगाल प्रांत, मद्रास प्रांत असे विभाग होते.) कारभार चालवण्याकरिता सन १९४६ मध्ये लोकप्रतिनिधींची निवड करण्यात आली होती. प्रत्येक प्रांतातील लोकप्रतिनिधींनी त्यांच्यातून काही प्रतिनिधी संविधान सभेच्या कार्यात सहभागी होण्यासाठी निवडले होते. याव्यतिरिक्त, त्या काळी देशात विविध राजांची संस्थाने होती. या संस्थानिकांनी संविधान सभेच्या कार्यात सहभागी होण्याकरिता त्यांचे प्रतिनिधी पाठवले होते. असे प्रांतांचे व संस्थानांचे एकूण २९९ सदस्य संविधान सभेत होते. त्यांत काही महिला सदस्यही होत्या.

**जाणून घेऊ या.**

संविधान सभेचे सदस्य दोन प्रकारचे होते.

१. प्रांतांच्या विधिमंडळातून निवडून आलेल्या सदस्यांची संख्या – २२९

२. संस्थानिकांनी नेमलेल्या सदस्यांची संख्या – ७०


**शोधा पाहू.**

सन १९२८ मध्ये ॲमस्टरडॅम येथे झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताच्या हॉकी संघाने भारताला पहिले ऑलिंपिक सुवर्णपदक जिंकून दिले होते. या हॉकी संघाचा कर्णधार पुढे भारताच्या संविधान सभेचा सदस्य झाला. त्यांचे नाव काय ते शोधा.

### २.३ संविधान सभेचे कामकाज

स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी संविधान सभेची स्थापना करण्यात आली. संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची सभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून निवड झाली. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे कायमस्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड झाली.


डॉ. सच्चिदानंद सिन्हा


डॉ. राजेंद्र प्रसाद

बी.एन. राव यांची संविधान सभेचे कायदा सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

संविधान सभेच्या कामकाजात सुसूत्रता आणण्याकरिता एकूण २२ समित्या तयार करण्यात आल्या होत्या.

### संविधान सभेतील महत्त्वपूर्ण समित्या

| समितीचे नाव | समिती प्रमुख |
|---|---|
| घटना सभा नियम समिती (सुकाणू समिती) | डॉ. राजेंद्र प्रसाद |
| मसुदा समिती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| संघराज्य समिती | पं. जवाहरलाल नेहरू |
| मूलभूत हक्क व अल्पसंख्याक समिती | सरदार वल्लभभाई पटेल |

या व इतर सर्व समित्यांनी सादर केलेल्या अहवालांचा एकत्रित विचार करत संविधानाचे प्रारूप तयार करण्याकरिता मसुदा समिती स्थापन करण्यात आली.

## २.३.१ मसुदा समिती

मसुदा समिती ही भारतीय संविधानाची निर्मिती करणारी सर्वांत महत्त्वाची समिती होती. या समितीची स्थापना २९ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. मसुदा समितीने विविध समित्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालांचे पुनरावलोकन करून, संविधानाला अंतिम स्वरूप देणारा एक वास्तविक मसुदा तयार केला. या समितीने तयार केलेला अंतिम मसुदा **२६ नोव्हेंबर १९४९** रोजी संविधान सभेने स्वीकारला.

**मसुदा समितीचे सदस्य :**

**मसुदा समितीत अध्यक्षांसह एकूण सात सदस्य होते.**

१. डॉ. बी. आर. आंबेडकर (अध्यक्ष)

२. श्री. एन. गोपालस्वामी अय्यंगार

३. श्री. अल्लादी कृष्णास्वामी अय्यर

४. डॉ. के. एम. मुन्शी

५. श्री. मोहम्मद सादुल्ला

६. श्री. बी. एल. मित्तर (यांच्या राजीनाम्यानंतर श्री. के.एन.माधवराव यांची नियुक्ती झाली.)

७. श्री. डी. पी. खेतान (यांच्या मृत्यूनंतर श्री.टी.टी. कृष्णमाचारी यांची नियुक्ती झाली.)



**माहीत आहे का तुम्हांला ?**

डिसेंबर १९२९ च्या लाहोर अधिवेशनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिशांकडे 'संपूर्ण स्वराज्याची' मागणी केली होती. या ठरावानुसार २६ जानेवारी १९३० हा दिवस संपूर्ण देशात पहिल्यांदा 'स्वातंत्र्यदिन' म्हणून साजरा करण्यात आला होता. भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्यातील याच ऐतिहासिक दिवसाचे महत्त्व आणि आठवण कायम राहावी यासाठी '२६ जानेवारी १९५०' रोजी संविधान लागू करण्यात आले, म्हणूनच हा दिवस 'गणराज्यदिन' म्हणून साजरा केला जातो.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मसुदा समितीतील योगदान



**भारतीय संविधानाचा मसुदा, संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांच्या संविधानांचा तुलनात्मक अभ्यास केला तसेच संविधान सभेच्या सर्व समित्यांच्या अहवालांचा सखोल अभ्यास करून मसुदा तयार केला व संविधान सभेत मांडला.

या मसुद्यातील प्रत्येक तरतुदींवर विस्ताराने चर्चा झाली. चर्चेदरम्यान संविधान सभेच्या सदस्यांच्या

प्रश्नांना व शंकांना उत्तर देण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सक्षमपणे पार पाडली. संविधान सभेच्या सूचनांनुसार संविधानाच्या मसुद्यात फेरबदल करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी पूर्ण केले आणि संविधानाचा अंतिम मसुदा तयार केला. त्यांच्या या अतुलनीय योगदानामुळे त्यांना 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' असे म्हणतात.

| | | |
|---|---|---|
|  विजयालक्ष्मी पंडित |  सरोजिनी नायडू |  अम्मू स्वामीनाथन |
|  रेणुका रे |  ॲनी मॅस्करीन |  सुचेता कृपलानी |
|  दाक्षायनी वेलायुधन |  हंसा मेहता |  बेगम एजाज रसूल |
|  मालती चौधरी |  लीला रॉय |  राजकुमारी अमृत कौर |
|  दुर्गाबाई देशमुख |  पूर्णिमा बॅनर्जी |  कमला चौधरी |

**संविधान सभेतील महिला सदस्य**



### माहीत आहे का तुम्हांला?

१) मसुदा समितीने तयार केलेला संविधानाचा पहिला मसुदा फेब्रुवारी १९४८ मध्ये प्रकाशित करून त्यावर चर्चा करण्यात आली.

२) संविधान सभेत विविध विषयांवर चर्चा झाली. बहुतांश तरतुदींवर एकमताने निर्णय घेण्यात आले.

३) संविधान सभेचे कामकाज २ वर्षे, ११ महिने व १८ दिवस चालले. (९ डिसेंबर १९४६ ते २५ नोव्हेंबर १९४९).

४) संविधान सभेच्या कार्यकाळादरम्यान ५३,००० लोकांनी दर्शक कक्षेत बसून संविधान सभेचे कामकाज प्रत्यक्ष पाहिले.

५) संविधान सभेच्या सदस्यांनी संविधानाच्या प्रतीवर २४ जानेवारी १९५० रोजी स्वाक्षऱ्या केल्या.

६) मूळ संविधानात प्रास्ताविका, २२ प्रकरणे, ३९५ कलमे आणि ८ परिशिष्टे होती.

७) २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने संपूर्ण संविधानाचा स्वीकार केला. यामुळे, २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

८) संविधानाच्या अंमलबजावणीसाठी २६ जानेवारी १९५० हा दिवस निश्चित करण्यात आला. त्यामुळे हा दिवस आपण 'गणराज्यदिन' म्हणून साजरा करतो.

९) संविधानाची निर्मिती झाल्यावर २६ जानेवारी १९५० ते १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होईपर्यंत संविधान सभेने भारताची 'हंगामी संसद' म्हणून काम पाहिले.



**जाणून घेऊ या.**

- मूळ संविधानाचे इंग्रजी हस्तलिखित लिहिणारे – **प्रेम बिहारी नारायण रायजादा**
- मूळ संविधानाचे हिंदी हस्तलिखित लिहिणारे – **वसंत कृष्ण वैद्य**
- दोन्ही प्रतींची सजावट करणारे – **आचार्य नंदलाल बोस**



## स्वाध्याय

**प्र.१ सांगा पाहू.**

१. कायदे तयार करणारे मंडळ

-----------------------------------

२. संविधान सभेचे कायमस्वरूपी अध्यक्ष

-----------------------------------

३. भारतीय संविधानाचे शिल्पकार

-----------------------------------

**प्र.२ पुढील तक्ता पूर्ण करा.**

| समिती प्रमुख | समितीचे नाव |
|---|---|
| ------------ | घटना सभा नियम समिती |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ------------ |
| ------------ | संघराज्य समिती |
| सरदार वल्लभभाई पटेल | ------------ |

**प्र.३ संकल्पना स्पष्ट करा.**

१. संविधान

२. मसुदा समिती

**प्र.४ प्रत्येक देशाला संविधानाची गरज का असते याबाबत तुमचे मत लिहा.**

**प्र.५ तुम्ही काय कराल ?**

'साधारणपणे मुलांनी करायची कामे व मुलींनी करायची कामे यात भेद केला जातो.' संविधानातील समता हे मूल्य समजावून सांगण्यासाठी तुम्ही काय कराल ?

**तुमची कृती**

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**उपक्रम**

१. वर्गप्रमुख (मॉनिटर) निवडण्यासाठी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया राबवा.

२. वहीमध्ये मूलभूत हक्क व त्याच्याशी निगडित तुमचे कर्तव्य यांचा तक्ता तयार करा.

***



# ३ भारतीय संविधानाची प्रास्ताविका व वैशिष्ट्ये


३.१. प्रास्ताविका
३.२ भारतीय संविधानाप्रमाणे राज्याचे स्वरूप
३.३ भारतीय संविधानाची उद्दिष्टे
३.४ भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये




संविधान सभेत उद्दिष्टांचा ठराव मांडताना– पंडित जवाहरलाल नेहरू

१३ डिसेंबर १९४६ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेसमोर '**उद्दिष्टांचा ठराव**' मांडला, पुढे त्यातूनच भारतीय संविधानाची प्रास्ताविका/उद्देशिका विकसित झाली.

## ३.१ प्रास्ताविका

भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेला 'प्रास्ताविका' किंवा 'उद्देशिका' किंवा 'सरनामा' असेही म्हणतात. संविधानाच्या प्रास्ताविकेतून संविधानाची मूल्ये व उद्दिष्टे स्पष्ट होतात, म्हणून प्रास्ताविकेला 'संविधानाचा आत्मा' म्हटले जाते.




**करून पहा.**

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे तुमच्या हस्ताक्षरात लेखन करा.

भारताचे संविधान भारताच्या लोकांनी तयार केलेले आहे आणि स्वेच्छेने स्वीकारलेले आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत भारताला 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य' म्हणून घोषित केले आहे.

## ३.२ भारतीय संविधानाप्रमाणे राज्याचे स्वरूप




**सार्वभौम :** ज्या देशावर कोणत्याही बाह्यशक्तीचे नियंत्रण नसते आणि जो देश स्वतःचे निर्णय घेण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतो, त्या देशास 'सार्वभौम' म्हणतात. भारताला स्वतःचे कायदे करण्याचा आणि परराष्ट्र धोरण ठरवण्याचा सर्वोच्च अधिकार आहे.

**समाजवादी :** देशातील संपत्तीची निर्मिती समाजाने मिळून केलेली असते आणि त्यावर राज्यसंस्थेची मालकी आहे. यालाच 'समाजवादी व्यवस्था' म्हणतात. संपत्तीचे केंद्रीकरण न होता समाजात आर्थिक व सामाजिक विषमता कमी करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

**धर्मनिरपेक्ष :** धर्मनिरपेक्ष म्हणजे राज्याचा (देशाचा) स्वतःचा असा कोणताही अधिकृत धर्म नाही. सर्व धर्मांना समान मानले जाते आणि प्रत्येक नागरिकाला आपापल्या श्रद्धेनुसार धर्माचे पालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते.

**लोकशाही :** लोकशाहीमध्ये सत्तेचे उगमस्थान लोक असतात आणि ते स्वतः आपले प्रतिनिधी निवडून देतात. 'लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले शासन' अशी या व्यवस्थेची ओळख आहे.

**गणराज्य :** गणराज्यमध्ये देशातील सर्व सार्वजनिक पदे (उदा. राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री, महापौर, सरपंच इत्यादी) ही वंशपरंपरेने कोणाकडेही जात नाहीत. ही पदे जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विशिष्ट काळासाठी निवडलेल्या प्रतिनिधीकडे असतात.

## ३.३ भारतीय संविधानाची उद्दिष्टे

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातून पुढे आलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित भारताची निर्मिती करण्याचे उद्दिष्ट संविधानाने स्वीकारले आहे.

**१. न्याय :** कुणावरही जात, धर्म, वंश, लिंग, भाषा यांवर आधारित कोणताही भेदभाव न करता सर्वांना प्रगतीची समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे न्याय होय. यात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाचा समावेश होतो.

**२. स्वातंत्र्य :** नागरिकांवर कोणतेही अयोग्य निर्बंध नसणे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक वातावरण असणे म्हणजे स्वातंत्र्य होय. यामध्ये विचार, अभिव्यक्ती, संचार, संघटन, व्यवसाय, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य अंतर्भूत आहे.

**३. समता :** जात, धर्म, वंश, लिंग, भाषा किंवा जन्मस्थान यांनुसार कोणालाही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ न मानता सर्वांना समान दर्जा देणे म्हणजे समता होय.

**४. बंधुता :** देशातील सर्व नागरिकांमध्ये ऐक्याची व आपलेपणाची भावना असणे म्हणजे बंधुता होय. ही भावना व्यक्तीची प्रतिष्ठा जपते आणि राष्ट्राची एकता मजबूत करते.

## ३.४ भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

भारताच्या संविधानाची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यांमधून संविधानाचे महत्त्व अधोरेखित होते.

### १. सर्वांत मोठे लिखित संविधान

भारताचे संविधान अत्यंत व्यापक, सखोल आणि विस्तृत आहे. जगातील सर्व लिखित संविधानांमध्ये भारताचे संविधान सर्वांत मोठे आहे.

### २. जगातील विविध संविधानांमधून निवडक बाबींचा समावेश

संविधान सभेने जगातील विविध संविधानांचा अभ्यास करत त्या संविधानांमधून भारत देशाकरिता योग्य असलेल्या बाबींचा समावेश संविधानामध्ये केलेला आहे.

### ३. ताठरपणा व लवचीकपणा यांचा संगम

संविधानातील तरतुदींमध्ये सहज बदल करता येणे, त्याला लवचीक संविधान असे म्हणतात. संविधानातील तरतुदींमध्ये बदल करणे खूप अवघड असते, त्याला 'ताठर संविधान' म्हणतात. भारताचे संविधान ताठरपणा व लवचीकपणा यांचा संगम आहे.

### ४. नागरिकांचे मूलभूत हक्क

भारतीय संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी संविधानाने न्यायमंडळावर सोपवली आहे.

### ५. नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

भारतीय संविधानाने मूलभूत हक्कांबरोबर काही मूलभूत कर्तव्ये दिली आहेत. प्रत्येक भारतीयाने मूलभूत कर्तव्यांचे पालन करणे अपेक्षित आहे.

### ६. राज्यसंस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वे

भारतीय संविधानात मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यकारभार करणे अपेक्षित आहे.

### ७. संघराज्यात्मक पद्धती

भारत हा राज्यांचा संघ (Union of States) आहे. संविधानाने देशात संघ (केंद्र) शासनाचे व राज्य शासनाचे अधिकार यांची विभागणी केली आहे. केंद्र स्तरावरील विषयांवर संसद कायदे करू शकते, तर राज्यस्तराच्या विषयांवर राज्य विधिमंडळ कायदे करू शकते.

### ८. संसदीय लोकशाही

संसदीय लोकशाहीत मतदार त्यांचे प्रतिनिधी निवडतात. निवडून आलेल्या प्रतिनिधींमधून देशाचा प्रधानमंत्री निवडला जातो व प्रधानमंत्री त्याचे मंत्रिमंडळ निवडतो.


### ९. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार

वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे, याला 'प्रौढ मताधिकार' म्हणतात.



**माहीत आहे का तुम्हांला?**

**संविधान सभेतील महाराष्ट्रातील काही प्रमुख सदस्य**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| <br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर | <br>डॉ. पंजाबराव देशमुख | <br>श्री. केशवराव जेधे | <br>डॉ. दुर्गाबाई देशमुख | <br>श्री. शंकरराव देव |
| <br>श्री. नरहर गाडगीळ | <br>श्री. बाळासाहेब खर्डेकर | <br>श्री. दादा धर्माधिकारी | <br>श्री. ब्रजलाल बियाणी | <br>श्री. माधव (बापुजी) अणे |



## स्वाध्याय

**प्र.१ आठवा व लिहा.**

१. मी संविधानाची सुरुवात आहे. मला संविधानाचा आत्मा म्हणतात, मी कोण ?

------------------------------------

२. मी एक ग्रंथ आहे, ज्यात देश चालवण्याचे नियम व कायदे आहेत, मी कोण ?

------------------------------------

**प्र.२ जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. स्वातंत्र्य | (अ) 'मी' आणि 'इतरांमध्ये' भेदभाव न मानणे. |
| २. समता | (ब) आपण सर्व भारतीय एक आहोत अशी भावना. |
| ३. बंधुता | (क) स्वतःचा विकास करण्यासाठी पोषक वातावरण मिळणे. |
| | (ड) कोणतीही कृती अनिर्बंधपणे करणे. |

**प्र.३ 'तराजूचा तोल सांभाळा'.**

**संकल्पना:** संविधानाने एका पारड्यात 'हक्क' दिले आहेत आणि दुसऱ्या पारड्यात 'कर्तव्ये' दिली आहेत.

प्रश्न : खालील प्रसंगात 'तोल' कसा सांभाळाल ?

१. हक्क : मला 'सार्वजनिक बागेत खेळण्याचा हक्क' आहे.

पण माझे कर्तव्य काय ?

------------------------------------------

------------------------------------------

२. हक्क : मला 'सार्वजनिक वस्तू (उदा. परिवहन मंडळाची बस) वापरण्याचा हक्क' आहे.

पण माझे कर्तव्य काय ?

------------------------------------------

------------------------------------------

**प्र.४ संकल्पना स्पष्ट करा.**

१. धर्मनिरपेक्ष

२. लोकशाही

**प्र.५ पुढील १० वर्षांत तुमच्या स्वप्नातील भारत कसा असेल ? याबद्दल तुमचे मत लिहा.**

**उपक्रम**

- शाळेच्या ग्रंथालयातून संविधानाची प्रत मिळवा व त्यातून नागरिकांची मूलभूत कर्तव्ये शोधा आणि लिहा.
- 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य' या शब्दांवरून भारतीय संविधानाची घोषवाक्ये तयार करा आणि वर्गात लावा.


***

# ४ स्थानिक शासनसंस्था (ग्रामीण)



४.१. ग्रामीण स्थानिक शासन संस्थेची रचना
४.२ ग्रामपंचायत
४.३ पंचायत समिती
४.४ जिल्हा परिषद

**‘खरा भारत गावांमध्ये वसलेला आहे’. – महात्मा गांधी**




ग्रामीण तसेच शहरी भागांतील स्थानिक शासनसंस्थांना ‘पंचायतराज’ असे म्हणतात. गाव, तालुका व जिल्हा पातळीवरील शासन संस्था स्थानिक लोकप्रतिनिधींच्या हातात असावी म्हणून पंचायतराज व्यवस्था निर्माण केली. त्यानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना करण्यात आली. यामुळे लोकशाहीचे विकेंद्रीकरण झाले. स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींच्या हाती जास्तीतजास्त सत्ता देण्यात आली.



**माहीत आहे का तुम्हांला?**

२२ डिसेंबर १९९२ रोजी झालेल्या ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

## ४.१ ग्रामीण स्थानिक शासन संस्थेची रचना




## ४.२ ग्रामपंचायत

गावाचा कारभार पाहणारी व ग्रामविकासाची कामे करणारी स्थानिक शासनसंस्था म्हणजे ‘ग्रामपंचायत’ होय. पंचायतराज रचनेतील ग्रामपंचायत ही पायाभूत संस्था आहे. ग्रामपंचायतीची सभासद संख्या ही

गावाच्या लोकसंख्येनुसार निश्चित केली जाते. महाराष्ट्र राज्यात ग्रामपंचायतीची सदस्य संख्या लोकसंख्येनुसार कमीतकमी ७ आणि जास्तीतजास्त १७ इतकी आहे. ग्रामपंचायतीची मुदत पाच वर्षांची असते. ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांची निवड प्रौढ मताधिकार आणि गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. निवडणूक लढवण्यासाठी सदस्याचे वय कमीतकमी २१ वर्षे असायला पाहिजे.

ग्रामपंचायत सदस्य निवडण्यासाठी प्रभाग (वॉर्ड) तयार केले जातात. प्रत्येक प्रभागातून सदस्य निवडले जातात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी काही जागा राखीव असतात. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीमध्ये महिला प्रतिनिधींसाठी ५० टक्के जागा राखीव असतात.

**शोधा पाहू.**

आपल्या शेजारच्या राज्यातील ग्रामपंचायतीत स्त्रियांसाठी किती टक्के जागा राखीव असतात?

ग्रामपंचायतीच्या निवडलेल्या सदस्यांना 'पंच किंवा सदस्य' असे म्हणतात. निवडून आलेले हे सदस्य त्यांच्यापैकी एकाची सरपंच आणि एकाची उपसरपंच म्हणून निवड करत असत. सध्या मात्र महाराष्ट्रात सरपंचांची निवड थेट जनतेतून केली जाते. सरपंच हा ग्रामपंचायतीचा लोकनियुक्त पदाधिकारी असतो.

**ग्रामपंचायत सदस्य संख्या : लोकसंख्येनुसार निकष**




### गट ग्रामपंचायत

सहाशेपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या दोन किंवा अधिक गावांसाठी एकच ग्रामपंचायत असते तिला 'गट ग्रामपंचायत' म्हणतात.

### ४.२.१ ग्रामपंचायतीची कार्ये

गावाचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायत खालील कामे करते.




- गावासाठी रस्ते बांधणे व दुरुस्त करणे.
- गावातील वीज पुरवठ्याची, पिण्याच्या पाण्याची आणि सांडपाण्याची व्यवस्था करणे.
- जन्म-मृत्यू व विवाह नोंदी ठेवणे.
- गावात स्वच्छता राखणे.
- गावात प्राथमिक शिक्षण व आरोग्य सुविधा पुरवणे.
- घरपट्टी आणि पाणीपट्टी (कर) गोळा करणे.
- गावातील नागरिकांना सरकारी योजनांची माहिती देणे.

**जाणून घेऊ या.**

**महाराष्ट्रातील आदर्श ग्रामपंचायत**

हिवरे बाजार हे अहिल्यानगर जिल्ह्यातील छोटे खेडेगाव आहे. सततचा दुष्काळ आणि शेतीतील अल्प उत्पन्न ही हिवरे बाजारसाठी नित्याची समस्या होती. ही समस्या सोडवण्यासाठी गावात पावसाच्या पाण्याची साठवण आणि पाणलोट संवर्धन करण्यात आले. गावात भरपूर झाडे लावल्यामुळे पाणीपातळीत

मोठ्या प्रमाणात वाढ झाली. ग्रामस्थांच्या सहकार्याने काही वर्षांतच हिवरे बाजार हे एक हिरवेगार आणि समृद्ध गाव बनले. हिवरे बाजार या गावाने आदर्श ग्रामपंचायतीचे उदाहरण निर्माण केले. या कार्यासाठी गावचे तत्कालीन सरपंच श्री. पोपटराव पवार यांना २०२० साली भारत सरकारच्या पद्मश्री या नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून केली जाते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**


शासन निर्णय दिनांक २३ सप्टेंबर २०२४ नुसार ग्रामसेवक या पदाचे नाव बदलून 'ग्रामपंचायत अधिकारी' असे करण्यात आलेले आहे.



**चर्चा करा.**

खालील चित्र पहा व त्यांतील फरकांवर चर्चा करा.

**अविकसित आणि विकसित ग्रामपंचायत यांच्यातील फरक**






**चर्चा करा.**

- आदर्श गाव म्हणजे काय ?
- महाराष्ट्रातील आदर्श गावांची नावे शोधा.

### ४.२.२. ग्रामसेवक / ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख असतो. ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी त्याची नियुक्ती केली जाते. ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो. ग्रामपंचायतीसाठी आवश्यकतेनुसार एक किंवा अधिक ग्रामसेवक नेमले जाऊ शकतात. त्याची नेमणूक जिल्हा

### ४.२.३ ग्रामसभा

गावातील सर्व मतदारांची मिळून ग्रामसभा बनते. ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच ग्रामसभेचे अध्यक्षस्थान बजावतो. ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या कारभारावर देखरेख करणारी आणि गावातील विकास कामांना अंतिम मंजुरी देणारी १८ वर्षांवरील सर्व मतदारांची सभा असते.

ग्रामपंचायतीच्या कारभारात ग्रामसभेला महत्त्व आहे. महाराष्ट्रात ग्रामसभेने वर्षातून कमीतकमी

चार बैठका घ्याव्यात असे कायदेशीर बंधन आहे. २६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट, आणि २ ऑक्टोबर या दिवशी ग्रामसभेच्या बैठका होतात. याशिवाय विशेष सभा बोलावण्याचा अधिकार सरपंचास असतो. सरपंच ग्रामसभेच्या बैठका आयोजित करतो. ग्रामसभेपूर्वी महिलांची सभा आयोजित केली जाते.



**करून पहा.**

- गावात अलीकडे झालेल्या ग्रामसभेबद्‌दल माहिती मिळवा.
- तुमच्या गावातील सरपंचाची मुलाखत घ्या. त्याद्‌वारे त्यांनी गावात कोणकोणती कामे केली यांची यादी करा.




### ग्रामसभेची कामे


ग्रामपंचायतीचे जमाखर्च तपासणे व त्यांना मान्यता देणे, वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे, मागील आर्थिक वर्षाचा अहवाल आणि चालू वर्षाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवणे. या प्रकारच्या कामांवर ग्रामसभेत चर्चा होऊन निर्णय घेतले जातात. ग्रामसभेच्या सर्व कामकाजाची नोंद ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडून नोंदवहीत ठेवली जाते.

स्थानिक कर (घरपट्टी, पाणीपट्टी) आणि केंद्र सरकार/ राज्य सरकार / जिल्हा परिषदेकडून मिळणारे अनुदान ही ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची मुख्य साधने आहेत. याव्यतिरिक्त बाजार कर, व्यवसाय कर आणि ग्रामपंचायतीच्या मालमत्तेतून मिळणारे भाडे यांद्‌वारेही निधी उभा केला जातो.



**कृती करा.**

शाळेमध्ये अभिरूप ग्रामसभा भरवा.




**विचार करा.**

तुम्ही सरपंच झालात, तर तुम्हांला कोणती कामे करायला आवडतील ?

### ४.३ पंचायत समिती

एका तालुक्यातील सर्व गावांचा एकत्रित असा विकास गट असतो. विकास गटाचा कारभार पाहणारी संस्था म्हणजे 'पंचायत समिती' होय. ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून पंचायत समिती कार्य करते. पंचायत समितीमध्ये लोकसंख्येनुसार कमीतकमी १५ व जास्तीतजास्त ४५ सदस्य असतात.

**पंचायत समिती रचना**




### ४.३.१ पंचायत समिती सभापती

पंचायत समितीचे निर्वाचित सदस्य हे आपल्यापैकी एका सदस्याची सभापती आणि एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. पंचायत समितीचे सभापती आणि उपसभापती यांचा कार्यकाल अडीच वर्षांचा असतो. पंचायत समितीच्या सभा बोलावणे, सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे, सभेचे नियंत्रण करणे, जिल्हा परिषदेकडून आलेले आदेश अंमलात आणणे, पंचायत समितीच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे ही त्याची मुख्य कार्ये होत. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती त्याचे कामकाज पाहतो.

### ४.३.२ गटविकास अधिकारी

गटविकास अधिकारी हे पंचायत समितीचे प्रशासकीय प्रमुख असतात. महाराष्ट्रात प्रत्येक पंचायत समितीमध्ये एक गटविकास अधिकारी नियुक्त केला जातो. त्याची निवड महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमधून केली जाते. नेमणूक मात्र महाराष्ट्र शासन करते. तालुक्याच्या विकास योजनांची व निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम तो करतो. त्याच्या नियंत्रणाखाली पंचायत समितीची यंत्रणा कार्य करते.


### ४.३.३ पंचायत समितीची कार्ये

- पंचायत समिती क्षेत्रातील कार्यांचे नियोजन करणे.
- जिल्हा परिषदेच्या वतीने कार्यक्षेत्रात चालू असलेल्या कामांवर देखरेख ठेवणे.
- जिल्हा परिषद व ग्रामपंचायती यांच्यामध्ये समन्वय साधणे.
- तालुक्यातील विकास योजनांची अंमलबजावणी करणे.

ही पंचायत समितीची प्रमुख कार्ये आहेत. पंचायत समितीमध्ये सर्वसाधारण प्रशासन, सार्वजनिक बांधकाम, वित्त, शेती, आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण आणि समाजकल्याण इत्यादी विभाग असतात. त्यांच्यामार्फत कार्यांचे नियोजन व कार्यवाही केली जाते. जिल्हा परिषद व शासन यांच्या आदेशानुसार पंचायत समिती ही कामे करते.

पंचायत समितीला स्वतःची उत्पन्नाची साधने नाहीत. जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकामध्ये पंचायत समितीच्या अंदाजपत्रकाचा समावेश असतो. पंचायत समिती क्षेत्रातील योजनांच्या कार्यवाहीसाठी जिल्हा परिषद आणि राज्य शासनाकडून अनुदान दिले जाते.

**पंचायत समितीतील विभागांची प्रमुख कार्ये**



**शोधा पाहू.**

- पंचायत समिती सभापतीची निवड कोण करते ?
- पंचायत समितीचे प्रशासकीय प्रमुख कोण असतात ?

## ४.४ जिल्हा परिषद

जिल्हा परिषद ही स्थानिक शासनसंस्थांची जिल्हा स्तरावर कार्यरत असलेली सर्वोच्च संस्था होय. महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे आहेत, परंतु जिल्हा परिषदांची संख्या ३४ आहे. याचे कारण असे की राज्यातील मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे पूर्णपणे नागरी लोकवस्तीचे असल्याने तिथे जिल्हा परिषद अस्तित्वात नाही.

जिल्हा परिषदेत प्रौढ मतदान पद्धतीनुसार निवडणूक होते. जिल्हा परिषदेत कमीतकमी ५० आणि जास्तीतजास्त ७५ सदस्य असतात. सर्व पंचायत समित्यांचे सभापती हे जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. सदस्यांचा कार्यकाल हा पाच वर्षांचा असतो.

### ४.४.१ जिल्हा परिषद अध्यक्ष

जिल्हा परिषदेत निवडून आलेले सदस्य आपल्यातील एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. त्याचा कालावधी अडीच वर्षांचा असतो. जिल्हा परिषद अध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडतो. जिल्हा परिषद अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

### ४.४.२ मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. तो जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून काम करतो. जिल्हा परिषदेच्या प्रशासनावर त्याचे नियंत्रण असते. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी असतो. त्याची नेमणूक राज्य शासन करते. जिल्हा परिषदेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे आणि घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे ही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची प्रमुख कामे असतात.

### ४.४.३ जिल्हा परिषदेची कार्ये

जिल्हा परिषदेत स्थायी समिती, वित्त समिती, बांधकाम समिती, कृषी समिती, समाजकल्याण समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, महिला व बालकल्याण समिती, जलव्यवस्थापन व पाणीपुरवठा समिती अशा एकूण १० समित्या असतात. त्यांपैकी स्थायी समिती ही सर्वांत महत्त्वाची समिती असते. प्रत्येक समितीवर एक सभापती निवडला जातो. पाणीपट्टी, यात्रा कर, बाजार कर ही जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने आहेत. त्याशिवाय जमीन महसुलाच्या प्रमाणात ठरावीक अनुदान राज्य सरकार जिल्हा परिषदेस देते. जिल्ह्याच्या विकासासाठी या समित्यांमार्फत जिल्हा परिषद कार्य करत असते. त्यात प्रामुख्याने खालील कामांचा समावेश होतो.

**जिल्हा परिषद विभाग आणि प्रमुख कार्ये**

| समिती | प्रमुख कार्ये |
|---|---|
| स्थायी | १. सामान्य प्रशासन, वित्त व समन्वय,<br>२. इतर समित्यांवर नियंत्रण |
| वित्त | १. जिल्हापरिषदेच्या जमाखर्चाचा हिशेब ठेवणे.<br>२. लेखापरीक्षण करणे. |
| कृषी | १. बियाणे, खते व अवजारे यांचे वाटप.<br>२. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण. |
| समाजकल्याण | १. मागासवर्गीयांसाठी आर्थिक मदत.<br>२. अपंग व निराधार लोकांसाठी योजना. |
| शिक्षण | १. प्राथमिक शाळांचे नियंत्रण व व्यवस्थापन.<br>२. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व गणवेश वाटप. |
| पशुसंवर्धन व दुग्धशाळा | १. पशुसंवर्धन विकास योजना तयार करणे.<br>२. पशुवैद्यकीय दवाखान्यांचे नियंत्रण करणे. |
| जलव्यवस्थापन व पाणीपुरवठा | १. पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय करणे.<br>२. जलसंवर्धन |
| बांधकाम | १. गावे जोडणारे रस्ते व छोटे पूल बांधणे.<br>२. पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे. |
| आरोग्य | १. प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) चालवणे.<br>२. साथरोग नियंत्रण, लसीकरण व स्वच्छता मोहीम राबवणे. |
| महिला व बालकल्याण | १. महिला सक्षमीकरण अंगणवाडी पर्यवेक्षण<br>२. पोषण आहार योजना |

**करून पहा.**

तुमच्या क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या आंतरजालाच्या मदतीने संकेतस्थळाला भेट द्या आणि जिल्हा परिषदेची कार्यपद्धती समजून घ्या.

## स्थानिक शासनसंस्था: तुलनात्मक तक्ता

| घटक | ग्रामपंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद |
| --- | --- | --- | --- |
| स्तर | गाव पातळी | तालुका पातळी | जिल्हा पातळी |
| सदस्य संख्या | ७ ते १७ | १५ ते ४५ | ५० ते ७५ |
| पदाधिकारी | सरपंच, उपसरपंच | सभापती, उपसभापती | अध्यक्ष, उपाध्यक्ष |
| कार्यकाल | ५ वर्ष→सरपंच<br>५ वर्ष→सदस्य | २.५ वर्ष→सभापती<br>५ वर्ष→सदस्य | २.५ वर्ष→अध्यक्ष<br>५ वर्ष→सदस्य |
| निवडणूक | दर ५ वर्षांनी | दर ५ वर्षांनी | दर ५ वर्षांनी |
| राजीनामा | सरपंच→सभापती (पं.स.)<br>सदस्य→सरपंच | सभापती→अध्यक्ष (जि.प.)<br>सदस्य→सभापती (पं. स.) | अध्यक्ष→विभागीय आयुक्त<br>सदस्य→अध्यक्ष (जि.प.) |
| प्रशासकीय अधिकारी | ग्रामसेवक/ग्राम पंचायत अधिकारी | गटविकास अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| बैठका | मासिक सभा,<br>ग्रामसभा (वर्षातून ४ वेळेस) | महिन्यातून एकदा | ३ महिन्यांतून एकदा |



## स्वाध्याय

**प्र.१ खालील समस्या आणि त्या सोडवणारे अधिकारी यांच्या जोड्या लावा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
| --- | --- |
| अ) गटविकास अधिकारी (BDO) | १) गावातील जन्म-मृत्यूची नोंद करणे. |
| ब) मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) | २) तालुक्याच्या विकास कामांवर देखरेख ठेवणे. |
| क) ग्रामपंचायत अधिकारी | ३) जिल्हा परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे. |

**प्र.२ ओळखा पाहू, मी कोण ?**

१. गावाचा ‘प्रथम नागरिक’

----------------------------------------

२. जिल्हा परिषदेचे सर्व प्रशासकीय कामकाज पाहतो.

----------------------------------------

**प्र.३ तुम्ही काय कराल ?**

**प्रसंग १ : तुमच्या शाळेच्या रस्त्यावर खूप खड्डे पडले आहेत आणि पावसाळ्यात तिथे पाणी साचते. ही समस्या सोडवण्यासाठी तुम्ही कोणाला पत्र लिहाल ?**

अ) पोलीस स्टेशन  ब) ग्रामपंचायत

क) बँक मॅनेजर  ड) इतर

**तुमचे उत्तर आणि कारण :**

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**प्रसंग २ : २५० लोकसंख्या असलेल्या वाडीवर (वस्तीवर) 'ग्रामपंचायत' स्थापन करता येईल का ? जर नाही, तर तिथे कोणती शासनसंस्था काम करेल ?**

**तुमचे उत्तर आणि कारण :**

-----------------------------------------------


-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

**प्र.४ खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.५ खालील तक्ता पूर्ण करा. (महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक शासनसंस्था – त्रिस्तरीय रचना)**

| स्तर | लोकप्रतिनिधी प्रमुख | प्रशासकीय प्रमुख |
|---|---|---|
| ग्रामपंचायत | ------------- | ------------- |
| पंचायत समिती | ------------- | ------------- |
| जिल्हा परिषद | ------------- | ------------- |

**उपक्रम**

१. तुमच्या परिसरातील नजीकच्या काळात झालेल्या विकास कामांची माहिती घेऊन त्यावर वर्गात चर्चा करा.

२. परिसरातील विकास कामांमुळे पर्यावरणाचे रक्षण झाले की नुकसान, या विषयावर वर्गात दोन गट करून चर्चा घडवून आणा.

३. प्राचीन भारतात आधुनिक काळातील ग्रामपंचायतीसारख्या आणखी कोणत्या रचना होत्या ते शोधा व त्यावर चर्चा करा.

उदाहरणार्थ,

- जनपद
- महात्मा बसवेश्वरांच्या काळातील 'अनुभव मंटप'
- कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील शासनरचना

****

# ५ स्थानिक शासनसंस्था (शहरी)



| | |
|---|---|
| ५.१ नगरपंचायत | ५.३ महानगरपालिका |
| ५.२ नगरपरिषद | ५.४ कटक मंडळ |

मागील पाठात आपण ग्रामीण भागातील स्थानिक शासनसंस्थेचा अभ्यास केला. या पाठात आपण शहरी पातळीवरील शासनरचना आणि कार्ये समजावून घेणार आहोत. शहरी स्थानिक शासनसंस्थेमध्ये नगरपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका आणि कटक मंडळे यांचा समावेश होतो.

शहरीकरणामुळे आपल्या देशात शहरांची संख्या वाढत आहे. शहरातील शासनयंत्रणा व प्रशासन यांबद्दल माहिती करून घेऊया.



**चर्चा करा.**

शहरांना भेडसावणाऱ्या समस्यांची चर्चा करा.

## ५.१ नगरपंचायत

एखाद्या ग्रामीण लोकवस्तीचे जेव्हा शहरीकरण होऊ लागते, त्या वेळी राज्य सरकार त्या लोकवस्तीसाठी नगरपंचायतीची स्थापना करते. नगरपंचायत ही शहरी स्थानिक शासनसंस्था आहे. अकरा हजारांपेक्षा अधिक आणि पंचवीस हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरात नगरपंचायत स्थापन केली जाते. लोकसंख्या ही नगरपंचायतीच्या स्थापनेतील मुख्य अट आहे.

### ५.१.१ नगरपंचायतीची रचना

नगरपंचायतीच्या सदस्यांची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते. नगरपंचायत सदस्यांच्या निवडीसाठी प्रभाग तयार केले जातात. त्या प्रभागातून सदस्य निवडले जातात. अध्यक्ष हा थेट जनतेतून निवडला जातो. नगरपंचायतीत १७ सदस्य असतात. महिला आणि वंचित घटकांसाठी काही जागा राखीव असतात.



**माहीत आहे का तुम्हांला?**

महाराष्ट्रामध्ये एकूण १४६ नगरपंचायती आहेत. सर्वाधिक नगरपंचायती नागपूर विभागात आहेत.

नगरपंचायतीच्या प्रमुखाला 'अध्यक्ष' असे म्हणतात. अध्यक्ष हा थेट जनतेतून निवडला जातो. त्याचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. नगरपंचायतीची सर्व कार्ये त्याच्या अध्यक्षतेखाली पार पाडली जातात.

**शहरी शासनसंस्थेची रचना**

| महानगरपालिका | कटक मंडळ | नगरपरिषद | नगरपंचायत |
|---|---|---|---|
| महापौर | अध्यक्ष | नगराध्यक्ष | अध्यक्ष |
| उपमहापौर | उपाध्यक्ष | उपनगराध्यक्ष | उपाध्यक्ष |
| आयुक्त | कार्यकारी अधिकारी | मुख्याधिकारी | कार्यकारी अधिकारी |

## नगरपंचायत रचना

### नगरपंचायत

लोकसंख्या ११,००० ते २५,००० असणाऱ्या शहरांमध्ये स्थापना

#### लोकप्रतिनिधी

**अध्यक्ष**
- थेट जनतेकडून निवड
- ५ वर्षांचा कार्यकाळ
- नगरपंचायत बैठकीचे अध्यक्षस्थान

**उपाध्यक्ष**
- निवडून आलेले सदस्य यांच्यातून निवड
- ५ वर्षांचा कार्यकाळ नगरपंचायत अध्यक्षांच्या अनुपस्थितीत कार्यभार

**नगरसेवक**
- थेट लोकांकडून वॉर्डनुसार निवडणूक
- वॉर्डांची संख्या लोकसंख्येवर आधारित
- ५ वर्षांचा कार्यकाळ

**स्वीकृत सदस्य**
- विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या व्यक्ती
- नगराध्यक्षांकडून निवड
- मर्यादित संख्या

#### प्रशासन (शासकीय विभाग)


**कार्यकारी अधिकारी**
- राज्य शासनाद्वारे नियुक्ती, प्रशासकीय प्रमुख
- नगरपंचायतीचे निर्णय अंमलात आणणे

**कर्मचारी**
- विविध विभागांचे कर्मचारी (उदा. आरोग्य, पाणीपुरवठा, दैनंदिन कामकाज पाहणे इत्यादी.)

### करून पहा.

**पुढील चित्रात नगरपरिषद व नगरपंचायतीची कार्ये दर्शवली आहेत. चित्रे पाहून कार्ये लिहा.**


**नगरपरिषद व नगरपंचायतीची कार्ये**



नगरपंचायत आपल्या कार्यक्षेत्रात विविध कर आकारते. नगरपंचायत सर्व कामे त्यांना मिळणाऱ्या करांमधून करते. शिवाय त्यांना काही सरकारी अनुदानही मिळते.

### ५.२ नगरपरिषद

नगरपरिषदेची स्थापना २५ हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात केली जाते. लोकसंख्येच्या निकषांवर नगरपरिषदांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्यात येते.




### ५.२.१ नगरपरिषदेची रचना

नगरपरिषदेवर गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीने सदस्य निवडून दिले जातात, त्यांना 'नगरसेवक' असे म्हणतात. नगरपरिषदेचा कार्यकाल हा पाच वर्षांचा आहे. नगरपरिषदेची सदस्य संख्या कमीतकमी १७ व जास्तीतजास्त ३८ असते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

महाराष्ट्रामध्ये एकूण २४८ नगरपरिषदा आहेत. त्यापैकी सर्वाधिक ५० नगरपरिषदा या पुणे आणि ४९ नगरपरिषदा छत्रपती संभाजीनगर विभागामध्ये आहेत. अमरावती ४१, नाशिक ४५, नागपूर ४१, तर कोकण विभागामध्ये २२ नगरपरिषदा आहेत.

संदर्भ: (https://mahadma.maharashtra.gov.in/)

**नगरपंचायत व नगरपरिषद यांची कार्ये**

| मुख्य प्रकार | कामाचे स्वरूप | तपशील | |
|---|---|---|---|
| १. आवश्यक कार्ये | आरोग्य | १) शहराची स्वच्छता राखणे व सार्वजनिक आरोग्य सेवा देणे.<br>२) सार्वजनिक दवाखाने बांधून लोकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे.<br>३) साथीच्या रोगांचे नियंत्रण करणे. | ४) सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता ठेवणे व कचऱ्याचे व्यवस्थापन करणे.<br>५) सांडपाण्याची व्यवस्था करणे व पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय करणे.<br>६) आरोग्यविषयक जनजागृती करणे. |
| | शिक्षण | १) प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणे.<br>२) समाजातील वंचित घटकांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे. | ३) आवश्यकतेनुसार नवीन शाळा उघडणे व त्यांची देखरेख करणे.<br>४) व्यावसायिक शिक्षणाचे प्रशिक्षण देणे. |
| | इतर | १) रस्ते व दिवाबत्तीची सोय करणे.<br>२) शहरातील नागरिकांची जन्म व मृत्यूची(तसेच विवाह) नोंद ठेवणे. | ३) विविध स्वरूपाचे कर आकारणे.<br>४) शहरात स्मशानभूमी व दफनभूमी यांची व्यवस्था करणे. |
| २. ऐच्छिक कार्ये | | १) सार्वजनिक उद्याने, बागा विकसित करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे.<br>२) व्यायामशाळा, धर्मशाळा बांधणे. | ३) क्रीडांगण उपलब्ध करून देणे.<br>४) गरिबांसाठी घरे बांधणे.<br>५) रोजगार निर्मिती करणे. |

### ५.२.२ नगराध्यक्ष

नगरपरिषदेच्या प्रमुखास 'नगराध्यक्ष' म्हणतात. त्याची निवड थेट जनतेतून केली जाते. त्याचा कार्यकाल हा पाच वर्षांचा असतो. नगराध्यक्ष हा नगराचा प्रथम नागरिक असतो. नगरपरिषदेच्या सर्व सभांचे अध्यक्षस्थान नगराध्यक्ष भूषवतो. नगरपरिषदेच्या आर्थिक प्रशासनावर नगराध्यक्ष लक्ष ठेवतो. त्याच्या अनुपस्थितीत उपनगराध्यक्ष त्याचा कार्यभार सांभाळतो. नगरपरिषदेत निवडून आलेल्या सदस्यांमधूनच उपनगराध्यक्ष निवडला जातो.

### ५.२.३ मुख्याधिकारी


नगरपरिषदेचा प्रशासकीय प्रमुख हा मुख्याधिकारी असतो. हा राज्य शासनाचा अधिकारी असतो. त्याची निवड राज्य लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांमधून होते. नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्याची जबाबदारी त्याच्यावर असते.

### ५.२.४ नगरपरिषदेच्या उत्पन्नाचे स्रोत

नगरपरिषदेला उत्पन्नाची स्वतंत्र साधने आहेत. नगरपरिषद आपल्या क्षेत्रात विविध करांची आकारणी करते. नगरपरिषद जमिनी आणि इमारती, आयात माल, व्यवसाय, घरे, व्यापार व नोकरी, नाट्यगृहे व चित्रपटगृहे, पाणीपुरवठा इत्यादींवर कर आकारते. नगरपरिषदांचा खर्च मुख्यतः करांद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून चालतो, याशिवाय नगरपरिषदेला राज्य सरकारकडून आर्थिक साहाय्य आणि अनुदान मिळते.

## ५.३ महानगरपालिका

महानगरपालिका ही शहरी स्थानिक शासनसंस्था आहे. ज्या शहराची लोकसंख्या तीन लाखांपेक्षा जास्त असते आणि शहराचे उत्पन्न कमीतकमी दोन कोटी असते, अशा शहरांसाठी महानगरपालिका स्थापन केली जाते. महानगरपालिका स्थापन करण्याचा अधिकार महाराष्ट्र शासनास असतो. मुंबई ही महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका आहे. सध्या महाराष्ट्रात एकूण २९ महानगरपालिका आहेत.



बृहन्मुंबई महानगरपालिका


### ५.३.१ महानगरपालिकेची रचना

महानगरपालिकेची सदस्य संख्या ही शहराच्या लोकसंख्येनुसार ठरते. प्रत्येक महानगरपालिकेची सदस्यसंख्या राज्य निवडणूक आयोग निश्चित करतो. सदस्यसंख्या निश्चित झाल्यानंतर लोकसंख्येच्या प्रमाणात शहराचे विविध प्रभाग पाडण्यात येतात. सध्या महाराष्ट्रात चार सदस्यीय प्रभागरचना आहे. फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेत एक सदस्यीय प्रभाग आहे.

महानगरपालिकेची कमीतकमी सदस्यसंख्या ६५ आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेत सर्वाधिक २२७ सदस्य आहेत. प्रभागातून निवडून येणाऱ्या सदस्यास 'नगरसेवक' असे म्हणतात. नगरसेवकांची निवड प्रौढ आणि गुप्त मतदानाने केली जाते. नगरसेवकाचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो.

महानगरपालिकेचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. कार्यकाल संपण्यापूर्वी राज्य सरकार महानगरपालिका विसर्जित करू शकते. महानगरपालिका विसर्जित झाल्यास किंवा मुदत संपली असल्यास पुढील सहा महिन्यांच्या आत महानगरपालिकेची निवडणूक घेणे बंधनकारक असते.

### महानगरपालिका रचना




महागनगरपालिकेच्या अध्यक्षास 'महापौर' तर उपाध्यक्षास 'उपमहापौर' म्हणतात. महापौर हा शहराचा प्रथम नागरिक असतो. महापौर आणि उपमहापौर यांचा कार्यकाल अडीच वर्षांचा असतो. मुदत संपण्यापूर्वी ते आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

#### ५.३.२ महानगरपालिका आयुक्त

महानगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी आयुक्त असतो. त्याच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेचा सर्व कारभार चालतो. महानगरपालिका आयुक्ताची नेमणूक राज्य सरकार करते. आयुक्त पदावरील अधिकारी हा भारतीय प्रशासन सेवेतील (आय.ए.एस.) अधिकारी असतो. शहराच्या प्रशासनाची मुख्य जबाबदारी महानगरपालिका आयुक्तावर असते.

#### ५.३.३ महानगरपालिकेची कार्ये

**महानगरपालिकेच्या कार्यांचे आवश्यक आणि ऐच्छिक कार्ये असे दोन प्रकार पडतात.**

| आवश्यक कार्ये | ऐच्छिक कार्ये |
|---|---|
| शहराच्या पाणीपुरवठ्याची आणि सांडपाण्याची व्यवस्था करणे. | शहरात बागबगीचे तयार करणे. |
| विद्युत पुरवठा, रस्ते बांधणी आणि दुरुस्ती, शहराची स्वच्छता, रुग्णालये यांची व्यवस्था करणे. | नाट्यगृहे, स्टेडीअम, वस्तूसंग्रहालये यांची बांधकामे करणे. |
| स्मशानभूमी-दफनभूमीची व्यवस्था आणि जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे. | शहरात करमणुकीची साधने उपलब्ध करून देणे. |

| | |
|---|---|
| आरोग्य आणि प्राथमिक शिक्षणाची सोय करणे. | रस्त्याच्या दोन्ही बाजूस व इतरत्र वृक्षारोपण करणे. शहर सुशोभीकरण करणे. |
| साथीच्या रोगाचे नियंत्रण करणे. | सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय उभारणे. |
| शहरातील वाहतुकीची म्हणजेच परिवहनाची व्यवस्था करणे. | यात्रा, प्रदर्शने भरवणे, शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे. |
| मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींपासून लोकांचे संरक्षण करणे. | इतर कार्ये |

### ५.३.४ महानगरपालिकेच्या विविध समित्या

महानगरपालिका विविध समित्यांच्या माध्यमातून कार्ये करते.

- उदाहरणार्थ, स्थायी समिती, शिक्षण समिती, परिवहन समिती, सार्वजनिक आरोग्य समिती, कायदा समिती, सार्वजनिक बांधकाम समिती व बाजार समिती इत्यादी.

स्थायी समिती ही महानगरपालिकेतील सर्वांत महत्त्वाची समिती आहे.

### ५.३.५ महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत


**महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे दोन स्रोत आहेत.**

१. महानगरपालिका प्रत्यक्ष कर आकारणी करून उत्पन्न मिळवते. प्रत्यक्ष करांमध्ये संपत्ती कर, वाहतुकीवरील कर, चित्रपट आणि जाहिरात यांवरील कर, पाणीपट्टी इत्यादींचा समावेश होतो.

२. अप्रत्यक्ष उत्पन्नात शुल्क साहाय्य वसुली आणि सरकारी अनुदान व आर्थिक साहाय्य यांचा समावेश होतो. शिवाय सार्वजनिक हिताच्या योजना पार पाडण्यासाठी सरकारच्या संमतीने कर्ज उभारण्याचा अधिकार महानगरपालिकेला असतो.

### ५.४ कटक मंडळ (Cantonment Board)

कटक मंडळ हा शहरी प्रशासनाचा एक प्रकार आहे. त्यास 'छावणी मंडळ' असेही म्हटले जाते. १९२४ साली कटक मंडळांची स्थापना झाली. ज्या ठिकाणी लष्करी छावणी असते त्या ठिकाणी इतर नागरिकांची वस्तीही असते. त्या लष्करी भागातील नागरिकांना सोयीसुविधा पुरवण्यासाठी आणि त्यांच्या नागरी गरजा भागवण्यासाठी कटक मंडळाची स्थापना करण्यात आली.





**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतात एकूण ७२ कटक मंडळे अस्तित्वात आहेत. त्यांपैकी ७ कटक मंडळे महाराष्ट्रात आहेत. ती पुढीलप्रमाणे– खडकी, पुणे कॅम्प, देहू रोड (पुणे), भिंगार (अहिल्यानगर), देवळाली (नाशिक), छत्रपती संभाजीनगर आणि कामठी (नागपूर).

भारतातील सर्व कटक मंडळे ही भारत सरकारच्या संरक्षण खात्याच्या नियंत्रणाखाली आहेत. वेगवेगळ्या छावणी मंडळांतील सदस्यसंख्या वेगवेगळी असते. कटक मंडळावर प्रशासन प्रमुख हा केंद्र सरकारने नेमलेला कार्यकारी अधिकारी असतो. कटक मंडळाच्या लोकसंख्येनुसार प्रभाग निर्माण केले जातात. त्या प्रभागांमधून लोकांनी निवडलेले प्रतिनिधी कटक मंडळावर सदस्य असतात. त्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. त्याखेरीज कटक मंडळावर शासनाने नियुक्त केलेले लष्करी अधिकारी असतात. या सर्वांच्या मार्फत कटक मंडळाचा कारभार चालतो.

छावणीचा प्रमुख सेनाधिकारी हा कटक मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. कटक मंडळाचा उपाध्यक्ष हा नागरी क्षेत्रातील जनसामान्यांचा प्रतिनिधी असतो.

### ५.४.१ कटक मंडळाची वैशिष्ट्ये

- भारत सरकारच्या संरक्षण खात्याकडून कटक मंडळाची स्थापना केली जाते.
- केंद्र सरकारच्या आधिपत्याखाली असलेली कटक मंडळ ही एकमेव स्थानिक शासनसंस्था आहे.
- कटक मंडळांना खर्चासाठी आवश्यक आर्थिक साहाय्य संरक्षण खात्याकडून केले जाते.
- कटक मंडळ हे सैनिकांना आणि त्यांच्यासोबत छावणीत राहणाऱ्या सामान्य नागरिकांना आवश्यक सेवा पुरवते.
- कटक मंडळ सैनिकी तळ असलेल्या भागातील प्रशासकीय कामकाज पाहते.

### ५.४.२ कटक मंडळाची कार्ये

- सैनिकी आणि नागरी वस्ती असलेल्या भागांतील स्थानिक प्रशासन पाहणे.
- छावणी भागात शिक्षण, आरोग्य, बाजार व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते इत्यादींची व्यवस्था करणे.
- दिवाबत्ती, बागबगीचे, साफसफाई इत्यादी पायाभूत सुविधा पुरवणे.
- मुलांना शिक्षण देण्यासाठी छावणी भागात शाळा चालवणे आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे.

**कटक मंडळ रचना : श्रेणी व सदस्य संख्या**

| श्रेणी | लोकसंख्या निकष | एकूण सदस्य | सदस्य रचना | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | निर्वाचित सदस्य | | नामनिर्देशित सदस्य |
| प्रथम श्रेणी (I) | ५०,००० पेक्षा जास्त | १५ | ७ निर्वाचित | + | ८ नामनिर्देशित/पदसिद्ध |
| द्वितीय श्रेणी (II) | १०,००० ते ५०,००० | १५ | ७ निर्वाचित | + | ८ नामनिर्देशित/पदसिद्ध |
| तृतीय श्रेणी (III) | २,५०० ते १०,००० | ९ | ४ निर्वाचित | + | ५ नामनिर्देशित/पदसिद्ध |
| चतुर्थ श्रेणी (IV) | २,५०० पेक्षा कमी | ३ | १ निर्वाचित | + | २ नामनिर्देशित/पदसिद्ध |

**विशेष नोंद :** कटक मंडळामध्ये लष्करी प्रशासनाचे वर्चस्व राहावे म्हणून नामनिर्देशित/पदसिद्ध सदस्यांची संख्या निर्वाचित सदस्यांपेक्षा नेहमी एकने जास्त असते.

- अग्निशमन दलाची व्यवस्था करणे.
- दवाखाना, लसीकरण मोहिमा इत्यादींची व्यवस्था करणे.
- रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लावणे आणि त्यांची व्यवस्था करणे.
- स्थानिक कर गोळा करणे आणि त्या करातून नागरिकांच्या सोयीसुविधांची व्यवस्था करणे.

**कटक मंडळाच्या उत्पन्नाचे स्रोत**

- छावणी भागातील प्रत्यक्ष करांपासून मिळणारे उत्पन्न
- केंद्र सरकार आणि केंद्रीय संरक्षण खात्याकडून आर्थिक मदत



## स्वाध्याय

**प्र.१ खालील चित्रे पाहून तुमच्या परिसरात या सुविधा पुरवणारी स्थानिक शासन संस्था कोणती ते लिहा.**




ही सुविधा पुरवणारी संस्था

.......................................



ही सुविधा पुरवणारी संस्था

.......................................



ही सुविधा पुरवणारी संस्था

.......................................




ही सुविधा पुरवणारी संस्था

.......................................

**प्र.२ ओळखा पाहू मी कोण ?**

१. लोकसंख्या कमी, पण शहरीकरण सुरू आहे, मी कोण ?

........................................................................

२. माझ्याशिवाय नगरपरिषदेचे अंदाजपत्रक मंजूर होऊ शकत नाही, मी कोण ?

........................................................................

३. मी मोठ्या शहराचा 'प्रशासकीय कणा' आहे, माझी नेमणूक राज्य शासन करते, मी कोण ?

........................................................................

**प्र.३ खालील तक्ता पूर्ण करा.**

| शासन संस्था | प्रमुख निर्वाचित पदाधिकारी | प्रशासकीय अधिकारी |
|---|---|---|
| **नगरपंचायत** | अध्यक्ष | .................. |
| .................. | .................. | मुख्याधिकारी |
| .................. | महापौर | .................. |

**प्र.४ एका 'आदर्श शहराचे' संकल्पनाचित्र काढा, ज्यामध्ये नागरी स्थानिक संस्थेने पुरवलेल्या किमान ५ सुविधा स्पष्ट दिसतील.**

(उदाहरणार्थ, सायकल ट्रॅक, सौरऊर्जा दिवे, कचरा वर्गीकरण केंद्र, उद्यान, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादी)

**प्र.५ तुमच्या शहराला 'स्मार्ट आणि स्वच्छ शहर' बनवण्यासाठी किमान ४ घोषवाक्ये तयार करा.**

उदाहरणार्थ, "शहर आपले घर आहे, स्वच्छ ठेवणे आपले कर्तव्य आहे!"

**तुमची घोषवाक्ये :**

१. ..............................................

२. ..............................................

३. ..............................................

४. ..............................................

**उपक्रम**

१. परिसरातील सार्वजनिक उद्यानांची सद्य:स्थिती पाहून तेथे कोणत्या नवीन सुविधांची गरज आहे ते लिहा.

२. शहरातील सार्वजनिक भिंतींवर स्थानिक प्रशासनाने स्वच्छतेचा संदेश देणारी चित्रे काढली आहेत का? याचे निरीक्षण करा व त्यामध्ये कोणता संदेश दिला आहे हे वहीत लिहा.

***

# ६ जिल्हा प्रशासन



६.१ जिल्हा प्रशासनाची ओळख
६.२ जिल्हा महसूल प्रशासन : रचना, कार्ये, अधिकार
६.३ जिल्हा पोलीस प्रशासन : रचना, कार्ये, अधिकार
६.४ जिल्हा न्याय प्रशासन : रचना व कार्ये



"मुलांनो, कल्पना करा की आपण एका खूप मोठ्या जहाजावर आहोत. या जहाजावर हजारो लोक राहतात. कोणाला भूक लागली आहे, कोणाला दवाखान्यात जायचे आहे, तर कोणाला खेळण्यासाठी सुरक्षित जागा हवी आहे. आता मला सांगा, इतक्या मोठ्या जहाजावर गोंधळ होऊ नये म्हणून कोणाची तरी गरज लागेल ना?" म्हणून जहाजावर कॅप्टन असतात. हे कॅप्टन जहाजाचे प्रमुख असतात व काहीही समस्या निर्माण झाल्यास ते आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सोडवतात. जहाज सुरक्षितपणे आपल्या निश्चित असलेल्या ठिकाणी पोहोचण्यासाठी 'कॅप्टन'ची भूमिका महत्वाची ठरते.

आपला जिल्हा म्हणजे नेमके हे 'जहाज' आहे आणि जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे त्याचे 'कॅप्टन' आहेत!"



सांगली जिल्हाधिकारी कार्यालय

## ६.१ जिल्हा प्रशासनाची ओळख

विविध जिल्ह्यांनी मिळून राज्ये तयार होतात.

जिल्हा प्रशासन रचना




जिल्ह्याची स्वतंत्र अशी प्रशासकीय यंत्रणा असते, यालाच 'जिल्हा प्रशासन' असे म्हणतात. जिल्हा हा प्रशासनाचा एक महत्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. जिल्हा प्रशासन हे राज्य प्रशासन व स्थानिक शासनसंस्था यांमधील एक महत्वाचा दुवा आहे. महसूल संकलन, कृषी सिंचन, लोककल्याणाची कार्ये, आपत्कालीन कार्ये, स्वस्त धान्य वितरण, निवडणुकांचे आयोजन, स्थानिक शासनसंस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी इत्यादी कार्ये जिल्हा प्रशासनाची असतात.

जिल्हाधिकारी हा जिल्हा प्रशासनाचा प्रमुख असतो. प्रशासकीय व्यवस्थेचा मुख्य घटक म्हणून जिल्ह्याकडे पाहिले जाते. अशा मूलभूत प्रशासकीय व्यवस्थेद्वारे चालणाऱ्या सर्व सार्वजनिक व्यवहारांचे व्यवस्थापन म्हणजे जिल्हा प्रशासन होय.

## ६.२ जिल्हा महसूल प्रशासन : रचना, कार्ये, अधिकार

जिल्हा महसूल यंत्रणा ही जिल्हा प्रशासनाचा एक महत्वाचा विभाग असून, यात जिल्हाधिकारी,

उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांचा समावेश असतो. ही यंत्रणा जमीन, महसूल प्रशासन, कायदा सुव्यवस्था, नागरिकांची कामे, नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन व मदतकार्य यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळते.

### जिल्हा महसूल प्रशासन : रचना


| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | जिल्ह्याचा प्रमुख महसूल अधिकारी |
| २. उपजिल्हाधिकारी | जिल्हाधिकाऱ्यांना मदत करतात. |
| ३. तहसीलदार | तालुक्याचा प्रमुख महसूल अधिकारी |
| ४. नायब तहसीलदार | तहसीलदारांना मदत करतात. |
| ५. मंडल अधिकारी/ मंडल निरीक्षक | अनेक गावांच्या गटांवर देखरेख करतात. |
| ६. तलाठी | गावाचा महसूल अधिकारी |
| ७. कोतवाल | तलाठ्यांना मदत करतात. |

### ६.२.१ जिल्हाधिकारी

जिल्हाधिकारी हा भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी असतो. तो जिल्ह्याच्या प्रशासनाचा प्रमुख असतो. याची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून होते, पण त्याची नेमणूक राज्य शासनामार्फत केली जाते. इतर सर्व कार्ये पार पाडण्याबरोबर त्याला कायदा सुव्यवस्था राखणे व जमीन महसूल संकलन करणे ही अत्यंत महत्त्वाची कार्ये पार पाडावी लागतात. त्याचबरोबर राज्य व राष्ट्रीय पातळ्यांवरील विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्याचे अधिकारदेखील जिल्हाधिकाऱ्यांकडे असतात.

**तहसीलदार**

जिल्हा विविध लहान उपविभाग मिळून तयार झालेला असतो, या उपविभागाला 'तालुका' असे म्हणतात. तहसीलदार हा तालुका महसूल प्रशासनाचा प्रमुख असतो. तो तालुकांतर्गत सर्व गावे, खेडी व तालुक्याचे ठिकाण यांच्या महसूलविषयक प्रशासकीय



जबाबदाऱ्या पार पाडत असतो. तो जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करतो. त्याची कार्ये पुढीलप्रमाणे:

- जमिनीच्या दाखल्यांची नोंदणी आणि विभाजन करणे.
- जमीन महसुलाची वसुली करणे.
- जमिनीवर अतिक्रमण झाल्यास ते दूर करणे.
- आपत्ती व्यवस्थापन आणि मदतकार्यामध्ये सहभागी होणे.
- नागरी सुविधाविषयक सर्व महत्त्वाची प्रमाणपत्रे देणे.
- जमीनविषयक दिवाणी स्वरूपाच्या काही प्रकरणांमध्ये न्यायदंडाधिकारी म्हणून काम पाहणे.

**करून पहा.**

१. चित्र पाहा व त्यावरून आपल्याला काय समजले हे सांगा.




२. केंद्र शासनाने मुलींच्या विकासासाठी व त्यांच्या शिक्षणासाठी चालू केलेल्या योजनांची अधिक माहिती मिळवा व वर्गात त्यावर गटचर्चा करा.

### तलाठी

तलाठी हा गावपातळीवरील महसूल खात्याचा कर्मचारी असतो. त्याला ग्रामीण मुलकी प्रशासनात पुढील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

- महसूल वसुली, तगाई कर्ज व त्यांची वसुली करणे.
- गावाच्या स्थावर नोंदी ठेवणे व त्यांचे उतारे देणे.
- दुष्काळ निवारण कामाची कार्यवाही करणे.
- निवडणुकीची सोपवलेली कामे करणे.
- जिल्हाधिकाऱ्याने वेळोवेळी ठरवून दिलेली नोंदणी, पुस्तके व हिशेब ठेवणे इत्यादी.

तलाठ्यावर प्रत्यक्ष नियंत्रण मंडल अधिकारी व त्यानंतर तहसीलदाराचे असते.

**जाणून घेऊ या.**

**महाराष्ट्रातील काही सनदी अधिकाऱ्यांची उल्लेखनीय कामे:**

**डॉ. राजेंद्र भारूड (सनदी अधिकारी IAS)**

कोविड-१९ महामारीचा सामना करण्यासाठी नंदूरबारचे तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भारूड यांनी त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करून 'ऑक्सिजन प्लँट' तयार केले.

परिणामत: नंदूरबार जिल्हा ऑक्सिजन उपलब्धतेच्या बाबतीत आत्मनिर्भर झाला. कोरोना संक्रमित आदिवासी व्यक्तींच्या विलगीकरणासाठी त्यांनी शाळा, समाजमंदिरे, वसतिगृहे व धर्मशाळा यांत ऑक्सिजन सुविधेसह बेड तयार केले.

**ई. झेड. खोब्रागडे (माजी सनदी अधिकारी IAS)**

भारतीय प्रशासकीय सेवेत असताना ई.झेड. खोब्रागडे यांनी संविधानाबद्दल जागृती व्हावी या उद्देशाने नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत 'संविधानाची प्रास्ताविका वाचन' हा उपक्रम राबवला. महाराष्ट्र शासनाने या उपक्रमाची दखल घेऊन २००८ सालापासून महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत प्रास्ताविकेचे वाचन बंधनकारक केले.

### ६.२.२ जिल्हा प्रशासनाद्वारे राबवल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या योजना

केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना राबवण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर असते. विकासाच्या व कल्याणकारी स्वरूपाच्या विविध योजना जिल्हाधिकारी राबवतो. त्याची माहिती पुढीलप्रमाणे :

**१. सामाजिक व कल्याणकारी योजना :** समाजातील स्त्रिया, लहान मुले, अप्रगत घटक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक इत्यादींच्या कल्याणकारी योजना उदाहरणार्थ, बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजना, अंत्योदय योजना इत्यादी.

**२. ग्रामीण विकास व रोजगार निर्मितीच्या योजना:** उदरनिर्वाह व ग्रामीण भागातील दळणवळण यंत्रणेसंदर्भातील योजना. उदाहरणार्थ, प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना, राष्ट्रीय व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना इत्यादी.

**३. शेतीविषयक योजना :** कृषी उत्पादकता वाढवणे, सिंचन आणि पाणी साठवण सुविधा सुधारणे, पिकांमध्ये विविधता आणणे, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे इत्यादी योजना जिल्हा प्रशासनाद्‌वारे राबवल्या जातात उदाहरणार्थ, प्रधानमंत्री कृषी संचय योजना.

**सांगा पाहू!**

तुम्ही 'जिल्हाधिकारी' झालात, तर तुम्ही काय-काय कराल?

## ६.३ जिल्हा पोलीस प्रशासन : रचना, कार्ये व अधिकार

जिल्हा पोलीस यंत्रणेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे सार्वजनिक सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था राखणे व गुन्हेगारीला प्रतिबंध करणे इत्यादी आहे. पोलीस यंत्रणेच्या सतर्कतेमुळे लोकांना सुरक्षितता मिळते, न्याय मिळतो. नागरिकांच्या जीविताचे व संपत्तीचे संरक्षण होते.

जिल्हा पातळीवरील पोलीस यंत्रणेचा प्रमुख पोलीस अधीक्षक असतो व तो जिल्हा पोलीस दलाचे नेतृत्व करतो. जिल्ह्यातील सर्व पोलीस यंत्रणा पोलीस अधिक्षकाच्या नियंत्रणाखाली कार्य करतात. त्याची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून होते.

**शोधा पाहू.**

'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे महाराष्ट्र पोलीस सेवा दलाचे ब्रीदवाक्य आहे. या वाक्याचा अर्थ शोधा.

| जिल्हा पोलीस प्रशासन यंत्रणेची रचना |
|---|
| १. पोलीस अधीक्षक (S.P.) |
| २. अप्पर पोलीस अधीक्षक (Addl. S.P.) |
| ३. पोलीस उपअधीक्षक (Dy.S.P.) |
| ४. पोलीस निरीक्षक (P.I.) |
| ५. साहाय्यक पोलीस निरीक्षक (A.P.I.) |
| ६. उपनिरीक्षक (P.S.I.) |
| ७. साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (A.S.I.) |
| ८. पोलीस हवालदार (H.C.) |
| ९. पोलीस शिपाई (P.C.) |

### ६.३.२ पोलीस अधीक्षकाचे कार्य व अधिकार

- जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखणे व ती नियंत्रणात आणणे.
- सामान्य जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे.
- वाहतुकीचे व्यवस्थापन करणे.
- आपत्ती व्यवस्थापन व आणीबाणीच्या परिस्थितीत साहाय्यकारी भूमिका बजावणे.

अती महत्त्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षिततेची जबाबदारी जिल्हा पोलीस प्रशासनावर असते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**सायबर गुन्हेगारी**

संगणक व इंटरनेट यांच्या माध्यमांतून एखाद्या व्यक्ती, संस्था आदींच्या संगणक प्रणालीमध्ये शिरून त्यातील माहिती हॅक करणे (चोरणे), त्याचा गैरवापर करणे, व्हायरस पाठवणे, मेलद्‌वारे फसवणूक, धमकी देणे, खंडणी मागणे अशा कृतींना 'सायबर गुन्हेगारी' असे म्हणतात.

**सायबर हेल्पलाईन नंबर १९३०**

## ६.४ जिल्हा न्याय प्रशासन : रचना व कार्ये

जिल्हा न्यायाधीश हे जिल्हा पातळीवरील प्रमुख न्यायिक प्राधिकारी असतात. जेव्हा ते दिवाणी खटल्यासंदर्भात काम करतात, तेव्हा त्यांना 'जिल्हा न्यायाधीश' असे म्हणतात व ते जेव्हा फौजदारी खटल्या संदर्भात काम पाहतात, तेव्हा त्यांना 'सत्र न्यायाधीश' असे म्हणतात.

### ६.४.१ जिल्हा न्यायालय

न्यायपालिका किंवा न्यायव्यवस्था ही राज्यघटनेची रक्षक म्हणून ओळखली जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली उच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा न्यायालय कार्य करते. उच्च न्यायालयाच्या सल्ल्यानुसार राज्याचे राज्यपाल जिल्हा न्यायाधिशाची नेमणूक करतात. जिल्ह्यातील कायदाविषयक सर्व विवादांचे निराकरण करण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाकडे असतात.



जिल्हा न्यायालय

प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा न्यायालयात प्रधान न्यायाधीश असतात, त्यांना जिल्हा व सत्र न्यायाधीश असे म्हणतात. त्यांच्या कामात मदत करण्यासाठी इतर काही कनिष्ठ न्यायाधीश असतात. जिल्हा न्यायालयात दिवाणी व फौजदारी अशी दोन्ही कामे पाहिली जातात.

**जिल्हा व सत्र न्यायालयाचा प्रारूप तक्ता**

| दिवाणी खटले | फौजदारी खटले |
|---|---|
| जिल्हा न्यायाधीश | सत्र न्यायाधीश |
| अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश | अतिरिक्त सत्र न्यायाधीश |
| दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर | मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय |
| दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर | न्यायदंडाधिकारी न्याय प्रथम वर्ग |

### ६.४.२ जिल्हा न्यायालयाची कार्ये

**१. न्यायिक अधिकार :** जिल्हा न्यायालये जिल्हा पातळीवर दिवाणी खटल्यांची आणि फौजदारी खटल्यांची सुनावणी करतात.

- **दिवाणी खटले :** अ) जमीन व इतर मालमत्ता यांच्या मालकी हक्कासंदर्भातील ताबा, अतिक्रमण इत्यादी वादाचे दावे चालवणे. ब) कुटुंबातील मालमत्तेची वाटणी, वारसा हक्क इत्यादी संदर्भातील दावे

- **फौजदारी खटले :** ३ वर्षांपेक्षा अधिक शिक्षेची तरतूद असलेल्या सर्व गुन्ह्यांचे खटले सत्र न्यायालयात चालवले जातात. उदाहरणार्थ, दरोडा, खून, इत्यादी गंभीर गुन्हे

**२. अपील सुनावणी :** जिल्हा न्यायालय हे जिल्ह्यातील अपील करण्याचे न्यायालय असते. कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या आदेशावर 'अपिल न्यायालय' म्हणून ते ओळखले जाते. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) व मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या निकालाविरुद्ध दाखल

करण्यात आलेली अपीले चालवण्याचा अधिकार जिल्हा न्यायालयाला असतो.

**३. प्रशासकीय अधिकार :** जिल्हा व सत्र न्यायालयांतर्गत येणाऱ्या न्यायालयाच्या संबंधी कर्मचारी नेमणूक, पदोन्नती, बदली व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे सर्व अधिकार जिल्हा न्यायालयाला असतात.

### जिल्हास्तरावरील इतर न्यायालये

- कौटुंबिक न्यायालय
- ग्राहक तक्रार निवारण
- कामगार/ औद्योगिक न्यायालय
- बाल न्याय मंडळ



**जाणून घेऊ या.**

**विधी सेवा प्राधिकरण म्हणजे काय?**

समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदेशीर मदत देण्याच्या उद्देशाने भारतामध्ये विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना १९८७ मध्ये करण्यात आली. समाजातील दुर्बल घटकाला न्यायालयीन किंवा कायदेविषयक विनामूल्य सेवा व मदत देणे हे विधी सेवा प्राधिकारणाचे मुख्य ध्येय आहे. आर्थिक अथवा अन्य अक्षमतांच्या कारणांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय नाकारला जाऊ नये, हे एक प्रमुख उद्‌दिष्ट ह्या विधी सेवा प्राधिकरणाचे आहे.



## स्वाध्याय

**प्र.१ ओळखा पाहू मी कोण ?**

१. मी जिल्ह्याचा प्रथम प्रशासकीय अधिकारी असून आपत्ती व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष आहे.
...........................................

२. मी गावपातळीवर शांतता राखण्यासाठी पोलिसांना मदत करतो.
...........................................

३. मी तालुका पातळीवर महसूल गोळा करतो आणि 'तालुका दंडाधिकारी' म्हणूनही ओळखला जातो.
...........................................

४. मी जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस दलाचे नेतृत्व करतो.
...........................................

**प्र.२ खालील प्रसंगी तुम्ही कोणत्या अधिकाऱ्याकडे जाल ?**

१. तुमच्या जमिनीचा 'सातबारा' उतारा हवा असल्यास–
...........................................

२. तुमच्या परिसरात चोरी झाली असून तक्रार नोंदवायची असल्यास–
...........................................

३. दोन व्यक्तींमधील जमिनीचा वाद न्यायालयात न्यायचा असल्यास–
...........................................

४. नैसर्गिक आपत्तीमुळे (उदा. गारपीट) झालेल्या पिकांच्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी–
...........................................

**प्र.३ पुढील तक्ता पूर्ण करा.**

| अधिकारी | कार्ये |
|---|---|
| जिल्हाधिकारी | जिल्ह्याचा महसूल गोळा करणे व कायदा-सुव्यवस्था राखणे. |
| जिल्हा पोलीस अधीक्षक | ....................................... |
| तहसीलदार | ....................................... |
| जिल्हा न्यायाधीश | ....................................... |
| तलाठी | ....................................... |

**प्र.४ संकल्पना स्पष्ट करा.**

१. जिल्हाधिकारी

२. तहसीलदार

**प्र.५ कल्पना करा आणि लिहा. ‘ मी जिल्हाधिकारी झालो तर ................. ’**

तुमच्या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. अशा वेळी जिल्हाधिकारी म्हणून तुम्ही कोणत्या तीन कामांना सर्वोच्च प्राधान्य द्याल आणि का ?

**उपक्रम**

१. जिल्हा प्रशासनाकडून राबवल्या जाणाऱ्या ‘आपत्ती व्यवस्थापन’ यंत्रणेबद्दल माहिती मिळवून आपत्कालीन संपर्क क्रमांकांची यादी करा.


२. जिल्हाधिकारी आणि इतर विभागांचे प्रमुख (उदाहरणार्थ, शिक्षण, आरोग्य) जिल्ह्याच्या विकासावर चर्चा करत असल्याचे छोटे नाटक सादर करा.


३. तुमच्या परिसरातील कोणत्याही प्रशासकीय अधिकाऱ्याची मुलाखत घ्या.

४. जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार होण्यासाठी कोणती परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते? ह्याची माहिती मिळवा व त्यावर वर्गात चर्चा करा.

***


## विद्यार्थ्यांनो, अधिक माहितीसाठी हेही वाचा.









प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला **'वाईट'** वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.




हे बटण दाबा.

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.

CHILD LINE 1098
NIGHT & DAY

चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.

नए समाज की ओर
Towards a new dawn

- विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास व नागरिकशास्त्र
इयत्ता सहावी (मराठी माध्यम)

(विनामूल्य वितरणासाठी)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha